# शब्द रुची

ऑगस्ट २०१७
मूल्य १० रुपये
पृष्ठ ६०



दुःख जेवढे गहिरे
तेवढे ते सृजनशीलही असते...




दम लागणे, रोजचे काम करताना छातीत वेदना होणे, चक्कर येणे, पावले तसेच पायांवर सूज येणे, मधूमेह, हाय ब्लडप्रेशर, वाढलेले वजन अशी काही लक्षणे असल्यास घाबरु नका पण त्यांच्याकडे दुर्लक्षही करु नका. कारण ही हृदयरोगाची पूर्वलक्षणे असू शकतात.

तुमच्या हृदयाला होणारा रक्तपुरवठा आणि त्याची कार्यक्षमता याबद्दल जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. हे कळण्यासाठी कार्डिओ असिस्ट हार्ट चेक-अप करणे गरजेचे आहे. आजच माधवबागला भेट देऊन स्ट्रेस टेस्ट करुन घ्या. म्हणजेच अत्याधुनिक तपासणी आणि अचुक निदान!

~~₹2400~~ फक्त ₹750

सादर करीत आहोत

**कार्डिओ असिस्ट हार्ट चेक-अप**

कॉम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट, इ सी जी, ब्लडप्रेशर, एस पी ओ 2, बी एम आय, आर बी एस (रँडम ब्लड शुगर)

- Mission 'Save My Heart' initiative by Vaidya Sane Trust -

मुंबई • पुणे • पश्चिम महाराष्ट्र • गोवा • विदर्भ • मराठवाडा • बेळगाव येथील सर्व माधवबाग क्लिनिक्स्मध्ये ही टेस्ट उपलब्ध

**माधवबागची वैशिष्ट्ये:**

- अत्याधुनिक व शास्त्रीय संशोधनातून सिद्ध झालेले आयुर्वेदीक विनाशस्त्रक्रिया उपचार.
- उपचारांची उपयुक्तता आणि परिणामकारकता यांच्या क्लिनिकल टेस्ट तज्ज्ञ कार्डिओलॉजिस्टनी यशस्वीरित्या घेतल्या आहेत.*
- या उपचारांमध्ये लाखो रुग्णांसाठी गुणकारी ठरलेल्या आयुर्वेदीक वनौषधी असलेली दर्जेदार औषधे वापरली जातात.
- माधवबाग क्लिनिकमध्ये अनुभवी डॉक्टर्स रुग्णांच्या उपचार आणि प्रकृती सुधारणेसाठी तत्पर असतात.

*For detailed information visit goo.gl/UZ1GwN

अपॉइंटमेंटसाठी आजच मिस कॉल द्या:

**022-33494950**

किंवा लॉग-इन करा www.madhavbaug.org

माधवबाग™

व्हॉटएव्हर इट टेक्स

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा. मिस्डकॉल नं. 022-67715442

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

ऑगस्ट २०१७, वर्ष पाचवे
अंक चौथा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर
मुखपृष्ठ : सतीश भावसार
मुखपृष्ठावरील ओळी : विजय सातपुते

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी २५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

४२ ॥ग्रंथाली॥

## अनुक्रम

**स्मरणवेळा**
- दलवाई भाभी कृतार्थ आणि समर्पित जीवन / ६
  **डॉ. शमसुद्दीन तांबोळी**
- मी भरून पावले आहे... / १०
  **मीनाक्षी दादरावाला**
- 'गोपाळ दुखंडे' एका लढवय्या कार्यकर्त्याची अखेर / १४
  **प्रवीण बांदेकर**

**निमित्त**
- 'कुसुमानिल' द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने / १८
  **डॉ. अनंत देशमुख**

**गर्जे मराठी**
- बदलत्या जगाच्या क्षितिजावर भारताचा नवा उदय / २४
  **डॉ. रघुनाथ माशेलकर** शब्दांकन : **प्रसाद हावळे**

**चित्रबोली** / २७
मांडणी : **सतीश भावसार**
छायाचित्रे : **नंदकुमार पाटील**

**विशेष**
- विजय सातपुते यांच्या निवडक कविता / ३६
- 'आकाशवाणी' पुढच्या पिढ्यांचा विचार असणारं माध्यम / ३८
  **उमा दीक्षित**

**साहित्यवेध**
- सामाजिक स्वातंत्र्याच्या संदर्भात 'गोलपिठा'चे आकलन / ४०
  **डॉ. राजेंद्र करनकाळ**

- ब्रिटिश हिलरी हरली / ४४
  **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
- अमेरिकेत मराठी साहित्य-संस्कृतीचा जागर / ४२
  **अभिजित हेगशेट्ये**
- ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५१
- ग्रंथपाने – **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ५४
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ५५

## संपादकीय...

काय असतं कलावंतपण? कसा पाहतो कलावंत जगाकडे? काय हवं असतं त्याला आयुष्याकडून? काय द्यायचं असतं त्याला जगाला? त्याच्यात असं काय वेगळं असतं ज्यामुळे तो समाजाला विचित्र वाटतो, कदाचित वेडादेखील! आणि अनपेक्षितपणे तो जगाचा निरोप का घेतो?

'ऑल आय वॉंट टु डू इज बी मोअर लाईक मी अॅन्ड लेस लाईक यू' हे चेस्टर चार्ल्स बेनिंग्टन या अॅरिझोनामधील सुप्रसिद्ध संगीतकार, कवी, गायकाचे गाणे. बेनिंग्टनने या जुलैमध्ये अवघ्या चाळिशीच्या टप्प्यावर जगाचा निरोप घेतला. त्याने स्वत:ला संपवले, अनेक प्रश्नचिन्ह समोर ठेवून!
त्याचा 'लिंकिन पार्क' बॅंड यशाच्या अत्युच्च शिखरावर होता. वैफल्य, मनोविकार, ताणतणाव या भावनांना वाट मोकळी करून देऊन जगण्याचा उत्साह वाढवणारी गाणी हे त्याच्या बॅंडचे वैशिष्ट्य होते. तरुणाईला सावरणारी, चुकीच्या निर्णयांपासून परावृत्त करणारी गाणी सादर करणाऱ्या या गायकाने अनेकांना मृत्यूपासून वाचवले पण तो स्वत: मात्र स्वत:ला मरणाच्या दारात नेण्यापासून रोखू शकला नाही.

अभिनेत्री मीनाकुमारीची कविता स्मरते आहे. ती म्हणते,

केवळ माणूसच आहे, जो स्वत:ला
संपवायला तयार होतो...
नाहीतर हे किलबिलणारे पक्षी,
डुलणारी फुलं
मिळालेल्या आयुष्यात इतके दु:खी नाहीत
की आत्महत्या करतील...

काही वेळा माणूस स्वत:ला का संपवू धजतो याची उत्तरे वेगवेगळी असू शकतात. त्याची स्वप्नं, महत्त्वाकांक्षा, इच्छा, हव्यास या दृष्टीने अनेक गोष्टींची गरज त्याला भासते किंवा तोच त्याच्या गरजा वाढवून ठेवतो असे म्हणूया. त्यांच्या अपुरेपणातून नैराश्य येऊ शकतं.

दुसऱ्या बाजूने हेही खरं की प्रेमाचा, आपुलकीचा एखादा ओतप्रोत क्षण आणि विश्वास या दोन गोष्टींचा शोध माणूस आयुष्यभर वेगवेगळ्या नात्यांतून घेत असतो. अवघ्या तरुणाईला हेलावून टाकणाऱ्या बेनिंग्टनच्या लहानपणातील घटना त्याला विस्कटून टाकणाऱ्या आहेत. वयाच्या ११व्या वर्षी झालेला आईवडिलांचा घटस्फोट, सातव्या वर्षीच लैंगिक छळाला सामोरे जावे लागणे (खरे तर त्याचे वडील लैंगिक शोषणाविरोधात काम करणारे गुप्तहेर होते.) टप्प्याटप्प्याने येते गेलेले एकटेपण, त्यातून सुटकेसाठी व्यसनांच्या आहारी जाणे आणि मग बाहेर पडण्यासाठी धडपड, स्वत:ला व्यक्त करण्याकरता चित्र-गाणी अशा वाटांचा शोध...

कलेच्या निर्मितीचा प्रवास दु:खाच्या-अस्वस्थतेच्या बीजांतून होतो का? ही दु:खं, घुसमट सामाजिकही असतेच. वॉशिंग्टन येथे जन्मलेल्या कर्ट कोबेन या गायक कलावंताचे उद्‌गार असे आहेत :

'Thanks for the tragedy.
I need it for my art.'

कर्ट कोबेन हा गायक, कवी, गिटारवादक आणि संगीतकार होता. त्याच्या 'निर्वाना' बॅंडमुळे तो जगभरातील तरुणाईच्या गळ्यातला ताईत बनला. आईवडिलांच्या घटस्फोटाची झळ त्यालाही बालपणीच पोचली. शालेय जीवनात त्याच्या वाट्याला खूप एकटेपण आले. तो विचित्र वागायचा असे इतरांना वाटायचे म्हणून ते त्याला 'गे' म्हणून हिणवायचे. कर्ट समलिंगत्व, स्त्रीवाद यांचा प्रचंड आदर करणारा होता. इतका की रस्त्यावरच्या वाहनांवर 'गॉड इज गे' असं लिहिताना तो पकडला गेला. तो म्हणायचा, ''आपण मुलींना स्वसंरक्षणाचे धडे शिकवतो. पण मुलांना आधी आपण 'नॉट टु रेप' शिकवणे अधिक गरजेचे आहे. आईबाबांच्या घटस्फोटानंतर तो बाबांसोबत राहत होता पण सावत्र आईने त्याला बाहेर काढल्यानंतर बेघरपणामुळे त्याला सतत 'होमलेसनेस', प्रचंड असुरक्षितता जाणवत असे. पौगंडावस्थेत तोही व्यसनांच्या आहारी गेला होता. आयुष्यात अनुभवलेल्या वेगवेगळ्या क्षणांवर त्याने गाणी रचली. बेघर अवस्थेत नदीच्या पुलाखाली राहावे लागण्याच्या अनुभवातूनच त्याचे 'समथिंग इन द वे' हे गाणे निर्माण झाले.

माय ॲनिमल्स आर ट्रॅप्ड
दे हॅव बिकम माय पेट्स

''माझी जनावरं मी कैद करू शकलोय. ती आता पाळीव झाली आहेत'' असं भाष्य स्वत:मधल्या विकृतींवर करणारा कर्ट स्वत:च्या एकाकीपणाच्या पोकळीला भरू शकला नाही. वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी त्याने स्वेच्छेने जग सोडून जाण्याचा निर्णय घेतला.

आपल्या बँडच्या माध्यमातून माणसांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करणारे हे दोन गायक! संगीत ही एक 'थेरपी', एक मानसोपचार आहे ही चर्चा अलीकडे प्रकाशझोतात आहे; पण मग स्वत: तो कलावंत का अस्वस्थ राहतो? बेनिंग्टनच्या मृत्यूनंतर त्याच्या गाण्यावर प्रेम करणारी जगभरातली तरुणाई हळहळते आहे, ''ज्या माणसाने आम्हाला वाचवले त्यालाच आम्ही का वाचवू शकलो नाही?''

आय वॉन्ना हील, आय वॉन्ना फील
व्हॉट आय थॉट, वॉज नेव्हर रिअल
आय वॉंटेड ऑल अलॉंग, समव्हेअर आय बिलॉंग

नुकत्याच काळाच्या पडद्याआड गेलेल्या बेनिंग्टनच्या गाण्याचे हे शब्द कलावंताच्या मनाची तगमग व्यक्त करणारे! अज्ञात 'समव्हेअर'ची व्याकुळ ओढ प्रकट करणारे!

फ्रेंच चित्रकार तुलुझ लोत्रेक हा सरदार घराण्यात जन्माला आलेला..... पायांच्या पांगळेपणामुळे सतत हिणवला गेलेला... इतकेच काय घरानेही त्याला पोरके केलेले...हा माणूस उच्चवर्गीय लोकांमध्ये कधी रमला नाही. साध्यासुध्या उपेक्षित माणसांबद्दल त्याला खूप जिव्हाळा होता. दारुच्या गुत्त्यांवर काम करणाऱ्या बायका नाचणाऱ्या नृत्यांगना अशा नाडल्या गेलेल्या स्त्रियांच्या भावविभोर डोळ्यांचा, त्यांच्या दु:खांचा वेध त्याने चित्रांमधून घेतला. वेश्यागृहे, गुत्ते, सर्कशीचे तंबू अशी ठिकाणे फिरून त्याने माणसांच्या चेहऱ्यामागची वेदना शोधली. व्यवहारी चतुरपणापासून कोसो दूर असणारे असे कलावंत आणि त्यांचे आयुष्य खरोखरच वेगळे. जगणे-मरणे या प्रवासाचा अर्थ ते स्वतंत्रपणे शोधतात.

फणीश्वरनाथ रेणूंच्या 'तिसरी कसम' या कथेवर अतिशय वेगळ्या धाटणीचा चित्रपट निर्माण करणारा कवी शैलेंद्र आपले सारे काही 'तिसरी कसम' या चित्रपटावर पणाला लावतो. शैलेंद्र त्याच्या एका कवितेत म्हणतो,

आदमी मरने के बाद कुछ नहीं सोचता
आदमी मरने के बाद कुछ नहीं बोलता
कुछ नहीं सोचने और कुछ नहीं बोलनेपर
आदमी मर जाता है...

कलावंत त्याच्या चित्रांतून, त्याच्या गाण्यातून, त्याच्या शब्दांतून, त्याच्या स्वरांतून खूप काही सांगू पाहतो, तो निरंतर बोलत राहतो. आयुष्याचा, मानवी जीवनाचा, माणसांचा आणि समग्र जगाचा तो सतत विचार करत राहतो. तो जगण्याशी झटापट करणाऱ्या माणसांचा कैवारी असतो. तो इतरांना सोबत असण्याचा आधार देतो. जगाला समाधानाचा, शांततेचा एक क्षण तरी आपल्याकडून मिळावा ही त्याची अनिवार इच्छा असते. तो मरूनही जिवंत रहतो.

उडिया भाषेतील कवी-लेखक सीताकांत महापात्रा यांच्या शब्दात सांगायचं तर-

याच विश्वासावर लिहितो आहे की
माझ्या नसण्यानंतर कदाचित
माझे शब्द कुणाला ना कुणालातरी
सांत्वनेचे सूर ऐकवतील
कुणीतरी म्हणेल
जीवनावर प्रेम करत होता हा माणूस!

**- डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966@gmail.com

## भावांजली

स्मृतिशेष मेहरुन्निसा दलवाई, प्रा. गोपाळ दुखंडे, प्रा. मधुकर तोरडमल, अभिनेत्री उमा भेंडे, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर



# दलवाई भाभी
# कृतार्थ आणि समर्पित जीवन

## डॉ. शमसुद्दिन तांबोळी

**क्रां**तिकारी विचारवंत, समाजसुधारक आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या पत्नी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेहरुन्निसा दलवाई यांचे पुण्यातील राहत्या घरी दि. ८ जून २०१७ रोजी निधन झाले. जरी मृत्यू समयी त्यांचे वय अठ्ठ्याऐंशी वर्षे असले तरी त्यांच्या निधनाची बातमी अनेकांसाठी धक्कादायक होती. त्या आजारी असल्याचा किंवा कार्यमुक्त झाल्याचा अनुभव नसल्याने आणि ३ मे या हमीद दलवाई यांच्या चाळिसाव्या स्मृतिदिनी त्या ज्या उत्साहाने कार्यक्रमात वावरत होत्या, ते पाहिल्यावर त्यांचे अचानक निघून जाणे हे आश्चर्य असले तरी त्यांचा मृत्यू त्यांच्या अंगभूत स्वभावाला साजेसा होता. दलवाईंनंतर यथाशक्ती, पारदर्शकपणे जे जे करणे शक्य होते ते त्यांनी कोणताही हातचा न ठेवता केले. त्या अर्थानेही त्यांचे आयुष्य 'भरून पावलेले' होते.

खरं म्हणजे हमीदभाई आणि मेहरुन्निसा भाभी यांचं व्यक्तिमत्त्व आणि जडणघडण हे दोन ध्रुवच म्हणावे लागतील. कारण भाभी यांचा जन्म पुण्यातला, आर्थिक स्थिती बऱ्यापैकी, वडील भारतीय सैन्यात नोकरीला, उर्दू भाषिक, पारंपरिक कुटुंब आणि सामाजिक वातावरणापासून दूर असलेल्या, तर हमीदभाई चिपळूण जवळच्या मिरजोळी या खेड्यातील, कोकणी मराठी भाषा बोलणारे, आर्थिक स्थिती फारच बेताची, कुटुंब जरी पारंपरिक असले तरी वयाच्या चौदाव्या वर्षापासून राष्ट्रसेवादलाच्या संस्कारात वाढलेले आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व. पुण्यातील प्राथमिक वास्तव्यानंतर भाभी मुंबईत आल्या आणि १९५४ मध्ये त्या 'ऑल इंडिया खादी मिशन'मध्ये नोकरीसाठी रुजू झाल्या. या काळात हमीदभाईंचे कथालेखन सुरू होते. मराठवाडा, सत्यकथा, किर्लोस्कर, मौज यांसारख्या प्रतिष्ठित नियतकालिकांमधून दलवाईंच्या कथा प्रसिद्ध होत आणि एक साहित्यिक म्हणून महाराष्ट्रात त्यांचा चाहतावर्गही निर्माण झाला होता. काही लेख आणि 'कफनचोर' कथा वादग्रस्त ठरल्यामुळे दलवाई प्रसिद्धीस आले, ते पण एक बंडखोर लेखक म्हणून. राष्ट्रसेवादलाच्या संस्कारातून घडलेला पिंड आणि समकालीन प्रबोधनाच्या चळवळीमुळे दलवाई अंतर्मुख होऊन मुस्लिम समाजातील अनिष्ट प्रथांकडे पाहू लागले. मुस्लिम समाज प्रबोधनाचे चिंतन त्यांच्या कथांमधून प्रकट होत होते.

मेहरुन्निसा नावाची एक मुस्लिम मुलगी 'ऑल इंडिया खादी मिशन'मध्ये नोकरी करतेय हे हमीदभाईंना समजल्यानंतर फार आनंद झाला. त्यांना भेटण्यासाठी हमीदभाई खादी मिशनमध्ये जाऊनही आले मात्र भाभी रजेवर असल्यामुळे त्या भेटू शकल्या नाहीत. मात्र भाभींची मैत्रीण उषा यांना ते भेटले आणि परत येतो असा निरोप दिला. उषाताईने हा निरोप देत असतानाच, ''हा हमीद मुलगा देखणा आहे, साहित्यिक आहे व त्याच्या मनात तुझ्याविषयी काहीतरी वाटत असेल'', असेही कळवले. पुढे उषाताईंच्या मध्यस्थीनेच मेहरुन्निसा-हमीदभाई यांची भेट झाली आणि पहिल्या बैठकीतच हमीदभाईंनी भाभींकडे लग्नाची मागणी केली. भाभींच्या दृष्टीने हे अनपेक्षित होते पण इतका मोकळा, सरळ स्वभावाचा तरुण कोणतेही अभिनिवेश-औपचारिकता न बाळगता 'मागणी' घालतोय याचा सकारात्मक परिणाम झाला आणि हमीदभाई-मेहरुन्निसाभाभींनी आयुष्यभर एकमेकांची साथ देण्याचे नक्की केले. यावेळी दलवाई म्हणाले होते, ''मला आज काही नोकरी नाहीय पण एक काम करायचं. आज घर जे आहे, संसार जो आहे तो तुझा. तो कसा चालवायचा ते तू ठरवायचं. मी त्याच्यात दखलसुद्धा देणार नाही, तुला विचारणार सुद्धा नाही. मला समाजकार्य करायचंय... मला लिहायचंय. माझ्या डोक्यात खूप आहे, ते मला करायची मोकळीक मिळाली पाहिजे...'' अनेक प्रकारच्या अडचणींतून मार्ग काढून १६ जुलै १९५८ रोजी मेहरुन्निसा-हमीदभाईंचे धार्मिक पद्धतीने लग्न झालं. हमीद दलवाईंच्या सुधारणावादी विचारांनुसार-मुस्लिम व्यक्तिगत कायद्यांतर्गत धार्मिक पद्धतीने झालेला 'निकाह' पुरेसा नव्हता. म्हणून हमीदभाईंनी पुन्हा एक महिन्याच्या अंतराने ४ ऑगस्ट १९५८ मध्ये नोंदणी पद्धतीने रजिस्टर मॅरेज (विशेष विवाह कायदा १९५४) केले. वयाच्या पंचविशीमध्ये हमीदभाईंनी नोंदणी विवाहाचा जो आदर्श घालून दिला तो मुस्लिम सत्यशोधक मंडळ आजही अनुकरणीय मानतो. मुस्लिम विवाहितांनी या कायद्यांतर्गत विवाहनोंदणी करण्याचे हे भारतातील पहिले उदाहरण असेल.

मेहरुन्निसाभाभी हमीदभाईपेक्षा दोन वर्षांनी मोठ्या होत्या.

हमीदभाईंचे सावत्रभाऊ हुसेन दलवाई तेव्हा चौथीत शिकत होते. हमीदभाईंना इच्छा असूनही उच्च शिक्षण घेता आले नाही परंतु हुसेनभाईंना त्यांनी बी.ए.पर्यंत शिकवलं. भाभींनी शिकावं असं त्यांना वाटत होतं पण ते शक्य झालं नाही. जात-धर्म याच्यापलीकडे मानवता असते आणि परंपरांच्या चौकटीबाहेर मानवता अधिक शोभून दिसते. याचे धडे दलवाईंनी पदोपदी दाखवून दिले याचं उत्तम उदाहरण म्हणजे भाभी! दलवाई यांनी हुसेनभाईंचा विवाह विख्यात अर्थतज्ज्ञ नलिनीताई पंडित यांची कन्या, शमा पंडित यांच्याशी लावून दिला. पुढे दलवाई दांपत्याच्या दोन्ही मुली कविता आणि इला यांचेही आंतरधर्मीय विवाह झाले व त्यांच्याही मुला-मुलींनी आंतरधर्मीय विवाह केले. महात्मा फुलेंना अपेक्षित असणारे 'आदर्श कुटुंब-ज्यात सर्वधर्मीय एकत्र राहतील' असे कुटुंब मेहरुन्निसा व हमीदभाईंच्या प्रेरणेतून दलवाई परिवारात झाले. माझ्या माहितीप्रमाणे मुस्लिम कुटुंबातील हे एकमेव उदाहरण असेल. खरं तर या कुटुंबाला फक्त तांत्रिक दृष्टीनेच 'मुस्लिम' म्हणता येईल. हे तर एक 'मानवता सदन' आहे.

ध्येयवादी सुधारकांच्या जीवनात 'वचन-वर्तन-सुसंगता' हे एक सूत्र असते, आणि या सूत्रावरच हमीदभाई आणि भाभींचे खाजगी व सामाजिक जीवन आधारित होते. मराठी भाषा, शिक्षण, कुटुंबनियोजन, धर्मनिरपेक्षता, धर्म, या जीवनमूल्यांबरोबरच आपल्या मृत्यूनंतरही हमीदभाईंनी धार्मिक विधी नाकारून विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्याचे मृत्यूपत्रात लिहिले त्याचप्रमाणे मानवता मूल्यांशी शेवटच्या श्वासानंतरही प्रामाणिक राहून, आपल्या निधनानंतर कोणत्याही स्वरूपाचे धार्मिक संकार न करता देहदान करण्याची इच्छा भाभींनी व्यक्त केली होती, त्यानुसार हडपसर येथील साने गुरुजी रुग्णालयात भाभींचे देहदान करण्यात आले.

भाभी आणि हमीदभाईंच्या सहजीवन काळात अनेक संकट आणि कसोटीचे क्षण आले. १९६६ मध्ये 'इंधन' कादंबरीस राज्यशासनाचा पुरस्कार मिळाला. पुरस्कारानंतर खरं तर आनंद आणि पुष्पगुच्छ मिळत असतात. भाभींना मात्र आपल्याच गावकऱ्यांचा रोष पत्कारावा लागला. 'इंधन' या कादंबरीबद्दल लोकांनी-लोकांचे कान भरले आणि गावकऱ्यांनी दलवाई कुटुंबियांवर बहिष्कार घातला. घरावर दगडफेक केली, हल्ले केले परंतु या सर्व प्रसंगाचा त्यांनी अगदी स्थितप्रज्ञ वृत्तीने स्वीकारच केला. १९६६ मध्ये हमीदभाईंनी सात महिलांना सोबत घेऊन महाराष्ट्र विधानसभेवर तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला या अमानवी प्रथा रद्द करून समान नागरी कायदा आणावा अशी मागणी करणारे निवेदन मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना दिले. या सात मुस्लिम महिलांमध्ये मेहरुन्निसा दलवाई यांचाही समावेश होता.

हमीद दलवाई यांनी १९६८ मध्ये प्रा. अ.भि. शहा यांच्यासोबत 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली. तसेच 'सदा-ए-निलवाँ' ही महिलांची संघटना उभी केली. या काळात राज्य आणि देशभर व देशाच्या सीमा भागात प्रवास केला. २२ मार्च १९७० रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. पुस्तकांचे लेखन, व्याख्याने, आंदोलने, परिषदा या चालूच होत्या. भाभी या उपक्रमात यथाशक्ती सहभाग नोंदवून होत्याच परंतु त्यांना नोकरी करून कुटुंब चालवणे, दोन्ही मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देणे, घरी येणाऱ्या कार्यकर्त्यांची विचारपूस व देखभाल करणे याही गोष्टी कराव्या लागत. या सर्व गोष्टींचा ताण दूर करण्यासाठी दलवाईंनी रुबिना व इला या दोन्ही मुलींना लोणावळ्याच्या 'गुरुकुल'मध्ये निवासी शिक्षणासाठी ठेवण्याचा निर्णय घेतला. कार्यकर्ता म्हणून कार्य करणे हा एक आनंददायी जीवनक्रम असू शकतो परंतु कार्यकर्त्याची पत्नी होऊन नोकरी, कुटुंब आणि नातेवाईक या सर्वांच्या जबाबदाऱ्या कर्तव्यभावनेने पूर्ण करणे हे फार थोड्यांनाच शक्य होत असतं. भाभींनी मात्र ही जबाबदारी कुशलपणे पार पाडली. असे अनेक क्षण आहेत की ज्या वेळी दमछाक होते. ही दमछाक पत्करून कसोटीच्या क्षणी स्वतःला अधिकाधिक सिद्ध करणे हे फक्त भाभीच करू शकतात.

हमीदभाईंच्या चळवळीच्या काळातील आव्हाने असोत किंवा हमीदभाईंच्या शेवटच्या काळातील आजारपण असो. हिंमत न हारता भाभींनी कर्तव्यपालन केले. दलवाईंच्या मूत्रपिंडाच्या आजारपणातील डायलिसिस व जसलोक हॉस्पिटलमधील काळात भाभींनी नोकरी-कुटुंब-आजारपण या सर्वांना कशा पद्धतीने तोंड दिले असेल याची कल्पना केली तर एकूणच भयावह चित्र डोळ्यांपुढे उभं राहतं. या काळातील सर्वात मोठा प्रसंग म्हणजे 'हमीद दलवाई यांच्या मृत्यूपत्राची अंमलबजावणी करणे'. ३ मे १९७७ रोजी दलवाईंचे वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी म्हणजे सहजीवनाच्या विसाव्या वर्षी निधन झाले. दलवाईंनी आपल्या मृत्यूपत्रात लिहिले होते की, ''मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी न करता विद्युतदाहिनीत देह जाळावा, कोणतेही शोक प्रस्ताव किंवा श्रद्धांजलीपर भाषणे करू नये...'' नातेवाईक, गावाकडची माणसं या गोष्टींसाठी तयार होत नव्हते मात्र भाभींनी दलवाईंची अंतिम इच्छा पूर्ण करण्याचा मनोदय व्यक्त केला. प्रा. अ.भि. शहा, मा. शरद पवार, मा. गोविंदराव तळवलकर यांनीही भाभींच्या इच्छेचा मान राखून दलवाईंच्या इच्छेप्रमाणे अंत्यविधी पार पाडला. कोणत्याही निर्णायक क्षणी 'पांढरे निशाण' भाभींनी दाखवले नाही. हे असामान्य धाडस भाभींच्या व्यक्तिमत्त्वातून व्यक्त होऊ शकले यालाही कारण हमीद दलवाईच होते. महिलांनी एकटे राहावे, निर्भय राहावे, मागे पडता कामा नये हे सांगत असतानाच भाभींना तसे वागण्यासाठी भाग पाडण्याचे श्रेय हमीदभाईंकडेच जाते.

दलवाईभाभी एक उत्तम नोकरदार, गृहिणी व कुटुंबचालक म्हणून वावरत असताना दलवाईंच्या विविध सार्वजनिक कार्यक्रमात उपस्थित राहायच्या. मात्र मुस्लिम सत्यशोधक मंडळ, समाजाचा अभ्यास, वाचन, भूमिका या बाबतीत त्या अनभिज्ञ होत्या. मात्र दलवाईंच्या मृत्यूनंतर त्यांच्या चळवळींनाच वाहून घेऊन भाभींनी जे योगदान दिले ते अविस्मरणीय आहेच शिवाय दलवाईविचार




चिरंतन ठेवण्यासाठी केलेले प्रयत्नही महत्त्वाचे आहेत. दलवाई यांच्या मृत्यूनंतरची चाळीस वर्षे भाभींनी सार्वजनिक कार्यासाठी वाहून घेण्यासाठी वेचली.

१९८५ मध्ये शहाबानो प्रकरण केंद्रस्थानी होते. मुस्लिम जमातवादी शक्ती घड्याळाचे काटे उलट्या दिशेने फिरवायच्या पवित्र्यात होत्या. या काळात सय्यदभाई, मेहरुन्निसा दलवाई, हुसेन जमादार व अन्य कार्यकर्त्यांसमवेत मी सुद्धा शहाबानोच्या समर्थनार्थ कार्यक्रम घेत होतो. पंतप्रधान, राष्ट्रपती, कायदामंत्री यांना निवेदने दिली. १९८६ मध्ये कोल्हापूर ते नागपूर असा तलाक मुक्ती मोर्चा काढण्यात आला. या काळात भाभी अग्रभागी होत्या. मुस्लिम समाजातील प्रबोधनाच्या कार्यात अग्रेसर असणाऱ्यास हमीद दलवाई स्मृती पुरस्कार देण्याची कल्पना पुढे आली. मा. भाई वैद्य यांनीही या कल्पनेचे स्वागत केले. कोणताही खंड न पाडता भाभींनी हा उपक्रम चालू ठेवला. मध्यंतरीच्या काळात त्यांनी हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या मार्फत काही चर्चासत्र व प्रकल्प आयोजित करण्यात आले. मिरजोळी येथील मूळ निवासस्थानी हॉल बांधून तेथे ग्रंथालय सुरू केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हमीदभाईंचे अप्रकाशित साहित्य साधना साप्ताहिकाच्या सहकार्याने पुन्हा प्रकाशात आणले. विखुरलेल्या साहित्याचे संकलन केले. उपलब्ध नसलेल्या साहित्याचे पुनर्निर्माण केले आणि मुस्लिम समाज प्रबोधनाच्या चळवळीस भक्कम असा वैचारिक आधार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांनी २०१७ सालचा सामाजिक कार्यातील जीवनगौरव पुरस्कार हमीद दलवाई यांना घोषित केला. ७ जानेवारी २०१७च्या या कार्यक्रमात डॉ. रामचंद्र गुहा यांच्या हस्ते भाभींनी तो पुरस्कार स्वीकारला. त्यानंतर ३ मे रोजी हमीद दलवाई स्मृतिदिनी आयोजित कार्यक्रमात त्या होत्या. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने तलाकपिडित महिलांची परिषद घेतली त्याही कार्यक्रमात त्या होत्याच. नंतर भावाच्या भेटीसाठी ईलाबरोबर त्या दुबईलासुद्धा जाऊन आल्या.

मेहरुन्निसा दलवाईंनी मध्यंतरीच्या काळात हमीद दलवाईंच्या अप्रकाशित, विस्कळीत व उपलब्ध नसलेल्या साहित्याचे संकलन करून साधना प्रकाशनामार्फत प्रकाशित करण्याचा जणू ध्यासच घेतला होता. ६ जून रोजी त्यांनी साधना कार्यालयात जाण्याचा बेत आखला होता नंतर तो ८ जून रोजी ठरला. दुर्दैवाने ८ जून रोजीच सकाळी अकराच्या सुमारास त्यांचे अचानक निधन झाले. हे निधन त्यांच्या स्वभावाला अनुकूल असेच म्हणावे लागेल कारण त्या आजारी अशा पडल्या आहेत, परावलंबी झाल्या आहेत असे झाले नाही. भाभींचा स्वभाव हा करारी जसा होता तसाच स्वाभिमानी होता. आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये याची त्या काळजी घेत. स्वावलंबी आयुष्य जगण्याचा आग्रह त्यांनी शेवटपर्यंत टिकवून ठेवला. अगदी मृत्यूच्या क्षणी सुद्धा!

दलवाईभाभींनी संकलित केलेल्या हमीद दलवाईंवरील लेखांचे 'अँग्री यंग सेक्युलरिस्ट' या नावाचे पुस्तक तयार झाले होते. तसेच, दलवाईंच्या विविध लेखांचे संकलन असलेले 'कानोसा : भारतातील मुस्लिम मनाचा' ही दोन्ही पुस्तके साधना प्रकाशनाने तयार ठेवली होती. भाभींच्या उपस्थितीत त्याचे प्रकाशन होणार होते, मात्र त्यांच्या अनुपस्थितीत मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या 'हमीद दलवाई स्टडी सर्कल' या साधना मीडिया सेंटरवरील साप्ताहिक बैठकीत या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी भाभींची अनुपस्थिती मनाला हुरहूर लावणारी होती.

भाभींच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचा भाग म्हणजे आर्थिक व्यवहारातील प्रामाणिकपणा! हमीद दलवाई यांची पत्नी असल्याचा रास्त अभिमान बाळगत असताना, आपल्या व्यवहारात या नात्याचा कोणताही लाभ घ्यायचा नाही याकडे त्यांचा कटाक्ष होता. शिवाय आपल्या मुलींनीही स्वकर्तृत्वावर मोठे व्हावे किंवा आर्थिक गरजा भागवाव्यात, दलवाई यांच्या मुली म्हणून कोणत्याही प्रकारचे प्रभाव वापरायचे नाहीत याकडेही भाभी जागृतपणे पाहत होत्या. आपल्या घरात आवश्यक तेवढेच साहित्य असावे यात आराम किंवा देखाव्याच्या वस्तू नसाव्यात याकडेही त्यांनी कटाक्षाने पाहिले. ज्या लोकांशी वैचारिक नाते आहे - जीवनध्येयाशी मिळणारी नाती आहेत त्यांच्याशीच भाभींनी नाते कायम ठेवले.


कोणत्याही जमातवादी व्यक्तींशी त्यांनी कधीही जवळीक केली नाही, कोणता पुरस्कार घेतला नाही किंवा कोणतेही प्रलोभन बाळगले नाही. हमीद दलवाई यांच्या व स्वतःच्या पुस्तकांची रॉयल्टी, पुरस्कारांची रक्कम, तसेच आपल्या पेन्शनची रक्कम सुद्धा त्यांनी हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटला देण्याचा अलिखित नियम केला होता.

हमीदभाई आणि मेहरुन्निसा दलवाई यांचे सहजीवन या संदर्भातील आठवणी 'मी भरून पावले आहे' या पुस्तकात मांडल्या आहेत. या पुस्तकालाही अनेक पुरस्कार मिळाले. हे पुस्तक ८ जानेवारी २०१७ रोजी नव्या स्वरूपात प्रकाशित करण्यात आले होते. यावेळी 'मी सेंच्युरी मारणार' असे भाभी म्हणाल्या होत्या. त्यांची जगण्याची जिद्द आणि त्यातील उर्मी अनेकांसाठी प्रेरणा ठरत होती. भाभी फार मोठ्या साहित्यिक, विचारवंत होत्या असे नाही पण ज्या जीवननिष्ठांवर आपले जीवन जगायचे ते प्रामाणिक असावे. आपल्याला पटले ते करत राहायचे. यात व्यापकता नसली तरी विचारांवर निष्ठा ठेवून सर्वशक्तिनिशी व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात ती व्यक्त करण्यात त्यांनी कधीही कसूर पडू दिली नाही.

मेहरुन्निसाभाभी-हमीदभाईंचे सहजीवन पाहिल्यानंतर भारतीय समाज प्रबोधनाच्या चळवळीतील महत्त्वाच्या सुधारकांची आठवण होते. महात्मा फुलेंनंतर सावित्रीबाई फुले, महात्मा गांधींनंतर कस्तुरबा गांधी यांनी जसे या महात्म्यांच्या मृत्यूनंतर कार्य केले तसे भाभींनी केले. त्यापेक्षाही न्या. रानडे यांच्या मृत्यूनंतर रमाबाई रानडे यांनी जसे कार्य केले त्या तोडीचे कार्य भाभींनी केले. दलवाईंनंतर जवळपास चाळीस वर्षं आयुष्य दलवाईविचार रुजविण्यासाठीच वापरले. रमाबाईंनी 'आमच्या आयुष्यातील आठवणी' हे पुस्तक लिहिले तर भाभींनी 'मी भरून पावले आहे' हे आत्मचरित्र लिहिले. दलवाईंच्या मृत्यूनंतर भाभींना आपल्या क्षमता व आंतरिक शक्तीचा साक्षात्कार झाला. त्यानुसार त्या उर्वरित आयुष्य जगल्या. मुस्लिम सत्यशोधक चळवळीची ज्योत मावळू दिली नाही. ही ज्योत आता आमच्यासारख्या नव्या दमाच्या कार्यकर्त्यांच्या हाती दिली आहे. ती ज्योत अधिक प्रकाशित करून नव्या पिढ्यांच्या स्वाधीन करण्याची आमची जबाबदारी आहे. ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे हीच मेहरुन्निसाभाभी आणि हमीद दलवाई यांना खरी आदरांजली ठरणार आहे.

**- डॉ. शमसुद्दीन तांबोळी**
अध्यक्ष, मुस्लिम सत्यशोधक मंडळ
भ्रमणध्वनी : ९८२२६७९३९१
tambolimm@rediffmail.com

**॥ग्रंथाली॥**





## प्रकाशाचे बेट - अनुराधा गोरे

आपल्या सर्वसामान्य माणसांच्या कोषापलिकडचं जग वेगळं आणि अनोळखी असतं. गरिबी, बेकारी, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात अडकलेल्या तरुण-तरुणींचं ज्यांना शाळेत जायला जमलंच नाही वा शाळा मधूनच सोडावी लागली अशांचं. यांच्या भविष्यात अंधार असतो. त्यांची छोटी स्वप्नही साकार करणं म्हणजे असते लढाई. असे युवक-युवती जेव्हा 'केसवा'च्या 'युवा परिवर्तन'च्या संपर्कात येतात तेव्हा त्यांचे विचार बदलतात, आचारात परिवर्तन होते, स्वप्नं सत्यात आणण्याचं बळ त्यांना मिळतं. नवं आकाश त्यांना खुणावतं. अशा युवक-युवतींच्या कथा वाचा 'प्रकाशाचे बेट'मध्ये.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## मुक्या जंगलाची गर्जना - अर्जुन व्हटकर




जंगलातील मुका जीव आणि मायमातीची मशागत करणारे मातीमोल होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. माणूस देखील 'डेंजर झोन'मध्ये आहे. माणूस सृष्टीतून हद्दपार झाला पाहिजे. जंगलजीव जगला पाहिजे हा अर्जुन व्हटकरांच्या 'मुक्या जंगलाची गर्जना' या कथासंग्रहाचा गाभा आहे. अर्जुन व्हटकरांना पर्यावरणाविषयी अतीव कणव आहे. जंगल व जंगलातील मुक्या जीवाच्या वाचेला भाषारूप देऊन त्यांचा उद्रेक शब्दरूपात प्रकट केला आहे. या कथा वाचकांना अंतर्मुख व विचारप्रवण करतील.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# 'मी भरून पावले आहे'
# मेहरुन्निसा दलवाई

## मीनाक्षी दादरावाला



मराठी साहित्यात स्त्रियांच्या आत्मचरित्र लेखनाची परंपरा जुनी आहे. पतीचरित्र किंवा सहचरित्र यांतून आत्मचरित्र असाही एक आकृतिबंध स्त्री आत्मचरित्रकारांनी रूढ केला. पतीच्या जीवनाशी आपल्याकडील स्त्रीच्या जीवनाचा गोफ घट्ट विणला गेला आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत आपले बाह्य जीवन आणि आपले आंतरिक विश्व यांचा ताबा पतीने कसा घेऊन टाकला आहे याचे भान स्त्रियांना आले; पतीसमवेत असलेल्या बाह्य आणि आंतर संवाद-विसंवादातून आत्मचरित्राचा घाट आकाराला आलेला दिसतो. सहचरित्रातून आत्मचरित्र असा मराठीतील बहुसंख्य स्त्रीलिखित आत्मचरित्रांचा रूपबंध राहिला आहे. 'रास' - सुमा करंदीकर, 'बंध अनुबंध' - 'कमल पाध्ये', 'आहे मनोहर तरी' - सुनीता देशपांडे, 'सांगायची गोष्ट म्हणजे' - हिरा दया पवार अशा काही आत्मचरित्रांचा येथे उल्लेख करता येईल.

८ जून २०१७ रोजी मेहरुन्निसा दलवाई यांचे निधन झाले. 'मी भरून पावले आहे' या त्यांच्या आत्मकथनाची पाचवी आवृत्ती अलीकडेच 'साधना' प्रकाशनाने प्रसिद्ध केली. हमीद दलवाई आणि 'साधना' साप्ताहिक यातील स्नेहबंध अतूट होता. १९५७ ते १९७७ अशी वीस वर्षे 'साधना'चा भरभक्कम पाठिंबा हमीदभाईंना होता. त्यांचे बरेच वैचारिक लेखन 'साधना' साप्ताहिकातून प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे मेहरुन्निसाबाईंच्या आत्मकथनावरही 'साधना'ची मोहोर उमटणे अपरिहार्यच होते.


बाईंचे शिक्षण उर्दूमधून झाले. लिहिण्या-वाचण्याचाही तसा फारसा सराव नाही. त्यांनी निवृत्तीपर्यंत खादी कमिशनमध्ये नोकरी केली. हमीदभाईंसारख्या तळमळीच्या समाजकार्यकर्त्या-बरोबर त्यांनी संसार केला. दलवाई हयात असताना त्यांना पूर्णपणे समजून घेण्याइतकी फुरसतच त्यांच्यापाशी नव्हती. न संपणाऱ्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे होते. मात्र १९७७ मध्ये दलवाईंचे निधन झाल्यानंतर त्यांच्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाची धुरा सांभाळताना आपल्या एकोणीस वर्षांच्या सहजीवनाच्या आठवणी अशुद्ध मराठीत का होईनात, कोणाला तरी सांगाव्यात ही ऊर्मी बाईंच्या मनात जागी झाली आणि प्रसिद्ध लेखिका सरिता पदकी यांच्या मदतीने त्या आठवणी शब्दांकित झाल्या. मेहरुन्निसाबाईंची बोलभाषा जशीच्या तशीच राखण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे, त्यामुळे सरिता पदकी यांनी या आत्मकथनाला 'बोलपुस्तक' असेही म्हटले आहे. मराठीमध्ये आलेले मुस्लिम महाराष्ट्रीय स्त्रीचे हे पहिलेच आत्मकथन म्हणावे लागेल. आयुष्याच्या अखेरीस दलवाई यांनी 'मेहरू, मी जो काही आहे तो तुझ्यामुळेच' अशी कृतज्ञतेची पावती बाईंना दिली. मेहरुन्निसाबाईंना त्यांनी कधीही गृहीत धरले नाही. समाजकार्याच्या क्षेत्रात पूर्ण वेळ झोकून दिल्यामुळे बाईंना प्रत्यक्ष घरकामात जरी मदत करता आली नाही तरी त्यांना फार तोशीस पडणार नाही याची काळजीही त्यांनी घेतली. आपल्यासाठी तिनं जे काही केलं, त्याला मनापासून पावती दिली. त्यामुळेच मेहरुन्निसाबाईंनीही 'मी भरून पावले आहे' असे कृतज्ञतेचे उद्गार काढले आहेत.

या आत्मकथनाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. पूर्वार्धामध्ये बाईंनी आपले बालपण, आई-वडील, भावंडे यांच्याबद्दल सांगितले आहे. बाईंचा जन्म पुण्यातला. १९३० सालचा. त्यावेळी त्यांचे सगळे कुटुंबच पुण्याला राहत होते. आजीकडे त्यांचे लहानपण गेले. आजीने आपल्याला घरातला एक मुलगाच समजून वाढवले हे त्यांनी मुद्दाम नमूद केले आहे. अतिशय मोकळ्या वातावरणात त्यांचे बालपण गेलेले आहे. आजीने कोणत्याही प्रकारची बंधने त्यांच्यावर लादली नव्हती. आजोळच्या घरी उत्तम शैक्षणिक पार्श्वभूमी होती. मेहरुन्निसाबाईंचे काका आणि शिक्षणक्षेत्रातील मान्यवर मालिनीताई पाणंदीकर यांचा आंतरधर्मीय विवाह त्या काळात 'खान-पाणंदीकर' या नावाने खूप गाजला होता. साधारणपणे मुस्लिम घरामध्ये दिसणारे कट्टर धार्मिक वातावरण आमच्या घरात नव्हते हे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. त्यांच्या अँग्लो उर्दू स्कूल मध्ये आणि शुक्रवारी घरात नमाज पढणे मात्र सक्तीचे असे. त्यांची आई मात्र अतिशय धार्मिक वृत्तीची होती. परंतु 'पहिल्यापासून मी कुठलीही गोष्ट सहजासहजी मान्य केलेली नाही' असे मेहरुन्निसाबाई म्हणतात. त्यामुळे आईची धार्मिक सक्ती त्यांनी स्वतःवर लादून घेतली नाही. लष्करात असलेल्या वडिलांना मात्र धर्माची फारशी माहिती नव्हती असाही त्यांनी उल्लेख केला आहे. त्यामुळेही कदाचित त्यांनी

फार गंभीरपणे धर्माला घेतले नसावे.

आईचा स्वभाव अतिशय रागीट होता. त्यामुळे लहान असताना तिच्याविषयी प्रेम वाटण्याऐवजी भीती वाटे, परिणामी पुढेही आईमध्ये आणि त्यांच्यात एक भावनिक दुरावा राहिला. आजोळच्या घरात शिक्षणाची परंपरा असल्याने त्यांच्या शालेय शिक्षणात अजिबात अडथळा आला नाही. पुण्याला आजीकडे असताना हिंदू-मुसलमान असा भेद घरात पाळला जात नसे, कारण अवतीभोवती सर्व कष्टकरी हिंदू मंडळींची घरे होती आणि आजी कुशल सुईण असल्याने तिच्याकडे त्या लोकांचे जाणे-येणे असे. नकळतच मेहरुन्निसाबाईंवर धार्मिक समानतेचे संस्कार त्या अजाणत्या वयात झाले. १९४९ मध्ये एस.एस.सी. झाल्यानंतर वाडिया कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. मात्र शाळेचे उर्दू माध्यम आणि कॉलेजातील इंग्रजी माध्यम हा तोल त्यांना सांधता आला नाही, परिणामी इंटरमिजिएट मध्ये अपयश आल्यानंतर त्यांचा महाविद्यालयीन शिक्षणासंदर्भातील रस आटला आणि त्या आई-वडिलांकडे मुंबईला आल्या. दोन वर्षांतच 'खादी कमिशन'मध्ये नोकरी लागली. आर्थिक स्थैर्य लाभले. तारुण्यसुलभ मन विवाहोत्सुक होते, परंतु कमावता हात घालविण्याची आईची तयारी नसल्याने तिने बाईंच्या लग्नासाठी काहीच प्रयत्न केले नाहीत. 'खादी कमिशन'मधल्या उषा नावाच्या मैत्रिणीने हमीद दलवाईंचे स्थळ सुचविले. तिच्यामुळे 'हमीद मला मिळाला' असे उद्गार त्यांनी काढले आहेत. अर्थातच हमीदभाईंनी स्वतःच्या गरिबीची, गावाकडील कुटुंबाची आपल्यावर असणाऱ्या जबाबदारीची जाणीव अतिशय प्रांजळपणे सुरुवातीच्या भेटीतच बाईंना करून दिली होती. त्यांचा हा निखळ प्रामाणिकपणा बाईंना भिडला. त्या म्हणतात, 'एखादा मनुष्य एवढा फ्रँक असू शकतो की, तो स्वतःबद्दल सुरुवातीला सगळं काही सांगेल? का, तर कोणी सांगत नाही. सगळे लपवतात. नंतर एक एक रहस्य खुलतं आणि बाईला त्रास होतो.' पहिल्याच भेटीत जाणवलेला हमीदभाईंचा पारदर्शी स्वभाव बाईंना आवडला. त्यांच्याशी विवाह करावा असे वाटू लागले, पण गरीब घरातल्या, बेकार आणि त्यांच्या खान घराण्यापेक्षा खालच्या बिरादरीतील फाटक्या माणसाशी बाईंनी लग्न करणे त्यांच्या आईला मान्य नव्हते. पण आपल्या मनाचा कौल घेऊन मेहरुन्निसाबाईंनी हमीदभाईंशी ठरलेल्या तारखेच्या एक दिवस अगोदरच पुण्यात मौलवींसमोर निकाह लावला.

लग्नानंतर हमीदभाई आपल्या आतेभावाकडे महंमद दलवाईंकडे परतले तर बाई आपल्या घरी. विवाहानंतरचे काही दिवस दोघांनी महंमददादांकडेच काढले, कारण हमीदभाईंची स्वतःची अशी जागाच नव्हती. लग्नानंतर लगेचच दोघेजण हमीदभाईंच्या कोकणातील घरी चिपळूण जवळ मिरजोळी या गावी गेले. त्यावेळी तेथील वातावरण बघून बाईंना खूप मोठा सांस्कृतिक धक्का बसला, परंतु प्रेमळ सासरे आणि इतर कुटुंबीयांच्या लाघवी वागणुकीने सर्वांनी त्यांना आपलेसे केले; आणि बाईंनीही आपुलकीने आणि प्रेमाने सर्वांशी जुळवून घेतले. मुंबईला परतल्यावर






'खादी कमिशन'मधील नोकरी, दैनंदिन आयुष्य सुरळीत चालू झाले, मात्र आर्थिक चणचण नेहमीकरिताच होती. बाईंनी या अडचणींचा फारसा बाऊ केलेला दिसत नाही. आपल्या नोकरीच्या आधारे त्यांनी आपला संसार आणि मिरजोळीतील सासर दोन्ही जबाबदाऱ्या स्वीकारल्या, परंतु या सगळ्या आर्थिक, शारीरिक आणि मानसिक ओढाताणीचा परिणाम बाईंवर होऊन त्यांचा गर्भपात झाला. सुदैवाने त्याचवेळी हमीदभाईंना सुरुवातीला रेल्वे स्टोअरमध्ये आणि नंतर दैनिक 'मराठा'मध्ये नोकरी मिळाली. राहायच्या जागा अनेकदा बदलाव्या लागल्या आणि अखेरीस बऱ्याच धडपडीनंतर अंधेरीला जागा मिळाली. आयुष्याला स्थैर्य आले. पत्रकारितेला वाव देणारी दै. 'मराठा'मधील नोकरी, स्वतःचा चिकित्सक स्वभाव आणि सामाजिक प्रश्नांविषयी आस्था यांमुळे हमीदभाईंना सामाजिक प्रश्नांविषयीचे सजग भान तर होतेच पण त्या संदर्भातील त्यांचे वाचनही अद्ययावत होते. बाईंना ते कळायला हवे म्हणून रात्री परतल्यानंतर सोप्या भाषेत त्यांना ते समजावूनही सांगत. आपला मुस्लिम समाज सुधारण्यासाठी ते खूप प्रयत्नशील होते. बाईंच्या आवाक्यात हे सर्व व्याप नव्हते. परंतु त्याची खंत न बाळगता हमीदभाई त्यांना विश्वासात घेऊन सर्व सांगत असत आणि त्यातूनच त्या खऱ्या अर्थाने हळूहळू शिकत गेल्या.

सहजीवनाच्या एकोणीस वर्षांमध्ये 'कुठल्याही प्रकारचा त्रास दलवाईंना आपल्याकडून होता कामा नये, हे लक्षात ठेवून मी चालण्याचा प्रयत्न करीत होते' असे म्हणत घरातील सर्व जबाबदारी स्वतः स्वखुशीने पत्करून त्यांनी हमीदभाईंना समाजकार्यासाठी मोकळे ठेवले. त्यांच्या सहजीवनात मोकळेपणा आणि चांगला संवाद होता. मुलींच्या शिक्षणाचे माध्यम मराठी असले पाहिजे हा हमीदभाईंचा आग्रह मान्य नसूनही त्यांना न दुखवता त्यांनी निर्णय मान्य केला. आत्मकथनातील अनेक प्रसंगांमध्ये बाईंनी हमीदभाईंचा बोलघेवडा स्वभाव, सर्वांशी हसून खेळून वागून लोकांची मने जिंकण्याची प्रवृत्ती, वाचनाची आवड, अभ्यासू वृत्ती, स्वभावातील कमालीचा प्रामाणिकपणा याबद्दल जसे सांगितले आहे तसेच पती म्हणूनही त्यांना बाईंबद्दल किती प्रेम वाटत होते, त्यांची दगदग कमी व्हावी म्हणून घरी असताना ते

कशी मदत करीत हेही सांगितले आहे. त्यांच्यातील प्रेमळ बाप मुलांवरही खूप माया करीत असे. मुलींच्या हितासाठी त्यांना हॉस्टेलवर ठेवण्याचा विचारही हमीदभाईंचाच होता. घरातील सर्वांना आचारविचारांचे स्वातंत्र्य होते. या दोघांनी परस्परांना दिलेला अवकाश हा त्यांच्या सहजीवनाचा फार चांगला असा विशेष म्हणता येईल.

समाजकार्यकर्त्याबरोबर हमीदभाईंमधल्या सृजनशील लेखकाचीही जपणूक बाईंनी आस्थेने केली. 'इंधन' ही हमीदभाईंची अतिशय महत्त्वाची कादंबरी. सत्य घटना आणि काल्पनिक कथानक यांची बेमालूम सरमिसळ त्यात झाली आहे. कथानक आणि पात्रे गावकऱ्यांना ओळखीची वाटली आणि कादंबरीमुळे गाव बदनाम झाल्याची भावना निर्माण झाली. चिपळूणमध्ये निषेधाची सभा झाली. या सर्व जिवावर बेतणाऱ्या प्रसंगांना दोघांनीही धीराने तोंड दिले. हमीदभाईंसारख्या वादळी चैतन्यमय व्यक्तिमत्त्वाला सांभाळण्याचे आव्हान एकोणीस वर्षे बाईंनी समर्थपणे पेलले. याच काळात समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी हमीदभाईंच्या नेतृत्त्वाखाली मुस्लिम महिलांचा मोर्चा निघाला, त्यात बाईही सामील झाल्या. हळूहळू हमीदभाईंच्या समाजकार्यात त्या लक्ष घालू लागल्या. विशेषतः मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जाणून घेण्याची त्यांना विशेष आस्था होती. पूर्णवेळ समाजकार्यकर्ता होण्याचे ठरल्यानंतर बाईंची परवानगी घेऊन हमीदभाई पाच वर्षांनंतर 'मराठा' मधून बाहेर पडले. अ.भि. शहा यांच्या इंडियन सेक्युलर सोसायटीचे हमीदभाई व्हाइस प्रेसिडेंट होते. त्याचवेळी मुस्लिम समाजासाठी सुद्धा एक संघटना असली पाहिजे या विचाराने १९७० मध्ये त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. त्यांच्या कार्याला सुरुवातीला मुस्लिम समाजामधून खूप विरोध झाला, काही ठिकाणी प्रचारसभेमध्ये दंगे-धोपेही झाले, पण हमीदभाई आणि त्यांचे सहकारी महंमद दलवाई बाबूमियाँ बँडवाले, अब्दुल कादर मुकादम आणि इतर अनेक यांनी धैर्याने सगळ्याला तोंड दिले. मंडळाचे काम ऐन भरात असतानाच अनियमित खाण्यापिण्याच्या वेळा, सततचे दौरे यांमुळे हमीदभाईंची तब्येत बिघडली. मूत्रपिंडाच्या विकाराचे निदान झाले. 'जसलोक' सारख्या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल केले. नंतर मूत्रपिंडाचे प्रत्यारोपणही झाले. ही शेवटची दीड-दोन वर्षे बाईंच्या सहनशक्तीची कसोटी घेणारी होती. परंतु जिवाला जीव देणारे अ.भि. शहा, वसंत नगरकर, शरद पवार, महंमद दलवाई, अब्दुल कादर मुकादम, इ. सर्व मित्रांनी बाईंवर फार भार पडू दिला नाही. कॉन्फरन्ससाठी हमीदभाई किडनीच्या प्रत्यारोपणानंतर फिलाडेल्फियाला सुद्धा जाऊन आले, पण नंतर मात्र तब्येत ढासळली आणि ३ मे १९७७ रोजी हमीदभाईंचे निधन झाले.

## राहून राहून मनात येतं...

मी साहित्यिक नाही, लेखिका नाही, मी टीचर नाही किंवा प्रोफेसरही नाही. मराठीचं मला ज्ञान नाही. का तर मी मराठी माध्यमातून शिकलेली नाही. मला लिहिण्याचा व वाचण्याचा छंदही नाही. माझं शिक्षण उर्दूत झालं आहे. तरीसुद्धा मला कैक वर्षांपासून माझ्या अशुद्ध मराठीतच माझ्या शैलीत लिहावंसं वाटत होतं. दलवाईंच्या खूप आठवणी माझ्या मनात साठलेल्या आहेत. त्यांची कुठंतरी नोंद व्हावी असं मला वाटत होतं.

माझं माहेर जगावेगळं, माझं सासर जगावेगळं, माझा संसारही जगावेगळाच. या साऱ्यांबद्दल मला लिहावंसं वाटत होतं. मला असं वाटायचं की माणूस कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही मूडमध्ये, कुठेही आणि कधीही लिहू शकतो. म्हणून तर मी दलवाईंना त्यांच्या अखेरच्या गंभीर आजारपणातसुद्धा लिहायचा आग्रह करीत होते. पण जेव्हा माझ्यावर वेळ आली तेव्हा लक्षात आलं की लिहायचं काम इतकं सोपं नाही!

या सगळ्या कालावधीत जवळच्या सहकाऱ्यांनी, मित्रमंडळींनी खूप मदत केली हे बाईंनी आवर्जून नमूद केले आहे. अफाट लोकसंग्रह हे हमीदभाईंचे श्रेयस होते. या मित्रमंडळींमध्ये वसंतराव नगरकर आणि अ.भि. शहा यांचा पाठिंबा मोलाचा होताच, पण हृद्य चित्रण आले आहे ते शरद पवार आणि त्यांच्या पत्नी यांचे. हॉस्पिटलमध्ये हमीदभाईंना ॲडमिट केल्यानंतर आपल्या बंगल्यावर शरद पवार यांनी बाईंची सोय केली आणि अगदी पाठच्या भावाप्रमाणे लागेल ती मदत केली. पवार वहिनींनी सुद्धा स्वतः स्वैपाक करून बाईंना आग्रहाने खाऊ-पिऊ घातले. सावलीसारख्या त्या बाईंच्या सोबत राहिल्या.

मृत्यूची चाहूल लागल्यानंतर हमीदभाईंनी बाईंना सांगून मृत्यूपत्रामध्ये आपले दहन करावे असे लिहून ठेवले होते. आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी गोविंद तळवलकर, अ.भि. शहा, वसंत नगरकर आणि शरद पवार यांच्यावर जबाबदारी सोपवली होती. दंगा होण्याचा संभव असल्याने मेहरुन्निसाबाई आणि मुली यांना पोलिस संरक्षण मिळायले हवे हेही सजग भान हमीदभाईंना होते. पतीचा अंतकाळ जवळ आला आहे हे बाईंनी शांतपणे स्वीकारले आणि म्हणूनच हमीदभाईंच्या मृत्यूनंतर कोणाकोणाला फोन करायचे त्याची यादी त्यांनी हमीदभाईंच्या उशाशी बसून काहीशा तटस्थपणे केली.

आत्मकथनाच्या उत्तरार्धामध्ये मेहरुन्निसाबाईंनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे काम कसे केले याचा उल्लेख आला आहे. अ.भि. शहा यांनी 'हमीदभाई गेल्यानंतर मेहरुन्निसाभाभींनी रमाबाई रानडे यांच्याप्रमाणे काम केले पाहिजे' अशी अपेक्षा व्यक्त केली होती. बाईंनी सुद्धा स्वतःच्या क्षमतेनुसार मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे काम पुढे नेले. सुरुवातीला सभाधीटपणाच्या अभावामुळे त्यांना महंमद दलवाई भाषणे लिहून देत, पण मग मात्र त्यांनी त्यात प्रावीण्य मिळवले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे काम चालविण्यासाठी आवश्यक तेवढे चळवळीचे आणि इस्लामचे ज्ञान त्यांनी मिळवले. त्यांचा करारी स्वभाव, जबर इच्छाशक्ती, मंडळाशी असणारी निष्ठा यांमुळे आपल्याला पटलेले विचार त्या निर्भीडपणे मांडू शकल्या.

मुस्लिम वस्त्यांमध्ये हिंडून मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, तलाकपीडित स्त्रियांच्या समस्या समजून घेताना घरगुती दाखले देऊन आपले विचार या स्त्रियांपर्यंत त्यांनी पोचवले. त्या स्त्रियांचा इतका विश्वास बाईंनी संपादन केला की त्या त्यांच्या लाडक्या 'आपा' झाल्या. मुंबईबाहेर जाऊनही त्यांनी गावांमध्ये सभा घेतल्या. अलिगढला दंगल झाल्यावर हुसेन जमादार यांच्याबरोबर जाऊन तेथील वस्तुस्थिती त्यांनी समजून घेतली. शाहबानो प्रकरणानंतर तलाकची चर्चा जोरात सुरू झाली. मेहरुन्निसाबाई आणि मुमताज रहिमतपुरे यांनी मुक्ती मोर्चाचे आयोजन केले. या तलाक मुक्ती मोर्चाला स्त्रियांचा प्रतिसाद मिळाला, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हा मोर्चा गेला; नगरला हिंसक जमावाने हल्ला केल्यानंतर मोर्चा स्थगित करावा लागला. त्याचा शेवट दिल्लीला राजीव गांधी आणि तत्कालीन राष्ट्रपती झैलसिंग यांना निवेदन देऊन करण्यात आला. या संपूर्ण मोर्चात बाईंचे व्यक्तिमत्त्व तावून सुलाखून उजळले गेले. शाहबानो प्रकरण आणि बाबरी मशीद प्रकरण या दोन्ही घटना आत्मबळाची परीक्षा पाहणाऱ्या होत्या पण बाई सर्वार्थाने या परीक्षेला सामोऱ्या गेल्या. या कठीण काळात आपला समतोल विचार आणि सद्सद्विवेकबुद्धी त्यांनी शाबूत ठेवली.

हमीदभाईंचे समाजकार्य, मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना, इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटचे काम, हमीदभाईंचे सृजनशील आणि वैचारिक लेखन या त्यांच्या समाजाभिमुख पैलूंची ओळख जशी या आत्मकथनातून होते तसेच फक्त एकोणीस वर्षांच्या या सहजीवनात पती-पत्नींचा संवाद किती खुला आणि मोकळा राहिला याची साक्ष हे आत्मकथन देते. हमीदभाईमध्ये लपलेले एक खट्याळ, निरागस लहान मूल बाईंनी काही प्रसंगांमधून आत्मीयतेने रंगविले आहे.

कमावती पण दबलेली मुस्लीम स्त्री-तरुणी-गृहिणी-पुरोगामी बंडखोर मुस्लिम नेत्याची सहचरी ते पुरोगामी मुस्लिम महिला पुढारी असा मेहरुन्निसाबाईंचा प्रवास या आत्मकथनातून सिद्ध झाला आहे. स्नेहशील सहजीवनाची, ध्येयाने प्रेरित, संघर्षमय वाटचालीची ही गाथा आहे. एकमेकांच्या आयुष्यात गुंतलेले हे सहजीवनाचे धागे मेहरुन्निसाबाईंनी साध्या सरळ ओघवत्या शैलीत, जमेल तसे सांगितले, सरिता पदकी यांनी त्यांच्या बोलण्याची लकब, शब्दांकन करताना तशीच जपली त्यामुळे हे 'बोलपुस्तक' त्यातील साधेपणामुळे, अनाकर्षक शैलीने वाचकाला निश्चितच आकर्षित करते. शीर्षकाप्रमाणेच आत्मकथन वाचून झाल्यानंतर वाचक सुद्धा 'भरून पावतो'; एका अर्थाने समृद्ध होतो.


– मीनाक्षी दादरावाला


भ्रमणध्वनी : ९८३३०५३०३९

meenaxida@gmail.com



**॥ग्रंथाली॥**

## पर्यायी मातृत्व - डॉ. संदीप माने




विज्ञानाच्या आधारे जर आपण वंध्यत्वाशी झुंजणाऱ्या जोडप्यांच्या भावनांचा आदर करू शकत असलो तर आपण त्या विज्ञानाला आणि त्या भावनांना कमी लेखता कामा नये. जर आपण निसर्ग, भावना आणि विज्ञान याचा आदर करत असू तर सरोगसीला विरोध करणे हे अवैज्ञानिक, अनैसर्गिक आणि भावनाशून्यतेचे लक्षण होईल असे मला वाटते. पर्यायी मातांना दिले जाणारे पैसे १५ ते २० वर्षं ठेव स्वरूपात बँकेत ठेवले गेले पाहिजेत. असे जर केले तर त्या पैशांचा अपव्यय न होता त्यांच्या भविष्याकरता, मुलांच्या शिक्षणाकरता त्यांचा उपयोग होऊ शकतो, मात्र त्याला शासकीय मान्यता असायला हवी. माझ्या मते डॉ. संदीप माने यांनी 'सरोगसी' हे पुस्तक अत्यंत उत्तमरित्या लिहून सरोगसी हा गुंतागुंतीचा विषय सोप्या पद्धतीने सगळ्यांसमोर मांडला आहे. त्यामुळे हे पुस्तक अमूल्य आहे. आपण या पुस्तकाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला पाहिजे जेणेकरून समाजाचे प्रबोधन होईल. मी डॉ. संदीप माने यांचे त्यांनी लिहिलेल्या या पुस्तकाबद्दल अभिनंदन करतो.

– कुमार केतकर

**मूल्य १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**



**अभिजित हेगशेट्ये** लिखित

## रानवीचा मळा


**पुस्तक प्रकाशन**

हस्ते : **रंगनाथ पठारे** ● प्रमुख वक्ते : **दिनकर गांगल, प्रा. अशोक बागवे**

**१८ ऑगस्ट २०१७ रोजी, सायंकाळी ६ वाजता**

**स्थळ : रत्नागिरी जिल्हा नगरवाचनालय, जयस्तंभ, रत्नागिरी**

# 'गोपाळ दुखंडे'
# एका लढवय्या कार्यकर्त्याची अखेर



**प्रवीण दशरथ बांदेकर**

**सा**ल असेल दोन हजार पाच किंवा सहा. सावंतवाडीच्या श्रीराम वाचन मंदिरामध्ये आम्ही काही वाचनप्रेमी मंडळी नेहमीप्रमाणे एकत्र जमलो होतो. आठपंधरा दिवसांतून एकत्र येऊन आम्ही काही समविचारी वाचक आवडलेल्या, वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा करायचो. कधी परिसरातल्या समकालीन प्रश्नांवरही चर्चा झडायच्या. बऱ्याचदा राजकीय, सांस्कृतिक वा सामाजिक विषयांवरच्या चर्चा आणि वादावादीलाही साहित्याचे संदर्भ लगडलेले असायचे. त्या दिवशीही अशीच एका पुस्तकाच्या अनुषंगाने चर्चा रंगली होती. जैतापूरमध्ये प्रस्तावित असलेल्या अणुभट्ट्यांच्या संदर्भात मराठीतल्या एका ज्येष्ठ लेखकाने पुस्तक लिहिले होते. त्याच्या संदर्भात चर्चा सुरू होती. त्यातून मग कोकणातील पर्यावरणाचे प्रश्न, मराठी लेखकांचे सामाजिक आणि राजकीय भान, बहुसंख्य लेखकांचा कसलीही भूमिका न घेता गोलमाल लिहून प्रसिद्धी मिळवण्याकडे असलेला कल अशा अनेक विषयांवर गरमागरम वादावादी होत होती. चर्चेमध्ये आम्ही नेहमीचे लोक होतोच, पण एकदोघे नवे चेहरेही दिसत होते. नेहमीप्रमाणे वाचनालयात वेळ घालवायला आलेली काही सेवानिवृत्त मंडळी वाचनालयातले चर्चा वा तत्सम कार्यक्रम ऐकत थांबायची. हेही त्यातलेच कुणीतरी असतील असं वाटलं होतं. त्यामुळे इतका वेळ त्यांच्याकडे मुद्दामहून लक्ष द्यायची गरज पडली नव्हती. पण तेवढ्यातच त्यातल्या एका साठीच्या आसपासच्या ज्येष्ठ गृहस्थांनी उठून बोलायला सुरुवात केली. त्यांचा खणखणीत आवाज आणि मुद्देसूद बोलणं यामुळे त्यांनी लगेचच सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. या गृहस्थांना पाहिल्याबरोबर मला का कोण जाणे, असं वाटलं की, ह्या गृहस्थाशी आपली वेव्हलेंथ चांगली जुळू शकते. हे गृहस्थ कोण, कुठले, काय करतात हे अर्थातच तोपर्यंत मला काही ठाऊक नव्हतं. इतक्यातच आमच्यापैकी त्यांना ओळखणारा एक जण उठून म्हणाला, "तुम्हाला सर्वांना यांची ओळख करून द्यायची राहून गेली. हे प्रा. गोपाळ दुखंडे. मुंबईच्या कॉलेजमधून निवृत्त झालेत आणि आता सावंतवाडीला स्थायिक होतायत.

प्रा. गोपाळ दुखंडे हे नाव ऐकताच आम्ही सगळेच चमकलो. हे नाव माझ्याही परिचयाचं होतं. समाजवादी चळवळींच्या माध्यमातून वेगवेगळ्या लढ्यांत अग्रेसर असलेले, कधी रस्त्यावर उतरून शोषित आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून झगडणारे, नारायण राणेंसारख्या कोकणातील महानेत्याच्या विरोधात मालवण मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवणारे, मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र कोकणातल्या रत्नागिरी येथे मंजूर व्हावे म्हणून संघर्ष करणारे अशा अनेक गोष्टींसाठी दुखंडे सरांचं नाव ऐकून होतो. प्रत्यक्ष परिचय होण्याची संधी मात्र कधी आली नव्हती, पण दुखंडे सर आता यापुढे इथेच सावंतवाडीकर बनून राहायला आले आहेत या बातमीनं आम्ही सगळेच सुखावलो होतो. आमच्यापैकी बहुतेक जण समाजवादी परिवाराशी जोडलेले होते. कोकणातील वेगवेगळ्या सामाजिक चळवळींत आमच्यातले अनेक जण राष्ट्र सेवादल वा अन्य समाजवादी संस्थांच्या माध्यमातून क्रियाशील होते. त्यामुळे दुखंडे सरांचं सावंतवाडीत वास्तव्याला येणं आमच्या दृष्टीने निश्चितच खूप महत्त्वाचं होतं.

पुढच्या काही वर्षांत मग आम्ही दुखंडे सरांच्या आणि सर आमच्यापैकी प्रत्येकाच्या जवळपास प्रत्येक सुखदुःखाच्या क्षणांशी जोडले गेलो होतो. मी त्याच दरम्यानच्या काळात 'चाळेगत' ही माझी पहिली कादंबरी लिहू घेतली होती. त्यातील मुख्य आशयसूत्रे कोकणातील समाजवादी चळवळींची वाताहात, शिवसेनेसारख्या आक्रमक राजकीय पक्षांचा विस्तार, जागतिकीकरणानंतरच्या बदललेल्या अर्थव्यवस्थेबरोबर इथल्या पारंपरिक मच्छिमार व शेतकरी समाजावर झालेला परिणाम, खाणी व अन्य प्रकल्पांसाठी जमिनी गेल्याने सुरू झालेले भूमिपुत्रांचे संघर्ष अशा काही वर्तमान राजकीय व सामाजिक परिस्थितीशी संबंधित होती. यासंदर्भात तपशीलवार चर्चा करण्यासाठी, कोकणचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास आणि वर्तमानातील संघर्ष समजून घेण्यासाठी ज्या काही कार्यकर्त्यांची मला मदत झाली त्यातील एक प्रा. गोपाळ दुखंडे सर होते. दुखंडे सर प्रत्यक्ष राजकीय लढ्यात सक्रिय असल्याने त्यांच्यापाशी अनुभव आणि माहितीचा प्रचंड खजिना होता. अन्य दोघांपैकी सावंतवाडीचे समाजवादी नेते दिवंगत जयानंद मठकर व मालवणचे मच्छिमार नेते व समाजवादी कार्यकर्ते ज्ञानेश देऊलकर हेही दुखंडे सरांप्रमाणे त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रातील

अनुभवी व्यक्तिमत्त्वं होती. मात्र मुंबईतल्या समाजवाद्यांच्या आतल्या गोटात वावरलेल्या दुखंडे सरांकडे समाजवादी परिवाराचे अंतर्गत हेवेदावे, धुसफूस, बौद्धिक अहंकार, बाहेरून न जाणवणारा जातीयवाद, विरोधकांशी केलेली छुपी हातमिळवणी अशा अनेक कळीच्या गोष्टींचा साठा होता. त्या गोष्टी ऐकणाऱ्याला अचंबित करणाऱ्या आणि आमच्याच श्रद्धास्थानांचे मातीचे पाय दाखवून देणाऱ्या होत्या. माझ्या कादंबरीतील समाजवादाच्या कोकणातील पडझडीचं विश्लेषण करताना मला या अशा गोष्टी नक्कीच साहाय्यकारक ठरणाऱ्या होत्या. पुढे ही कादंबरी प्रकाशित झाल्यावर दुखंडे सर महाराष्ट्रभरातल्या अनेक समाजवादी नेत्यांना, कार्यकर्त्यांना, पत्रकारांना फोन करून ही कादंबरी वाचा, तुमचं आमचं वर्तमान या पोरानं कसं मांडलंय पाहा, म्हणून सांगत होते, स्वत:हून अनेकांना कादंबरी भेट देत होते. कादंबरी अशा अनेक चळवळीतल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचवण्यामध्ये दुखंडे सरांचा मोठाच हात होता, हे मान्यच केलं पाहिजे.

माझ्या 'घुंगुरकाठी' या ललित लेखांच्या पुस्तकाचं प्रकाशन दुखंडे सरांच्या हस्ते झालं होतं. त्यावेळी या पुस्तकातील कोकणातील लोकसंस्कृती, सणवार, मिथके यांच्या अनुषंगानं सरांनी अस्खलित मालवणी भाषेत केलेलं विश्लेषण त्यांच्यातल्या अभ्यासू वाचकाचं विस्मयचकित करणारं दर्शन घडवणारं होतं. राज्यशास्त्रासारख्या तुलनेने रुक्ष विषयाचा अभ्यासक असलेल्या या माणसाचं भाषेवरील प्रभुत्व, साहित्याचा व्यासंग, लोकसंस्कृतीची जाण, सामाजिक विश्लेषण करण्याची कुवत हे सारंच साहित्याच्या प्राध्यापकांनाही लाजवणारं होतं. सरांच्या तोंडून पुढे अनेकदा नामदेव ढसाळ, राजा ढाले, दुर्गा भागवत, गुरुनाथ धुरी, नारायण पेडणेकर अशा अनेकांच्या आठवणी ऐकण्याचीही संधी मिळाली होती. यामधूनही या लेखकांच्या माहीत नसलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या काही बाजू तपासता आल्या होत्या.

दुखंडे सर आणि संघर्ष यांचं काय नातं होतं कोण जाणे, पण मुंबईच्या धकाधकीच्या जगण्याला राम राम करून शांत कोकणात निवृत्तीनंतरचं आयुष्य तरी किमान शांतपणे जगावं असं ठरवून आलेल्या त्यांना इथेही अखेरपर्यंत कधी शांतपणे कौटुंबिक आयुष्य जगता आलं नव्हतं. दुखंडे सर इथं आले, त्याच्या आगेमागेच सावंतवाडी जवळच्या दोडामार्ग तालुक्यातील काही गावांमधून गोव्यातील खाणमालकांनी हातपाय पसरायला सुरुवात केली होती. खनिकर्म करणाऱ्या वेगवेगळ्या कंपन्या गावकऱ्यांना विश्वासात न घेता डोंगर पोखरू लागल्या होत्या. इथले स्थानिक राजकीय नेते व लोकप्रतिनिधी याविरोधात काहीही बोलायला तयार नव्हते. अशा परिस्थितीत गांगरून गेलेल्या गावकऱ्यांना साथ द्यायला, कायदेशीर लढाई लढायला आणि हक्कांसाठी संघर्ष करायला शिकवायला दुखंडे सर धावून गेले. कुठल्याही राजकीय पक्षाची साथ नसताना! अगदी ज्या समाजवादी विचारांच्या पक्षासाठी त्यांनी आयुष्य झिजवले होते, त्या पक्षाचे कार्यकर्तेही कधी सोबत नसताना, दुखंडे सरांनी गावकऱ्यांच्या बरोबरीने या महाकाय व्यवस्थांशी टकराव द्यायला सुरुवात केली होती. सोबत कुणी असो वा नसो, सर्वसामान्य कष्टकरी माणसांसाठी धावून जाऊन सत्तेतल्या, व्यवस्थेतल्या माणसांशी झगडत राहण्याच्या त्यांच्या स्वभावाचा परिचय अनेक छोट्या मोठ्या प्रसंगांमधून होत गेला. सरांचा हा स्वभाव सत्ता आणि सत्तेच्या अनुषंगाने मिळणाऱ्या लाभांसाठी तडजोडींचं राजकारण करणाऱ्यांसाठी कायमच अडचणीचा ठरणार होता. सरांना मात्र आपल्या सामाजिक कामांचा फायदा उठवून कसलंही बेरजेचं राजकारण करायचं नव्हतं. वैयक्तिक नफ्यातोट्याचा विचार करून ते कधी कुठल्या आंदोलनात उतरले आहेत असं कधीच दिसलं नव्हतं. त्यामुळेच बहुधा कुठल्याही पक्षाचा कितीही मोठा नेता असू दे, वा नोकरशाहीतला कितीही मोठा अधिकारी असू दे, सामान्य माणसांच्या हिताच्या आणि हक्कांच्या आड येऊन तो अन्याय, जबरदस्ती करताना दिसत असला तर दुखंडे सर तो आपला आहे की परका, फायद्याचा आहे की कायद्याचा, कसलाही विचार न करता त्याला फैलावर घेत असत. अनेकदा त्यांच्या तोंडाच्या पट्ट्याला घाबरून अनेक अधिकारी व पुढाऱ्यांनी कसा पळ काढला आहे ते आम्ही अनुभवलं होतं. व्यवस्थेत वावरणाऱ्यांना अनेकदा तडजोडी कराव्या लागतात, काही ठिकाणी लवचीकपणे स्वत:च्या तत्त्वांना मुरड घालावी लागते, हेच मुळी दुखंडे सरांना मान्य नसावं असंही अनेकदा वाटत राहायचं. त्यामुळे आमच्या सारख्या नव्या लोकांचीही कित्येकदा गोची व्हायची. अमुक एका आपल्या विचारांच्या सामाजिक संस्थेचा कार्यकर्ता किंवा एखाद्या वृत्तपत्राचा संपादक, पत्रकार, चॅनेलचा संपादक अशांनी आमचे विचार मांडायला काही अवकाश पुरवला तर आम्हाला ती संधी घ्यावीशी वाटे. यावर दुखंडे सरांनी अनेकदा भांडवलदारांच्या हस्तकांच्या व्यासपीठावर गेलो म्हणून जाहीरपणे निर्भत्सना करून तोंडावर शिव्या घातल्या होत्या. अशा वेळी रागही यायचा नि गोंधळूनही जायला व्हायचं. यांचे निकष लावायला गेलं तर सार्वजनिक जीवनात वावरणारा आणि तरीही स्वच्छ, चारित्र्यसंपन्न, सद्गुणांचा पुतळा असलेला, स्वकष्टार्जित संपत्तीवर वृत्तपत्रे, प्रसार माध्यमे चालवणारा, राजकारण करणारा माणूस शोधूनही सापडायचा नाही. कुठल्या भ्रामक युटोपियामध्ये जगू पाहतायत हे, असंही वाटत राहायचं.

खरं तर, दुखंडे सरांचा पिंड राजकारण्यापेक्षाही लढवय्या सामाजिक कार्यकर्त्याचाच होता. त्यांच्या महाविद्यालयीन दिवसांपासूनच त्यांचा समाजवादी व पुरोगामी विचारसरणीच्या विविध सामाजिक व राजकीय चळवळींशी निकटचा संबंध आला होता. राष्ट्र सेवा दल, युवा क्रांती दल, छात्र भारती, मुस्लिम सत्यशोधक चळवळ, समाजवादी युवाजन सभा, बुक्टू ही प्राध्यापकांची संघटना अशा वेगवेगळ्या संघटनांबरोबरच ते समाजवादी पक्षातही सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्यरत होते. १९७० मध्ये समाजवादी पक्षाने देशभरात उभारलेल्या जमीन मुक्ती आंदोलनात त्यांनी सत्याग्रहींच्या एका तुकडीचे नेतृत्व केले होते. या सत्याग्रहात सहभागी झाल्यावद्दल त्यांना कारावासही भोगावा लागला होता. विविध सामाजिक चळवळींमध्ये वावरतानाही

कोणत्याही व्यक्तिगत स्वरूपाच्या राजकीय लाभाची अपेक्षा न ठेवता दुखंडे सरांनी आपली सेवाभावी वृत्ती आणि लोहियावादी विचारांबरील निष्ठा कायम राखली हे आजच्या सत्वहीन काळातील मोठेच वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आपल्या आजूबाजूला सहज डोकावलं तरी, कोणत्याही पत्रकाराची सामाजिक बांधिलकी वा विचार न मानता पुढारीपण करणारे, घराणेशाहीच्या जोरावर वा निष्ठा ह्याच्यात्याच्या पायांवर विकून सत्तेची पोळी खाण्यासाठी हपापलेले खूप जण दिसतात. पण समाजातील तळागाळातील श्रमिक, कष्टकरी, गोरगरीब लोकांशी जोडून घेऊन अखेरपर्यंत काम करीत राहणारे, पुढारपणापेक्षाही कार्यकर्त्याच्या भूमिकेत सदैव वावरणारे दुखंडे सरांसारखे प्रामाणिक लोकनेते फारच कमी दिसून येतात. प्रा. गोपाळराव दुखंडेंचे वेगळेपण नेमकेपणाने सांगायचे झाले तर त्यांच्या या अव्यभिचारी, वैचारिक व सामाजिक बांधिलकीशी ते जोडले गेलेले आहे असे म्हणता येईल.

कोकणाला समाजवादी विचारांचा बालेकिल्ला बनवण्यामागे साने गुरुजी, ना. ग. गोरे, हमीद दलवाई अशा विचारवंतांबरोबरच बॅ. नाथ पै, प्रा. मधू दंडवते अशा राजकीय नेत्यांचा फार मोठा हातभार लागला होता. पण या नेत्यांना व विचारवंतांना नैतिक पाठबळ पुरवण्याचे काम करणारे असंख्य छोटेमोठे कार्यकर्ते कोकणातल्या खेड्यापाड्यांमध्ये विखुरलेले होते. कोणत्याही राजकीय लाभाची अपेक्षा न करता समाजवादी विचारांनी भारावून जाऊन, तळागाळातल्या गोरगरीब माणसांचे हित जोपासण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या अशा कार्यकर्त्यांपैकी गोपाळ दुखंडे एक होते. गेल्या काही दशकांपासून कोकणातील समाजवादी विचारांची पिछेहाट सुरू झालेली दिसते आहे. विविध आक्रमक विचारांच्या धनदांडग्या राजकीय पक्षांच्या समोर विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले, तळागाळातील माणसांशी बांधिलकी कायम ठेऊ पाहताना नैतिकता, शुद्ध आचरण, चारित्र्यसंपन्नता व प्रामाणिकपणा यावर भर देणारे समाजवादी नेते टिकाव धरू शकत नाहीत हे सातत्याने दिसू लागले आहे. मात्र असे असतानाही सामान्य माणूस हाच आपल्या चळवळीचा केंद्रबिंदू मानून कोणत्याही लाभाविना आयुष्य वाहून घेतलेले, विचार व तत्त्वांपासून दूर न जाणारे मोजकेच का होईना पण काही कार्यकर्ते आजही या भूमीत अस्तित्त्वात आहेत. सावंतवाडीचे जयानंद मठकर, मालवणचे ज्ञानेश देऊलकर यांच्याप्रमाणे प्रा. गोपाळराव दुखंडेही या मोजक्याच कार्यकर्त्यांपैकी एक होते. पण दुर्दैवाने त्यांच्या या सामाजिक कार्याची म्हणावी तशी दखल आपल्या समाजाने घेतलेली दिसत नाही, हे नाकारता येत नाही.

मुंबई विद्यापीठाशी संबंधित असलेल्या भिवंडी येथील महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असतानाच त्यांना विद्यापीठाच्या सिनेटवर काम करण्याचीही संधी मिळाली होती. त्यावेळी मुंबई विद्यापीठाचा कारभार मराठीतूनही चालावा यासाठी त्यांनी आग्रह धरला होता. मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत कोकणातील महाविद्यालयेही येत होती. मात्र प्रशासकीय कामांसाठी व उच्च शिक्षणासाठी तळकोकणच्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात जाणे शक्य नव्हते. त्यासाठी मुंबई विद्यापीठाचे एक उपकेंद्र कोकणात सुरू करावे यासाठीही त्यांनी विशेष पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच रत्नागिरी येथे मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्राला मान्यता मिळाली होती. त्यामुळे कोकणातील खेड्यापाड्यातील हजारो विद्यार्थ्यांची सोय झाली. याचे श्रेय नि:संशयपणे दुखंडे सरांनाच द्यावे लागते. मुंबई विद्यापीठात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण विकास हा स्वतंत्र पेपर सुरू करण्याचे श्रेयही त्यांना द्यावे लागते. कोकण रेल्वे जनाधिकार समिती स्थापन करून कोकण रल्वे प्रवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी प्रा. दुखंडे यांचा फॉर्म्युला मान्य करून राज्यातील पहिला कॅपिटेशन फी विरोधी कायदा केला होता. विनाअनुदानविरोधी चळवळीत शिक्षण संस्थांना संघटित करून त्यांच्याच नेतृत्वाखाली विनाअनुदानित शिक्षकांचा पन्नास हजारांचा पहिला मोर्चा मुंईत निघाला होता.

उत्तम व प्रभावी वक्तृत्व, अभ्यासू वृत्ती, गोरगरीब व श्रमिकांविषयीची तळमळ अशा वैशिष्ट्यांबरोबरच विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विषयांबर त्यांनी केलेले अभ्यासपूर्ण लेखनही वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल. डॉ राममनोहर लोहिया यांच्या विचारांचा दुखंडे सरांवरील पगडा शेवटपर्यंत कायम होता. त्यामुळेच कोणत्याही परिस्थितीत त्यांनी तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. या गोष्टीचा तोटा त्यांच्या पक्षाबरोबरच वैयक्तिक त्यांनाही सहन करावा लागलेला दिसतो. तरीही त्यांनी या गोष्टीची कधी फिकीर केली नव्हती. या स्वभावामुळे त्यांचे जवळचे अनेक साथी व मित्र दुखावले गेले होते याचीही त्यांना जाणीव होती. तरीही सर्वसामान्य माणसांचे हित वगळून कोणत्याही प्रकारे केले जाणारे राजकारण त्यांनी कधीही स्वीकारले नव्हते. सामान्य कष्टकरी माणूस हाच त्यांच्या आस्थेचा केंद्रबिंदू राहिला होता. या सामान्य माणसाची बाजू घेऊन ते अखेरपर्यंत राजकीय व्यवस्थेशी, विरोधकांबरोबरच आपल्या स्वकीयांशीही भांडत राहिले, टक्कर देत राहिले, जखमी होत राहिले. तरीही अखेरच्या श्वासापर्यंत जखमा अंगावर मिरवीतही लढवय्या राहिलेला हा प्रामाणिक कार्यकर्ता आता मात्र कायमसाठी विसावला आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या हक्क आणि न्यायासाठी व्यवस्थेशी संघर्ष करीत असलेला, आयुष्यभर प्राणपणानं जोपासलेले विचार आणि तत्त्वे यांची डोळ्यांदेखत आपल्याच माणसांकडून होत असलेली पायमल्ली बघून त्रागा करणारा, आसपासच्या मनाविरुद्ध घडणाऱ्या सामाजिक व राजकीय घडामोडींमुळे सतत अस्वस्थ असलेला, बिघडत चाललेल्या प्रकृतीची तमा न बाळगता शेवटच्या श्वासापर्यंत श्रमिक-कष्टकरी लोकांसाठी रस्त्यावर उतरून प्रसंगी आपल्याच माणसांशीही भांडणारा कार्यकर्ता आता कायमसाठी विसावला आहे.

**– प्रवीण दशरथ बांदेकर**
भ्रमणध्वनी : ९४२२४३६१००
samwadpravin@gmail.com

# शंकर पाटील यांची साहित्यसंपदा



**कधी गालची खुलते कळी**
**कधी हास्याचा झरा उसळतो**
**रांगड्या शब्दांतून त्यांच्या**
**आयुष्याचा अर्थ उमगतो...**



**कादंबरी** टारफुला

**कथासंग्रह** वावरी शेंग । इल्लम । जुगलबंदी । पाऊलवाटा । खुशखरेदी
ताजमहालमध्ये सरपंच । आभाळ । घालमेल । भेटीगाठी । बंधारा
श्रीगणेशा । धिंड । फक्कड गोष्टी । वळीव । पाटलांची चंची । खुळ्याची चावडी । गारवेल

**नाटक** लवंगी मिरची कोल्हापूरची । कथा अकलेच्या कांद्याची

**अनुवादित कादंबरी** शापित वास्तू

मेहता पब्लिशिंग हाउस

www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta Books — 500 Marathi books Available as e-Book

WhatsApp us on 9420594665

E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

# 'कुसुमानिल' द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने

डॉ. अनंत देशमुख



जुने मुखपृष्ठ




नवे मुखपृष्ठ

*सुप्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे (अनिल) आणि लेखिका कुसुमावतीबाई यांचा प्रेमविवाह एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात गाजला होता. त्याआधी १९२२ ते १९२७ या काळात दोघांनी परस्परांना लिहिलेली (प्रेम) पत्रे प्रकाशक हरिभाऊ मोटे यांनी १९७२ साली 'कुसुमानिल' नावाने प्रसिद्ध केली. गेल्याच महिन्यात संगीतकार कौशल इनामदार यांनी या पत्रांचे मोल ओळखून दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. 'कुसुमानिल' काळातील महाराष्ट्रीय समाजजीवन, महाविद्यालयीन जीवन, लग्नसंबंधातील स्थित्यंतरे, तत्कालीन प्रेमपत्र लेखनाचे मायने, त्यातील भाषा आणि अन्य संदर्भ या विषयीची निरीक्षणे सोबतच्या लेखात नोंदविण्यात आली आहेत. 'कुसुमानिल'च्या या आवृत्तीचे आकलन करून घेण्यास ती उपयुक्त ठरणारी आहेत.*

कुसुमावती देशपांडे आणि कवी अनिल हे गेल्या शतकातील मराठीतील एक नामवंत साहित्यिक दांपत्य. कथा, समीक्षा आणि कादंबरी प्रकाराच्या इतिहासकार म्हणून कुसुमावतींनी नाव कमावलेले तर कवी म्हणून अनिल ख्यातनाम झालेले. दोघेही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचे अध्यक्ष झालेले. दोघांनीही आपल्या आवडत्या लेखनप्रकारात मोजकेच पण गुणात्म लेखन केलेले. त्यावेळच्या महत्त्वाच्या समजल्या गेलेल्या साहित्यिकांमध्ये दोघांची सारखीच ऊठबस. दोघेही अन्य साहित्यिकांच्या प्रेमादरास पात्र ठरलेले. कुसुमावती १९०४ साली जन्मल्या नि १९६१ साली मृत्यू पावल्या. तर अनिल १९०१ साली जन्मले, त्यांना दीर्घायुष्य लाभले. ते १९८२ साली निर्वतले.

खरे तर त्यांची ही ओळख पुरेशी नाही. अनिलांनी लिहिलेल्या 'अजुनी रुसुन आहे' आणि 'स्वप्नातल्या मुक्या सावलीसारखी' या दोन कवितांनी मराठी साहित्यविश्वात खळबळ उडवून दिली. या कवितांना अनिलांच्या वैयक्तिक जीवनातील संदर्भ आहेत असे समजून समीक्षक आणि रसिक पुरे चक्रावून गेले. त्यामुळे हे दांपत्य मराठीतील एक 'लिजंड' बनून राहिले आहे. पण त्यालाही काही एक पूर्वसंदर्भाचा इतिहास आहे आणि त्याचे मूळ थेट त्या दोघांच्या तरुणपणातील महाविद्यालयीन जीवनात आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचा विचार करताना बदलती विवाहसंस्था हा एक महत्त्वाचा विषय ठरतो. 'गावगाडा'मध्ये त्रिंबक नारायण अत्रे यांनी महाराष्ट्रीय जीवनातील बदलत्या कुटुंबव्यवस्थेबद्दल लिहिताना 'वतनदारीकडून वेतनदारी' ही शब्दयोजना केली आहे. महाराष्ट्रीय जीवनात एकत्र कुटुंबपद्धती होती घरात वडीलधारी व्यक्ती 'कुटुंबप्रमुख' असे. त्याच्या विचारानुसार त्या कुटुंबातील लहानमोठ्या गोष्टी होत असत. अशी व्यक्ती कुटुंबात निर्माण होणारे प्रश्न, प्रसंग यांचा साधकबाधक विचार करून निर्णय घेत असे आणि तो सर्व सदस्यांना बंधनकारक असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणप्रसार आणि ठिकठिकाणी उपलब्ध होत गेलेल्या नोकरींच्या संधी यामुळे नवशिक्षित तरुण आपल्या पत्नी-मुलांसह मूळच्या कुटुंबापासून दूर गावी राहू लागले. व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व आले.

१९२०च्या सुमारास महाराष्ट्रात मुंबई येथे 'एल्फिन्स्टन' आणि 'विल्सन' ही कॉलेजे, तर पुण्यास 'फर्ग्युसन' आणि 'एस.पी.' ही कॉलेजं होती. विदर्भ, मराठवाड्याकडील उच्चभ्रू समाजातील मुले प्राय: पुण्याच्या 'फर्ग्युसन कॉलेज'ला पसंती देत, कारण तिथे विलायतेला जाऊन रँग्लर होऊन परत आलेले रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे प्राचार्य होते. मुलांना ते 'आदर्श' वाटत. शिवाय ते उत्कृष्ट 'प्रशासक' होते आणि त्यांची शिस्तही वाखाणण्यासारखी होती. दूर राहणाऱ्या पालकांना आपल्या मुलांना या कॉलेजमध्ये शिक्षण घेताना कोणतीच चिंता असण्याचे कारण नव्हते. त्यामुळे मोठ्या विश्वासार्हतेने ते आपल्या मुलांना तिथे पाठवीत. याशिवाय विदर्भातील मुलांकरिता पुण्यात 'पी. सी. बेरार क्लब' होता. तिथे मुले एकत्र भेटत असत.

महाविद्यालयीन जीवनातील परस्पर सहवासामुळे, परस्पराकर्षण वाढले. ते अगदी कमी का होईना तरुणांच्या बाबतीत एकमेकांपाशी व्यक्त होऊ लागले. प्रेमभावनेची विविध रूपे त्या काळात दिसून येऊ लागली. घरात पत्नी अशिक्षित तर

कॉलेजमध्ये कथाकादंबऱ्यांतून मोकळ्या सहजीवनाची आणि काव्यसेवाविनोदाची चित्रे रंगविलेली असायची. तत्कालीन तरुणांपुढे हा पेच असायचा. एरव्ही लोकहितवादींचा बुद्धिमान मुलगा कृष्णराव विवाहित असूनही विलायतेहून परतताना गोरी मुलगी सोबत आणता ना; श्रीपाद बाबाजी ठाकूर बॅरिस्टर आणि आयसीएस होऊन आलेले पण प्रत्यक्षात विलायतेला जाण्यापूर्वीच त्यांचा विवाह झालेला, पण ते कलकत्त्याला कोणी रूपवती, संस्कृत पंडिता आहे म्हटल्यावर तिला मागणी घालायला कलकत्त्याला जाते ना.

१८९०च्या सुमारास पत्रलेखन वाढले होते हे खरे असले तरी कुणी स्त्री-विवाहित स्त्री- परक्या (विवाहित) पुरुषाला फक्त नित्यश: पत्र लिहिते ही गोष्ट अजब वाटावी अशी. कारण तसा आणि तितका मोकळेपणा स्त्री-पुरुषसंबंधात तेव्हा होता असे म्हणता येणार नाही. पण उदारमतवादी, सुधारणेच्छुक व रसिक मनाच्या गोविंदराव कानिटकरांनी तेव्हाच्या नुकताच कादंबरीकार म्हणून प्रसिद्धीस येणाऱ्या हरिभाऊ आपटे यांना घरी बोलावले, पत्नी काशिबाईसह त्यांच्याशी चर्चा करावी हे धाडसाचे झाले म्हणायचे. इथे हरिभाऊंच्या व्यक्तित्वासंबंधी लिहायला हवे. ह्यांचे चुलते माधव चिमणाजी आपटे मुंबई हायकोर्टाचे निष्णात वकील. विधुर. पुतण्यासाठी त्यांनी पुण्यात आर्यभूषण प्रेस काढलेला. हरिभाऊ विवाहित; पण पत्नी अशिक्षित. त्यांना ती शिकावी आणि तिने 'गृहिणी, सखि, सचिव:' ही भूमिका पार पाडावी असे वाटायचे. हरिभाऊंनी तिला अनेकदा 'शिक्षण घे' म्हणून प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला आणि पुण्यात त्यांच्या आणि गोविंदराव व काशीबाईच्या गाठीभेटी वाढल्या. हरिभाऊंना काशीबाई कथा, कादंबरीलेखन करतात, साहित्यचर्चांमध्ये भाग घेतात याचे अप्रूप वाटे. परिणामत: गोविंदरावांची मुंबई, नेवासे, अलिबाग अशा ठिकाणी बदली झाली तरी काशीबाई-हरिभाऊ संपर्क काही तुटला नाही. तो पत्ररूपाने सतत होत होता. पत्रात हरिभाऊ काशीबाईंना 'ताई' आणि स्वत:ला 'बालके हरी' लिहीत असले आणि जनरीतीला अनुसरून लिहीत असले तरी हरिभाऊंना आणि काशीबाईंना - एकमेकांना पत्र लिहावेसे वाटणे आणि 'हृदयसंवाद' साधावासा वाटणे हे नैसर्गिक होते; पण ते समाजमान्य नव्हते. त्यांच्यातील आंतरिक नातेबंधातला हळुवारपणा कुणाही संवेदनशील माणसाला जाणवावा. याच पद्धतीने पुढच्या काळात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी आनंदीबाई शिर्के यांना आणि पुढे अलीकडच्या काळात जी.ए. कुलकर्णी यांनी सुनीताबाई देशपांडे, हेमा अंतरकर यांना लिहिलेल्या पत्रांमागील हीच प्रेरणा दिसून येते. काही एका उत्कट, तरल, काव्यात्म आणि अशारीरिक पातळीवर हा हृद्य नाजुकबंध ही ती आंतरिक आच होय. याला लौकिकाचे जाचक नियम लावू नयेत हे खरे.

हरिभाऊंच्या बाबतीत आणखी काही गोष्टी संभावतात. त्यांच्या काळात (सुमारे १८९०-१८९५) फोटो काढण्याचे कला-कॅमेरा तंत्र अगदी प्राथमिक अवस्थेत होते. आवश्यकता



आप्पा आणि सौ. कुसुमावती १९५८

भासली तर किंवा गरज वाटली तरच फोटो काढण्यात येत असत. अशा वेळी काशीबाईंनी स्वत:चा फोटो केव्हातरी काढला आणि तो हरिभाऊंना दिला. हरिभाऊंच्या लेखनाच्या टेबलावर तो असायचा असा उल्लेख आहे. यातूनही काही सांगितले जाते-सुचविले जाते. आणखी एका गोष्टीची नोंद इथे करतो. गोविंदराव-काशीबाई-हरिभाऊ यांच्या प्राय: एकत्र भेटी होत. अशावेळी - काशीबाई आणि हरिभाऊंच्या बोलण्याला मर्यादा पडण्याची शक्यता अधिक. हरिभाऊंवर मित्रवत् प्रेम करणारे गोविंदराव मनाने त्यांच्यापासून पुढे दूर गेले. गाठीभेटी थांबल्या आणि मॅकमिलन कंपनीने रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली'चा अनुवाद प्रसिद्ध करण्याचे ठरविले. गोविंदरावांनी तो केला होता. मॅकमिलन कंपनीने हरिभाऊंकडे तो तपासायला पाठवला. तेव्हा त्यांनी तो निकालात काढून पुढे स्वत:च अनुवाद करून मॅकमिलन कंपनीला दिला. आपल्या ज्येष्ठबंधू तुल्यवत गोविंदरावांची रचना हरिभाऊंना खरोखरच कमअस्सल वाटली म्हणून बाजूला ठेवली असावी का? त्या दोघांत दुरावा निर्माण होण्याची अन्य काही कारणे होती? कळणे अशक्य आहे.

हरिभाऊंच्या मृत्यूनंतर काशीबाईंनी त्यांच्यासंबंधी छोटेखानी चरित्र लेख लिहिले. त्याचा शेवट करताना त्यांनी लिहिले, "हरिभाऊ, आपण ठरविल्याप्रमाणे मी तुमच्या शब्दांतून मोकळी झाले. आपण पुष्कळवेळा बोललो होतो की, आपल्यापैकी जो कोणी मागे राहील त्याने गेलेल्यांचे चरित्र लिहावे, माझ्या दुर्दैवाने तो भाग माझ्याकडे आला. तुम्ही मात्र निसटून गेला..." म्हणजे त्या दोघांमध्ये झालेला हा करार होता असे म्हणता येते. त्यांच्यात हा 'करार' केव्हा झाला असेल? त्यावेळी गोविंदराव तिथे उपस्थित असतील का? सारेच गूढ आहे.

डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांच्या अन्नपूर्णा म्हणजे 'ॲना' या मुलीने आयरीश माणसाशी विवाह केला होता. अर्थात तो प्रेमविवाह होता. १९०८च्या आसपास रघुनाथ धोंडो कर्वे यांचा गंगू गोडे नावाच्या मुलीशी परिचय झाला आणि १९११ साली त्या दोघांचा विवाह स्वत: अण्णा कर्वे यांनी लावून दिला. सी.डी.

देशमुख, ना.भि. परूळेकर, डॉ. केतकर यांचे प्रेम विदेशात जुळले आणि पुढे त्यांनी त्या त्या व्यक्तीशी विवाहही केले.

राम गणेश गडकरी यांचे कॉलेजातील एका तरुणीवर प्रेम बसले आणि ते एकतर्फी होते असे म्हणतात. माधवराव पटवर्धन यांच्या जीवनात शांताबाई कशाळकर, वरदा नायडू यांनी बरीच खळबळ उडवून दिली. सनातनी पुण्यात त्यांच्या प्रेमाला मान्यता मिळणे कठीण होते. शिक्षा म्हणून संस्थेने त्यांची बदली अंमळनेरला केली. मार्क्सवाद आणि मार्क्सवादी विचारधारा महाराष्ट्रात रुजविणाऱ्या श्रीपाद अमृत डांगे यांनी उषाबाईशी लग्न केले तेही याच प्रकारचे होते. तर प्रेमा कंटक आणि शंकरराव देव यांच्या सहजीवनाला सासवडकरांनी विरोध केला ही वस्तुस्थिती होती. रा.गो. भांडारकरांची नात- मालिनी पाणंदीकर यांनी गुलाबबक्ष बशिरुद्दीन खान या गृहस्थांशी केलेला विवाह याच पद्धतीतला होता आणि तो समाजाचा विरोध पत्करून करण्यात आलेला होता. वि.द. घाटे आणि वत्सला जुवेकर यांचा विवाह एल्फिन्स्टन कॉलेजातील बी.टी.च्या वर्गातील त्यांचे एक सहाध्यायी प्र.के. अत्रे आणि त्यांच्या मित्रांनी पुढाकार घेऊन घडवून आणला होता. (घाटे यांचा तो द्वितीय विवाह होता.)

सर्वसाधारणपणे शिक्षण आणि त्यातही उच्चशिक्षण घेण्याची प्रथम संधी उच्चवर्गीयांना लाभली. त्यात प्राय: ब्राह्मण, सीकेपी, सारस्वत यातील मुला-मुलींचा भरणा अधिक आहे. त्यामुळे त्या त्या समाजातल्या मुलामुलींमध्ये 'प्रेमविवाहा'ची उदाहरणे अधिक आढळतात. शिवाय तुलनेने हा वर्ग उदार मोकळा होता. त्यातही विशेषत: लग्नसंबंधात - हे दिसून येते. उरला तो बहुजन समाज. त्यात प्राय: वडीलधाऱ्यांच्या मर्जीनुसार लग्न होत असत. फक्त अपवादात्म स्वरूपात असे विवाह होत - क्वचितच आंतरधर्मीय विवाहही होत. खान-पाणंदीकर विवाह हा त्या प्रकारातला म्हणता येतो. क्वचित नवशिक्षित तरुणा-तरुणीचे प्रेम सफल होत असे, असेही नाही. 'अनिलां'नी 'प्रेम आणि जीवन' नावाचे खंडकाव्य लिहिले त्याला प्रेरक ठरले ते तरुण-तरुणी पारशी कुटुंबातील होते. घरच्यांच्या कडव्या विरोधामुळे त्यांनी नागपूरच्या तेलंखडी तळ्यात आत्महत्या केली.

त्याकाळात पांढरपेशांच्या वर्गात कुटुंबप्रमुख आणि त्याची पत्नी म्हणजे मुलांचे पालक हे आपल्या मुलांची काळजी घेत. त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत. पण सहशिक्षणाचा परिणाम म्हणून एखादा तरुण आपल्या कॉलेजमधील अन्य कुणा मुलीच्या प्रेमात पडला तर ते त्यांना रुचत नसे. विवाहाची साधी जबाबदारी त्या कर्त्या पुरुषाची असे असा समाजात दंडकच होता आणि तो कर्तापुरुषही हे कार्य कर्तव्यभावनेने आणि प्रेमाने करीत असे. आपल्या मुलीसाठी अनुरूप स्थळ शोधणे ही त्याची जबाबदारी असे आणि त्याकरिता अनेक ठिकाणी चौकश्या करून योग्य वराची माहिती लागताच तो तिथे प्रयत्न करीत असे. त्यात त्याला यश येईलच अशी खात्री नसे. मग मुलीचे लग्न होईपर्यंत वरसंशोधन चालू असायचे. वधुपित्याच्या या प्रयत्नांना तेव्हा 'जोडे झिजवणे' असे म्हटले जाई.

कॉलेजजीवनात नुकती कुठे प्रेमभावना परस्परांमध्ये मुखरित व्हायला १९१५/१९२० च्या दरम्यान सुरुवात झाली होती. मुळात कॉलेजे कमी होती. पुणे तर तेव्हा विद्येचे माहेरघर समजले जायचे आणि बृहन्महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून मुलेमुली तिथे शिकायला यायची. फर्ग्युसन कॉलेज या दृष्टीने मुलांच्या पालकांना सुरक्षित वाटत असे. उत्तम प्राध्यापक वर्ग, तरुण, उमदे, शिस्तप्रिय रँग्लर प्राचार्य, कॉलेजच्या आसपासच्या टेकड्यांनी समृद्ध असलेला मोहक निसर्ग... या साऱ्यामुळे अनेक तरुण-तरुणी तिथे प्रवेश घेत होते. अशा वेळी वर्गात मुलांची संख्या मोठी असली तरी मुली मात्र कमी असत. प्राय: त्या श्रीमंत घरातल्या असत. म्हणजे सुधारणा त्यांच्या घरातच असे. मग वर्गातले अनेक तरुण एकेका मुलीवर मनोमन प्रेम करीत असत. अशा एकांगी प्रेमाचे विडंबनात्मक चित्रण आचार्य अत्रे यांनी 'झेंडूची फुले'मध्ये तर तेव्हाच्या अनेक कवींनी 'उपहासिनी' काव्यसंग्रहातील कवितांमध्ये केलेले आहे.

तरुण विवाहोत्सुक मुलामुलींचे पालक त्यांना अनुरूप जोडीदार शोधताना प्रथम जातीचा विचार करायचे, नंतर त्याची आर्थिक क्षमता, शैक्षणिक पात्रता, कौटुंबिक पार्श्वभूमी, त्या कुटुंबाची समाजातील पत-प्रतिष्ठा, कुटुंबातील त्या तरुणावर असलेल्या जबाबदाऱ्या इ. गोष्टी विचारात घ्यायचे.

एखादा तरुण कुणा एका मुलीबरोबर किंवा एखादी मुलगी कुणा तरुणाबरोबर नुसती बोलताना आढळली की तिथे काहीतरी 'पाणी मुरतंय' या दृष्टीने पाहिले जायचे आणि नको तो बभ्रा व्हायचा. यातून मग ती दोघं परस्परांसंबंधी 'ताई-भाऊ'चे नाते प्रस्थापित करीत व तसे जाहीरही करीत. यातून पुढे त्या दोघांचे लग्न झाले तर त्याला 'दादा-भाई-नवरोजी' संबंध म्हटले जाई. तत्कालीन प्रेमिकांच्या पत्रांतून हे 'दादा-ताई' संबोधनांच्या किंवा मायनांच्या रूपात स्पष्टपणे दिसून येते. 'कुसुमानिल'मध्ये कुसुमावती अनिलांना 'दादा' आणि अनिल कुसुमावतींना 'ताई' का संबोधतात आणि बहीण-भावाचे नाते सुरुवातीला तरी का जोडतात त्याचे कारण हे आहे. ही पत्रे जर चुकून कुणा नातेवाईकांच्या, मित्राच्या हातात पडली तर त्यांच्या मनात त्या प्रेमिकांविषयी संशय उत्पन्न होऊ नये.

त्या काळात पुरुषांनी 'प्रेमविवाहा'साठी घराबाहेर धाडसी पाऊल उचलले तर घरातील कर्त्या पुरुषापर्यंत ती बातमी कशी कळत असे, पाहा-

१. तो संबंधित तरुण किंवा ती तरुणी घरात प्रथम एकतर आईला/भावाला/बहिणीला ती वार्ता सांगत असे. इथेच पहिला विरोधाचा फटका त्या व्यक्तीला बसत असे. तिची तेव्हा कानउघाडणी केली जायची.

२. समजा ही पायरी तिने ओलांडली तर पुढे ती वडीलधारी व्यक्ती कर्त्यापुरुषाच्या कानांवर ती बातमी घालीत असे. मग घरात धरणीकंप होई. अपराधी तरुणाला/तरुणीला आरोपीच्या पिंजऱ्यात

खेचले जाई. प्रथम प्रेमाने आणि त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही म्हटले की जरबेने जाब विचारला जाई. इथवर प्रकरण मिटले तर ठीक. नाहीतर याहीपेक्षा जालीम उपाय केले जात. 'कुसुमानिल' या पत्रसंग्रहात ते सारे वडीलधाऱ्यांकडून केले गेल्याचे दिसून येते. ते पुढीलप्रमाणे-

(१) जोडी फोडणे : लोकमान्य टिळकांना आपला मोठा मुलगा रामभाऊ त्याच्या मेडिकल कॉलेजच्या वर्गातील मुक्ता तर्खडकरच्या प्रेमात पडला म्हणताच टिळकांनी ती दोघे प्रॅक्टिकलच्या बॅचमध्ये पार्टनर्स होते त्या संस्थाचालकांना कळवून त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केला.

(२) परस्परांना न भेटणे, पत्रव्यवहार न करणे. यदाकदाचित तो करीत राहिले तर ती पत्रे संबंधितांना मिळणार नाहीत अशी तजवीज करणे.

(३) ती दोघे दूर पुण्यात शिकत असतील तर त्यांच्यावर देखरेख ठेवायला काही माणसांना नेमणे.

(४) त्या परस्परांना दूर ठेवण्यासाठी मग एकाचे कॉलेज बदलणे. 'कुसुमानिल'मध्ये कुसुमला फर्ग्युसन कॉलेजातून काढून नागपूरच्या कॉलेजात दाखल करण्यात आले होते. तिथून ती बी.ए. झाली. विरोध करूनही ती दोघे परस्परांना चोरून भेटत असतील तर त्यापैकी एकाला परगावी पाठविणे. इथे कुसुमला खंडाळ्याला ठेवण्यात आले होते. इतके होऊनही ती दोघे बधत नसतील तर एकाला घरात बंद करून ठेवणे. खंडाळा इथे कुसुमला तशी ठेवण्यात आली होती.

आपल्या वडिलांसंबधी अनिलांना कुसुम लिहिते, '... एखाद्या आय.सी.एस.च्या गळ्यात बांधून एक पायरी वर चढता येत नाही. म्हणून लाही लाही होत आहे. (पृ. १६८) एखाद्या बड्या आय.सी.एस.ची योग्य गोष्ट निराळी. त्याने जर मुलीला पत्र लिहिली असती तर त्यांना गळ्यात हारतुरे पडल्यासारखे वाटलं असतं प्रत्येकवेळी.' (पृ. २०२) इथे आय.सी.एस.चा आलेला उल्लेख सहज म्हणून आलेला नाही. त्याला तसेच पूर्वसंदर्भ आहेत. 'कुसुमानिल'मध्ये त्या दोघांच्या विवाहाची पत्रिका छापलेली आहे. तिथे कुसुमावतींना वडिलांचे नाव रामकृष्ण रावजी जयवंत आणि आईचे नाव सौ. सीताबाई असे होते. रामकृष्णपंत 'रावबहादूर' होते. 'माझा जीवन प्रवाह' या आत्मचरित्रात चिंतामणराव देशमुख यांनी आय.सी.एस. होण्याकरिता कोणाकोणाचे सहाय्य झाले. यासंबंधी पुढीलप्रमाणे लेखन केले आहे. 'ठाण्याचे सर गोविंदराव प्रधान आणि माझ्या मावसबहिणीचे- माईचे यजमान आर. आर. जयवंत यांची पुष्कळ मदत झाली.' (पृ. २१) याशिवाय चिंतामणराव आय.सी.एस.होऊन विलायतेहून परत आल्यावर सिव्हिल सर्व्हिसमध्ये रूजू झाले. तेव्हा अमरावतीस त्यांना काही काळ जावे लागले. खेरीज विलायतेला जाण्याआधीही ते अमरावतीला गेले होते. अधिकारी म्हणून तिथे गेल्यावर ते कुठे राहिले यासंबंधी त्यांनी लिहिले आहे, '(अमरावती) या ठिकाणी सर मोरोपंत जोशी यांची कुटुंबीय मंडळी, माझ्या थोरल्या मावश्यांचे यजमान आणि सर मोरोपंतांचे भागीदार मल्हार खंडेराव चिटणीस यांचे जावई आणि मुलगी यांचे जयवंत कुटुंब आणि चिटणीसांचे मित्र भोळे यांच्याशी माझा परिचय झालेला होता. काही दिवस मी जयवंतांच्याकडे राहिलो. जयवंतांना कुसुम नावाची सोळा वर्षांची मुलगी (हीच पुढे कुसुमावती देशपांडे नावाची नामांकित लेखिका झाली) अनंत आणि कुमार हे अनुक्रमे दहा आणि आठ वर्षांचे मुलगे आणि कमलिनी नावाची एक वर्षाची मुलगी होती.' (पृ. ४२)

चिंतामणरावांचे आणि रावबहादुरांचे जवळचे नसले तरी नाते होते. ते मॅट्रिकला सर्वप्रथम आले होते आणि एक सुविख्यात मुलगा म्हणून रावबहादुरांनी कुसुमसाठी ते 'स्थळ' म्हणून पसंत असावेत आणि कुसुमने अनिलांसंबंधी घरात कथन केल्यावर रावबहादूरांच्या स्वप्नावर पाणी पडल्यासारखे झाले असावे. यासंबंधात घरात चर्चाही झाल्या असणार, पण त्याचा या पत्रांमध्ये उल्लेख नाही. (ही हुकलेली संधी रावबहादुरांनी पुढे आपल्या धाकट्या मुलीचे चिंतामराणवांच्या बंधूंशी लग्न लावून साधली असे दिसते. माझी आणि अनिलांची भेट या देशमुखांच्या मंत्रालयासमोरील इमारतीतील फ्लॅटमध्ये १९७५च्या सुमारास झाली होती.)

यानंतरचा प्रकार म्हणजे संबंधित मुलाच्या वडिलांना निनावी पत्रे पाठवून भंडावून सोडणे. हा प्रकारही रावबहादूर जयवंत यांनी करून पाहिला. आणखी एक गोष्ट म्हणजे त्या तरुणाविषयी- इथे अनिलांविषयी-त्याच्या वर्तुळामध्ये, नातेवाईकांमध्ये नाही नाही त्या कपोलकल्पित कथा प्रसृत करून त्याला शक्य तितका बदनाम करणे.

याशिवाय घरात अबोला धरणे, सतत वाद उकरणे, आईने आकांडतांडव करणे, उपोषण करणे, अंग धरणे.

पुढे साखरपुडा झाल्यानंतरही, आधीच ठरविल्याप्रमाणे रावबहादूर यांनी मुलीसाठी विलायतच्या स्कॉलरशिपसाठी प्रयत्न केले व तीन वर्षांकरिता ती मिळालीदेखील. कदाचित या काळात कुसुमचा विचार बदलेल असा त्यांचा समज होता. पण विलायतेहून शिक्षण प्राप्त करून कुसुमने परत यावे या त्यांच्या विचारांमागे तिचे विवाहोत्तर आयुष्य आर्थिकदृष्ट्या समृद्धीचे आणि प्रतिष्ठितांच्या वर्तुळात जावे ही त्यांची कळकळ दिसून येते.

पत्रात्म लेखनाची जेव्हा पुस्तके करण्यात येतात तेव्हा त्यांचे काही प्रकार संभवतात. पहिला पत्रलेखक आणि त्याने जिला पत्र लिहिलेली असतात ती व्यक्ती या दोघांमध्ये जर उभयपक्षी पत्रव्यवहार असेल तर त्या दोघांची पत्रे आळीपाळीने, अनुक्रमाने येतात आणि ती ठराविक काळातील असल्याने त्या कालखंडातील त्या दोघांच्या आयुष्यातील घडामोडी, कुटुंबीयांसंबंधीचे लेखन, आप्तस्वकीय, मित्रमैत्रिणी यांच्याविषयीची टिपणे, समकालीन सामाजिक, शैक्षणिक, वाङ्मयीन वा राजकीय घटनांच्या नोंदी वा त्यावरील भाष्ये येण्याची शक्यता अधिक तरीही प्राय: अशा पत्रलेखनांत त्या पुरते व्यक्तींच्या अंतरंगदर्शनावर, मानसिक-

भावनिक कल्लोळावर, वेगवेगळ्या क्षणी मनात उमटलेल्या विचारतरंगांवर, हर्षखेद, रागलोभादी विकारांवर प्रकाश टाकलेला असतो. पत्रलेखकाची भूमिकाच मुळी पत्रलेखनाची वैयक्तिक अनुभव शेअर करणाऱ्याची असते. तो मग माणूस प्रेमिक, प्रेमिका, पालक, सुहृद काहीही असेल आणि घट्ट वास्तवाच्या पायावर हे लेखन सिद्ध झालेले असते. त्या भल्याबुऱ्या अनुभवाचा 'भोग' त्याच्या वाट्याला आलेला असतो. आपण 'लेखक आहोत' आणि हे 'एक लेखन' करीत आहोत. त्याला वाङ्मयीन स्पर्श व्हायला हवा. आपण एक पात्र/निवेदक तयार करीत आहोत आणि त्याला एक जिवंत वाटावा असा कलात्म स्पर्श हवा अशी लेखनप्रसंगी लेखकाची काही भूमिका नसते. ते एक प्रांजळ, सत्यदर्शी, भावनात्मक लेखन असते. खरेखुरे, म्हणून सच्चे असते. 'आपण लेखक आहोत' ही भूमिका घेऊन केलेले पत्रात्म लेखन मग व्यासंग, बुद्धिमत्ता या दृष्टीने झालेले असते. त्यात पत्रलेखकाच्या वैयक्तिक भावनात्मक आंदोलनांची तीव्रता नसते. 'जीएंची पत्रे' हे अशा पत्रांचे उदाहरण मानता येईल. 'हरिभाऊंची पत्रे', 'कुसुमानिल' ही या परंपरेतील नसतात; तर सुरुवातीला वर्णन केलेल्या वर्गातील असतात. अशा लेखनात पत्रलेखकाने आपले प्राण शब्दात ओतलेले असतात.

या प्रकारच्या लेखनाच्या काही शक्यता अशा संभवतात–

१. तरुण आणि तरुणी प्रेमात पडलेले; पण घरच्यांचा विरोध, यातून पुढे घरचे मान्यता देतात आणि विवाहाची शक्यता.

२. घरच्यांचा तीव्र विरोध. एकाच्या पालकांकडून अन्य कुणाशी तरी विवाह लावून दिला जाणे.. कायमची फारकत.

३. घरच्यांचा तीव्र विरोध. दोघे पळून जाऊन लग्न करतात. पत्रलेखन लग्न होईपर्यंत राहते.

४. घरच्यांचा तीव्र विरोध अतिविचारांनी भावनिक ताण सहन न होऊन दोघेही आपले जीवन संपवतात. यातून 'प्रेम आणि जीवन'सारखे अनिलांचे काव्य निर्माण होते. या शक्यतेतून जर संबंधितांचा पूर्वकाळातील पत्रव्यवहार असल्यात तो या रूपात आकाराला येईल.

५. घरच्यांचा विरोध नाही; विवाह ठरतो पण पत्रलेखक नोकरीच्या निमित्ताने दूरगावी, दूरदेशी जातो. विवाह लांबतो. या काळातील एकमेकांचा पत्रव्यवहार, सुप्रसिद्ध शिल्पकार भाऊ साठे यांच्यापाशी त्यांचा असा असलेला.*

६. कॉलेजात दोघे परस्परांना भेटतात. ओळख होते, परिचय वाढतो. 'प्रेम व्यक्त करायला मी का पुढाकार घ्यावा?' या विचाराने दोघे वागतात. त्याचे लग्न घरचे अन्य मुलीशी ठरवतात. तो विचारत नाही म्हणून ती धिटाईने विचारते. तेव्हा तो आपले लग्न ठरल्याचे सांगतो. ती निराश.. हताश. तरीही ते जन्मभर परस्परांना पत्रलेखन करतात. ठाण्याचे सामाजिक कार्यकर्ते दिनकरराव दामले यांच्यापाशी असलेला पत्रव्यवहार.*

* ही पत्रं अद्याप तरी अप्रसिद्ध आहेत.

'कुसुमानिल'मध्ये समावेश करण्यात आलेला (पृष्ठक्रमांक १ ते २३६) म्हणजे आपल्या हाताशी असलेला पत्रव्यवहार पाहून काही गोष्टी स्पष्ट करता येतात. यातील पहिले पत्र कुसुम जयवंत या कॉलेजमधील विद्यार्थिनीचे. तिने २ जुलै १९२२ रोजी आत्माराम रावजी देशपांडे या तिच्याच कॉलेजातील पण सिनिअरच्या वर्गात असलेल्या मुलाला लिहिलेले, आणि शेवटचे अनिलांचे. त्यात 'गगनि उगवला सायंतारा' ही विरहभावना व्यक्त करणारी कविता लिहून त्याने तिला पाठवलेली. आता या जवळजवळ ५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी परस्परांना पुणे, नागपूर, अमरावती, लोणावळा अशा ठिकाणांहून लिहिलेली पत्रे.

आता या पाच वर्षांत प्रारंभी कुसुमच्या मनात अनिलांविषयीच्या प्रेमाच्या बाबतीतला संभ्रम, त्या संभ्रमातून स्वच्छ प्रेमाची झालेली जाणीव. परस्परप्रीतीचा उत्कट गाढ अनुभूतीचा कबुलीजबाब, एखाद्या कर्तव्यदक्ष, आज्ञाधारक, संस्कारसंपन्न मुलीप्रमाणे तिने आपल्या प्रेमाची वडिलधाऱ्यांपाशी केलेली वाच्यता, त्यांचा विरोध, मुलीने बुद्धिमान, आर्थिक दृष्ट्या सुखवस्तू आणि उच्चविद्याविभूषित मुलाबरोबर लग्न करावे आणि सुखपूर्ण संसार करावा अशी कोणत्याही सहृदय पालकांची असते तशी अपेक्षा आणि कुसुम आपल्या सांगण्याला बधत नाही असे पाहिल्यावर तिला मार्गावर आणण्याकरिता आईवडिलांनी आपापल्या परीने चालवलेले प्रयत्न, केलेल्या युक्त्या-प्रयुक्त्या, त्या प्रेमी जीवांची जोडी फुटावी म्हणून प्रसंगी ताठरपणा स्वीकारून आखलेले डावपेच आणि शेवटी शिष्यवृत्ती मिळवून विदेशी जाऊन काही वर्षे शिक्षण घेऊन परत आल्यावर लग्नाला मान्यता देण्यात येईल इतपत त्यांचा वितळलेला विरोध यातील नानाविध प्रसंगांची रंगीबेरंगी चित्रे या पत्रांमधून व्यक्त झाली आहेत.


'कुसुमानिल' हा प्रेमपत्रांचा संग्रह असल्याने १९२० ते १९३० मधील प्रेमपत्रे कशी लिहिली जात यादृष्टीनेच त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. काळ बदलल्यावर, पर्यावरण बदलल्यावर, जीवनशैली, आचारविचार आणि लेखनादर्श यात अंतर पडल्यावर ती काहीशी अनाकर्षक वाटण्याची शक्यता असते. सरोजिनी वैद्य यांची अशी प्रतिक्रिया झाली आहे. पण तत्कालीन कॉलेजातील वातावरण, जी.एस.ची निवडणूक, डॉ. केतकर, प्रा. लागू यांचे विद्यार्थ्यांशी असलेले स्नेहपूर्ण संबंध, तत्कालीन इंग्रजी प्राध्यापकांच्या शिकवण्याचे विद्यार्थ्यांवर होणारे संस्कार, कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा 'शंभर काळाकुट्ट कोळसा' म्हणून अन्य विद्यार्थ्यांचे सर्वसाधारणत्व आणि त्याचबरोबर सावळेपण अधोरेखित करण्याचा कुसुमचा प्रयत्न; फर्ग्युसन कॉलेजातील मुलांचा 'वाढत जाणारा लग्नसंप्रदाय'. (पृ. १३९) अमरावती, नागपूर करीत तत्कालीन उच्च मध्यमवर्गीय कुटुंबातील जीवनशैली, नागपूरकडील कोर्टातील वकिलांच्या खोलीतील वातावरण, त्यांचे चर्चेचे विषय, 'आजकालच्या दिवसात आईबापांच्या विरुद्ध बंड करण्याची फॅशन' असल्याचा कुसुमने केलेला उल्लेख तत्कालीन कुटुंबव्यवस्थेत तरुणपिढी हळूहळू बंड करून उठत होती. किमान

तशी काही उदाहरणे कुसुमपाशी असणार. वऱ्हाडमधल्या स्थितीचे अनिलांच्या पत्रांतून आलेले चित्रण, देशपांडे यांचा पूर्वेतिहास, तत्कालीन प्रतिमांच्या प्रेमिकांच्या पत्रलेखनाचे मायने आणि शेवट, 'Personal ties', 'बिलक्षण position', 'reserved मुलगी', 'माझ्या जिवाभावाच्या फुला', 'माझी बाबी', 'माझ्या जीवा', 'My Lord', 'कुसुमबाळ' अशी संबोधने; 'एक पापा घ्यावासा वाटतो', 'तुझ्या मांडीवर झोपावेसे वाटते', 'तू प्रसन्न झालीस की मला Nobel Prize मिळाल्याचा आनंद', 'कंटाळले-कंटाळले रे अशा यासारख्या suspense ला.' 'मी अगदी खरी तुझीच आहे ना?', 'तुझ्यासाठी रे हा जीव एवढा तळमळतो आहे', 'गोंधळलेली मन:स्थिती' यासारखे त्या प्रेमिकांच्या अतीव आंतरिक भावना व्यक्त करणारे शब्द वा शब्दपंक्ती खास त्या काळाच्याच म्हणता येतील अशा. शिवाय 'अगदी सौभाग्यानी जाणार आहे बरं का!', 'गुरुमहाराजांची पोथी', 'उपासतापास', गौरीहर पुजणे, अबोला, ज्योतिष्याचे वेड अशा कितीतरी नोंदी तत्कालीन जीवनसरणीच्या द्योतक आहेत. 'कुसुमानिल'मधील पत्रे ही उच्च मध्यमवर्गीय, सुशिक्षित, संस्कारक्षम आणि बुद्धिमान प्रेमिकांची पत्रे आहेत. त्यांच्या पत्रांमधून त्यांच्या साहित्य-कलाविषयक संवेदनशील जाणिवांचे प्रत्यंतर वाचकाला येते. एखादा स्पंज जसा पाण्यात चिंब भिजावा तशी ही मने शेले, ब्राऊनिंग दांपत्य, शेक्स्पीअर, कार्लाईल, डांटे, मेटरलिंक, केशवसुत, बी., गडकरी यांच्या काळात, बी. ऑस्कर वाईल्ड यांच्या लेखनात, नंदलाल बोस, अवनिंद्रनाथ टागोर यांच्या चित्रांमध्ये आकंठ भिजलेली आहेत. याचा परिपाक म्हणजे या तरुणांच्या सर्जनशीलतेला धुमारे फुटण्याचा हा काळ होता हेही लक्षात येते. अनिलांच्या ठिकाणी विविध भाववृत्तीनुसार लिहिली जाणारी कविता, पत्रात्म लेखनातला त्यांचा युक्तिवाद; कुसुमावतींच्या पत्रांतून व्यक्त होणारी त्यांची विदग्ध वृत्ती, चौफेर वाचन, संवेदनशीलता आणि पी.वाय.ने 'बंधनाच्या पलीकडे' नावाच्या समकालीन बदलत्या कुटुंबव्यवस्थेवर व लग्नसंस्थेवर लिहिलेल्या कादंबरीचा निर्देश लक्षात आल्याशिवाय राहत नाही. खरे तर 'कुसुमानिल'मध्ये कुसुम जयवंत – आत्माराम रावजी देशपांडे, विमल कोल्हटकर आणि पी.वाय. देशपांडे आणि इरावती-श्रीराम यांच्या अनुनयोत्तर प्रेमविवाहाच्या कहाण्या शब्दबद्ध झाल्या आहेत.

सारांश, 'कुसुमानिल'मध्ये केवळ फर्ग्युसन कॉलेजच्या मुला-मुलींच्या लग्नाचा वाढत जाणाऱ्या संप्रदायाचे चित्रण नाही, उलट १९२० ते १९३० दरम्यानच्या लग्नसंबंधातल्या बदलत्या स्थित्यंतराची सौम्य-गडद चित्रे आहेत; ती खरी आहेत आणि म्हणूनच अस्सल सामाजिक दस्तऐवजाचे मोल त्याला निश्चित लाभले आहे.

**– डॉ. अनंत देशमुख**
भ्रमणध्वनी : ९८२०८८७४०७
dranantdeshmukh@gmail.com

**ग्रंथाली**



**शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!**
**सुशीलकुमार शिंदे**

सुशीलकुमार शिंदे यांच्या सदर कवितासंग्रहात शहर हे मध्यवर्ती रूपक आहे. त्याच्या माध्यमातून त्यांनी आजच्या मानवी-अमानवी स्थितिगतीचे चित्रण केलेले आहे. त्यांच्याच एका कवितेत म्हटल्याप्रमाणे –

'कागदावर उतरले ते
निव्वळ शब्द नव्हतेच कधी,
ती आदिम वर्षांची घुसमट
सांडत गेली अक्षरांतून सहजपणे'

ही घुसमट त्यांच्या सर्वच कवितांतून व्यक्त झालेली आहे. मात्र नैराश्याने सारे आसमंत वेढलेले असतानाही त्यांच्या कवितेत आशेचा चिवट स्वर आहे, तीव्र जिजीविषा आहे. 'उजेड पेरणाऱ्या मशाली अद्यापही कुणाच्याच गुलाम नाहीत' असे त्यांनी म्हटलेलेच आहे. त्यांच्या कवितेची भाषा खडबडीत, रोखठोक अशी आहे. तथापि त्यांची स्वत:ची एक प्रतिमासृष्टी आहे. नामदेव ढसाळ, अरुण काळे यांच्या कवितेशी त्यांच्या कवितेचे आंतरिक नाते आहे हेही जाणवते. मात्र त्यांचेच शब्द वापरून सांगायचे, तर 'माणसांचा बोन्साय करण्याचा काळ तेजीत असताना' त्यांच्या कवितेने स्वत:ची गुणसूत्रे जपलेली आहेत हेही जाणवते.

**– वसंत आबाजी डहाके**

**मूल्य ८० रुपये • सवलतीत ५० रुपये**

# बदलत्या जगाच्या क्षितिजावर भारताचा नवा उदय

**('गर्जे मराठी'च्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केलेले मार्गदर्शन)**

व्यासपीठावरील मान्यवर व आपण सर्व महाराष्ट्रप्रेमी व मराठीप्रेमी... 'गर्जे मराठी' या पुस्तकातील ३३ मानाच्या शिलेदारांना मुजरा करून, भाषणाची सुरुवात करतो.

आनंद व सुनीता यांनी मला आग्रह केला, की तुम्ही गर्जे मराठी'ची प्रस्तावना लिहा. कुठल्याही पुस्तकाची प्रस्तावना लिहायची म्हटली की पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत ते पुस्तक मी आधी वाचतो. आतापर्यंत असं कधीही झालेलं नाही, की न वाचताच मी प्रस्तावना लिहिली आहे. तर, या पुस्तकाची सगळी -३३५ पानं मी वाचलेली आहेत. त्यामुळे मी हे सांगू शकतो की हे एक प्रेरणादायी पुस्तक आहे. या पुस्तकासाठी ग्रंथालीचं, आनंद, सुनीता, शैलेश, गायत्री व ज्यांचा ज्यांचा या पुस्तकाला ते पूर्णत्वाला नेण्यास हातभार लागला, त्या सर्वांचेही मी अभिनंदन करतो. हे पुस्तक खूपच प्रभावशाली राहणार आहे. माझी आपणांस विनंती आहे की, हे पुस्तक मराठीमध्ये तळागाळापर्यंत, खेड्यातील तरुणांपर्यंत पोहोचायला हवे.

आज मला पाच मुद्दे आपणांसमोर विचारार्थ ठेवायचे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे, हे सर्व झालं कसं, म्हणजे या यशस्वी कथेमागची कथा काय आहे? कुठेतरी एक ठिणगी पेटते आणि त्यातून काहीतरी निर्माण होतं. हे पुस्तक का केलं, याविषयी मी वाचत होतो. त्याविषयी पुस्तकात एक महत्त्वाचं वाक्य लिहिलंय - वी हॅव टू कम्पाइल द इन्स्पायरिंग बायोग्रफिज ऑफ मराठी एनआरआयज् व्हिच हॅव अचिव्हड् एक्सलेन्स थ्रू एज्युकेशन.' शिक्षण! हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे, असं मला वाटतं. गेल्यावर्षी एकेठिकाणी आमची चर्चा चालली होती. जगातील सर्वांत प्रभावी वैज्ञानिक समीकरण कोणतं? असा प्रश्न त्या चर्चेत केला गेला. एक मुलगा उठला व म्हणाला, 'न्यूटनचं समीकरण. बल = वस्तुमान x त्वरण.' त्यावर दुसरा मुलगा उठला व म्हणाला, 'नाही. आइन्स्टाईनने दिलेलं समीकरण सर्वांत प्रभावी आहे. E= mc2.'... अशी बरीच चर्चा चालली होती. मी शांत बसून होतो तिथे. मला शेवटी विचारलं गेलं की, तुम्ही शांत आहात. काहीच बोलत नाही आहात. तुम्हाला कोणते समीकरण सर्वांत प्रभावी वाटतं?' मी म्हणालो, ना न्यूटन, ना आइन्स्टाइन. E=F हे समीकरण मला सर्वांत प्रभावी वाटतं.' सर्व विचार करायला लागले. हे कोणतं समीकरण? E काय आहे? F काय आहे? तर ए म्हणजे एज्युकेशन व E म्हणजे फ्युचर! यावर कोणी म्हणेल, तुम्ही वैज्ञानिक आहात. एखादा सिद्धांत मांडला किंवा समीकरण मांडलं तर त्याची सिद्धताही दिली पाहिजे ना!' सोपं आहे हो! (व्यासपीठाकडे निर्देश करत) E=F. तर, सांगण्याचा मुद्दा हा की, शिक्षण ही गुरुकिल्ली आहे, पण तिथेच शेवट नाही. त्यामुळे मला हे समीकरण आणखी थोडं विकसित करावसं वाटतं. ते असं असायला हवं : Future = Education + Opportunity. याचे कारण नुसतं शिक्षण मिळून उपयोग नाही. संधीही मिळायला हवी.

इथे एक अनुभव सांगावासा वाटतो. भारतात 'नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन' आहे. २००६ साली त्याची स्थापना झाली. तेव्हापासून मी त्याचा अध्यक्ष आहे. या संस्थेमागील आमचा मूळ उद्देश असा की, १.३ बिलियन इंडियन्स डू नॉट रिप्रेझेंट १.३ बिलियन माऊथस्, दे रिप्रेझेंट १.३ बिलियन माइन्डस्!' याचा अर्थ प्रत्येकजण काहीतरी आहे. त्याला आम्ही 'ग्रासरूट इनोव्हेशन्स' असं म्हणतो. कोणी शेतकरी असेल, कोणी हस्तकारागीर असेल, गृहिणी असतील किंवा शिक्षण मध्येच सोडलेले नागरीक असतील, प्रत्येकजण काहीतरी देऊ शकतो. आम्ही अशा सृजनशील नागरिकांचा दरवर्षी सत्कार करतो. मला आठवतं, डॉ. कलाम यांच्या हस्ते एकदा पुरस्कार देण्यात आले होते. पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये १५-१६ जण अनवाणी पायाने आले होते. यावरून या कामाची कल्पना येऊ शकेल. तर, या संस्थेसाठी आम्हांला चिफ इनोव्हेशन ऑफिसर नेमायचा होता. त्यासाठीच्या निवड समितीचा मी प्रमुख होतो. एकजण आपलं परिचयपत्र घेऊन आमच्याकडे आला. तो ब्रॅन्डिंग क्षेत्रातील तज्ज्ञ होता. तसं त्याच्या परिचयपत्रात नमूद केलं होतं. मी त्याला म्हटलं, 'खूपच छान. तुम्ही ब्रॅन्डिंग तज्ज्ञ आहात, तर भारताचं ब्रॅन्डिंग कसं कराल?' या प्रश्नावर तो गोंधळला. कारण आतापर्यंत तो मोटर कार, रेफ्रिजेरेटर अशा उत्पादनांचं ब्रॅन्डिंग करत आला होता. आणि आम्ही त्याच्यासमोर भारताचं ब्रॅन्डिंग करण्याविषयी बोलत होतो! मी म्हटलं, तुम्हांला सोपं करून सांगतो. उदा. 'अमेरिका इज द लॅण्ड ऑफ ऑपॉर्च्युनिटी.' त्यावर तो म्हणाला, 'इन्डिया इज द लॅण्ड ऑफ आयडियाज्!' सांगायचा मुद्दा हा की, भारताला संधी पुरवणारा देश कसं बनवायचं, हा प्रश्न आहे.

या पुस्तकात ज्या ३३ जणांविषयी लिहिलं आहे, त्यातील १०-११ जण माझ्या परिचयाचे आहेत. काही जवळून, तर काही थोडेसे दुरून. पण परिचयाचे आहेत. उदा. दिनेश केसकर. मला आठवतं, १५ वर्षांपूर्वी डॉ. विजय केळकरांकडे भोजनासाठी आम्ही एकत्र होतो. दिनेश गेल्यानंतर मला डॉ. केळकर म्हणाले की, 'दिनेशच्या प्रवासाकडे पाहा. येत्या काळात तो नक्कीच भारताला चांगल्या ठिकाणी पोहोचवेल.' आणि तुम्ही ते केलेलं आहे. मला या गोष्टीचा अभिमान वाटतो. या पुस्तकातील सर्वच व्यक्तींचं काम व त्यांचं यश महत्त्वाचं व मोठं आहे. यातील अविनाश दीक्षित, अभय अष्टेकर, सदानंद जोशी, श्रीकांत दाते... हे सर्व माझ्या परिचयाचे आहेत. यातला एक भाग मला सांगावासा वाटतो, की या पुस्तकाची दुसरी आवृत्ती लवकरच येईल याची मला खात्री आहे. त्यात पहिल्या आवृत्तीप्रमाणे चरित्रात्मक माहिती येईलच, पण या मान्यवरांचा हा

अनोखा प्रवास घडला कसा, त्या कथेमागची कथाही त्यात असायला हवी, असं मला वाटतं.

मी थोडं विस्तारानं सांगतो. उदा. अविनाश दीक्षित. त्यांच्याविषयी बाहेर कुठेही माहीत नसलेली माहिती मी तुम्हांला सांगतो. अविनाश मला जयहिंद महाविद्यालयात एक वर्ष सिनिअर होता. मला आठवतं, तो इन्टरसायन्सला पहिला आला होता. ८९% गुण मिळवून त्याने विक्रम केला होता. त्या काळात अरुण दळवी व मी, आम्ही दोघं अविनाशकडे जायचो. तो आम्हांला प्रश्न द्यायचा व त्याची उत्तरे लिहायला सांगायचा. मात्र आमची उत्तरे वाचून तो कागद फेकून द्यायचा! काय लिहिलंय तुम्ही हे! लक्षात घ्या की, अरुण अकरावीला १,३५,००० विद्यार्थ्यांमध्ये नववा आला होता, व मी अकरावा. परंतु आमची उत्तरं त्याला आवडत नसत! त्याची बुद्धिमत्ता इतकी होती की, समजा, परीक्षेत नऊ प्रश्न आहेत व त्यातील कोणतेही सहा सोडवा असे दिलेले असायचे. हा नऊच्या नऊ सोडवायचा व कोणतेही सहा तपासा असं लिहायचा! मला पहिल्या वर्षाला ७६% गुण मिळाले. तो त्यावेळी एक विक्रम होता. त्याला ते कळालं. त्याने मला फोन केला व घरी बोलावलं. मरिन लाईन्सला त्याचं घर होतं. मी संध्याकाळी त्याच्या घरी गेलो. त्याच दिवशी त्याचाही निकाल लागला होता बी.एससी. (मॅथेमॅटिक्स व फिजिक्स प्रिन्सिपल हा विषय) मी त्याचं अभिनंदन केलं. नंतर आमच्या गप्पा झाल्या. चहा झाला. यात मी त्याचे गुण विचारायचंच विसरून गेलो होतो. नंतर एकजण आला, व त्याने अविनाशचं अभिनंदन केलं. त्याला मिळालेले गुण विचारले. त्यावर अविनाश म्हणाला, १००% तर, अशी त्याची बुद्धिमत्ता! इथून तो केंब्रिजला गेला. रँगलर झाला. तिथून एमआयटी. मग कॅलिफोर्निया विद्यापीठ व पुढे प्रिन्सटनला. हा त्याचा प्रवास प्रेरणादायी आहे. मागे माझी आणि अमर्त्य सेन यांची भेट झाली होती. त्याच्या 'आर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन' या पुस्तकाचं प्रकाशन होतं. त्यावेळी ते मला म्हणाले की, एक दिवस अविनाशला नोबेल पुरस्कार नक्कीच मिळेल. त्याची तितकी क्षमता आहे.' मी आशा करतो की हे नक्कीच होईल.

यातील दोन मुद्दे मला सांगावेसे वाटतात. माझा प्रवास कसा झाला पाहा. मुंबई, मग थोडा काळ साऊथ वर्ड, तिथून परत पुण्याला, मग मुंबई, व आता परत पुण्याला जाणार. तर, अविनाशचा प्रवास मुंबई, मग केंब्रिज, तिथून एमआयटी (तिथे तो प्राचार्य होता), पुढे कॅलिफोर्निया व नंतर प्रिन्सटन. हे सारे रंजक आहे. २००५ मध्ये आम्ही दोघं यु.एस. नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सचे फेलो झालो. एकाचवेळी. या संस्थेचं फेलो होणं फार कठीण. हॅरि क्रुटो हे नोबेलविजेते. त्यांना आधी नोबेल मिळालं व नंतर ते या संस्थेचे फेलो झाले. मात्र २००५ मध्ये आम्ही दोघं या संस्थेचे फेलो झालो. मला आजही आठवतो तो प्रसंग, तिथे आम्ही नंतर बोलत होतो. अविनाशनं त्याच्या पी.एचडी.च्या प्रबंधाविषयी सांगितलं. केवळ ३८ पानांचा तो प्रबंध! त्याचं बाइंडिंग कसं करायचं हा प्रश्नच होता. मग वर ३० व खाली ३० पान जोडून त्याचं बाइंडिंग केलं गेलं! तर, अशी ही अद्भुत व्यक्ती आहे. मला आनंद आहे की, त्याचा समावेश या पुस्तकात आहे. त्याच्यामुळे या पुस्तकाची उंची वाढली आहे. मला असं वाटतं, की दुसरी आवृत्ती काढताना यात या व्यक्तींच्या जीवनातील चढउतार, त्यात आलेले यश-अपयश, त्यावर त्यांनी केलेली मात हे सारं यावं.

मला या पुस्तकाचं मुखपृष्ठ फार आवडलं. काय दिसतं यात? पहिली गोष्ट म्हणजे, महाराष्ट्रातून एक व्यक्ती वर जातेय आणि झेंडा रोवतीय. पण हे करताना ती व्यक्ती शिडिनं वर चढतीय. शिडिवरून चढणं म्हणजे मेहनत आहे. मी विद्यार्थ्यांना नेहमी सांगतो की मेहनतीला पर्याय नाही. मी दिवस दिवस, आठवडे- आठवडे, महिनोनमहिने, वर्षानुवर्षे हे करत आलो आहे, आताही करतोय आणि शेवटच्या श्वासापर्यंत करत राहणार. मेहनतीशिवाय आपण काहीही मिळवू शकत नाही.

आधी मी 'लॅण्ड ऑफ ऑपुर्च्युनिटी'विषयी बोलत होतो. त्याबाबतीत मला एक अनुभव सांगावासा वाटतो. सात-आठ वर्षांपूर्वी बिल गेटस् दिल्लीला आले होते. त्यांच्यासह भोजन व चर्चा असा कार्यक्रम होता. तेव्हा त्यांना भेटण्याची संधी मिळाली. तिथे नंदन निलकेणी, अरुण मायरा वगैरे लोक होते. गेटस् यांनी आम्हाला एक गोष्ट सांगितली... त्यांना हार्वर्ड विद्यापीठाने व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते. गेटस् व्याख्यानाला गेले व म्हणाले, 'आय ॲम द मोस्ट सक्सेसफुल ड्रॉपआउट ऑफ हार्वर्ड!' खरं आहे ते. त्यांना मिळालेले यश आपण पाहिले आहे. त्यांनी आम्हांला सांगितले की, तो काळ नुकताच संगणक येऊ लागल्याचा होता. अलबुक येथील एक कंपनी संगणकासाठीचे हार्डवेअर बनवत असे. गेटस् यांनी विचार केला की, ही कंपनी हार्डवेअर बनवते, तर त्यांना सॉफ्टवेअरची आवश्यकता असणार. म्हणून गेटस् यांनी त्यांना फोन केला. फोन करताना गेटस् यांना ती कंपनी नकार देणार असेच वाटत होते. मात्र कंपनीकडून उत्तर आलं की, आमची तयारी अजून झालेली नाही. तुम्ही एक महिन्यानंतर या. गेटस् आम्हाला म्हणाले, बरं झालं कंपनीने मला एक महिन्याच वेळ दिला. कारण माझ्याकडे त्याक्षणी सॉफ्टवेअर तयार नव्हतं! आता बोला! परंतु यात एक गोष्ट आपण ध्यानात घ्यायला हवी, ती म्हणजे विशीतील एक तरुण त्या कंपनीला फोन करतो काय, आणि ती कंपनीही त्या तरुणावर विश्वास दाखवते. याचाच अर्थ, बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान व विश्वास एकमेकांच्या हातात हात घालून चालत असतात.

इथे आपण हे लक्षात घ्यायला हवे की, आपला समाज हा धोक्याचा सामना करण्याच्या मानसिकतेत सहसा नसतो. परंतु माझा प्रश्न आहे की, अपयशाशिवाय यश कसं मिळेल? तुम्ही बदल व्हावा असं म्हणता, त्यावेळी बदल हा केवळ बाह्य साधनांचा असू शकेल का? नाही तो आंतरिकही असावा. मी रॉयल सोसायटीचा फेलो आहे. माझ्यासह एम. एम. शर्मा व प्रा. गौतम नरसिम्हन यांनाही सोसायटीने फेलो देऊन सन्मान केला. या यादीत आम्ही तिघेच भारतीय आहोत. आणि मी एकमेव महाराष्ट्रीय. परंतु मला याचे समाधान नाही. महाराष्ट्राला ६० वर्षे झालीत. या यादीत आणखी वाढ व्हायला पाहिजे, असं मला वाटतं. इथे सभागृहात माझे मित्र नरेश बसलेले आहेत. ते माझे खूप जवळचे मित्र आहेत. पेशाने ते वास्तुविशारद आहेत. वॉशिंग्टनमध्ये त्यांनी सुमारे चार दशके काम केलं आहे. आता ते भारतात परत आलेत. आज आम्ही पुणे- मुंबई प्रवास एकत्र केला. त्यावेळी ते म्हणाले, मी आधी देशी होतो मग परदेशी झालो. आणि परत देशी! हा देशी-परदेशी-देशी प्रवास

होण्यासाठी आपण किती काळ घेतो, हे मला महत्त्वाचं वाटतं. मला आठवतं, १९७४ साल होतं. माझे वय ३१ वर्ष होतं. मी बाहेरच्या देशात काम करत होतो. त्यावेळी माझे गुरू डॉ. बी. डी. टिळक यांनी मला एक सांगावा धाडला, डॉ. नायडूमा यांना जाऊन भेट. डॉ. नायडूमा तेव्हा सी.एस.आय.आर.चे संचालक होते. मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा मला कल्पनाही नव्हती की पुढच्या अर्ध्या तासात मी भारतात परतण्याचा निर्णय घेईन. पण डॉ. नायडुमा यांनी मला सांगितले की विज्ञानाशिवाय भारत प्रगती करू शकत नाही. तुमच्यासारख्या तरुणांनी यासाठी प्रयत्न करायला हवेत... आणि मी भारतात परतण्याचा निर्णय घेतला. आम्ही येथे कामाला सुरुवात केली, तेव्हा आमच्या प्रयोगांसाठी लागणारी साधने आमच्यापर्यंत पोहोचायला खूप वेळ लागे. बहुतांश साधने भारतात तयार होत नसत. संशोधनपर नियतकालिकं भारतात यायला ३ महिने लागत. अशी सारी परिस्थिती. परंतु आम्ही काम केलं. सांगायचा मुद्दा हा की, 'पॉवर ऑफ आयडियाज, नॉट पॉवर ऑफ बजेट'.


एके ठिकाणी मी व्याख्यानासाठी गेलो होतो. विषय होता - सत्यं शिवं सुंदरम. सत्या नाडेला (मायक्रोसॉफ्ट), सुंदर पिचाई (गुगल)... आता शिवंची जागा भरायची आहे! तिथे एक मुलगा उभा राहिला व म्हणाला, 'सर, तुम्ही आमच्या पिढीशी परिचित नाहीत.' मी त्याला विचारलं, 'तुला असं का वाटतं?' तो म्हणाला, 'तुमची पिढी यु.एस. किंवा इतर देशांत काम करण्यास उत्सुक असायची. नंतरची पिढी मायक्रोसॉफ्ट किंवा गुगलमध्ये काम करतेय. परंतु आमची पिढी आपले स्वतःचे गुगल, मायक्रोसॉफ्ट बनवू इच्छिते.' त्या मुलाचे हे उत्तर मला आशावादी राहण्यास आणखी बळ पुरवते.

एक मुद्दा आणखी सांगावासा वाटतो, तो म्हणजे आपली संस्कृती जपण्याचा. आपला वारसा, मराठी संस्कृती जपण्याकडेही आपण लक्ष द्यायला हवे. याबाबतचे माझे काही अनुभव आहेत. नुकतेच मी बीएमएम कन्व्हेंशन अटलांटा येथे गेलो होतो. मी तिथे प्रमुख पाहुणा होतो. तिथे मला तीन हजार मराठी माणसं दिसली. पॅरिसच्या फ्रेंच अकॅडमी ऑफ सायन्सने मला 'वुल्फ - रामानुजन' मेडल दिलं. तिथे पॅरिसच्या मराठी मंडळाचे सदस्य उपस्थित होते. झुरीक येथील विद्यापीठाने मला प्रेसिडेन्शियल लेक्चर देण्यासाठी आमंत्रित केलं होतं. त्या दिवशी दसरा होता. तिथल्या मराठी मंडळानं त्या दिवशी तिथं आपट्याची पानं वाटली. कल्पना करा झुरिक आणि आपट्याची पानं! येथे दि.पु. चित्रेंबद्दल सांगायला हवे. त्यांनी विविध क्षेत्रांत प्रचंड काम करून ठेवलंय. नरेश, अशोक कामेरकर, विवेक खाडीलकर हे त्यांच्याबरोबर होते. त्यांनी 'पश्चिमा' नावाची एक संस्था काढली. स्वतःच्या खिशातले व काही वर्गणी काढून त्यांनी ही संस्था चालवली. सिनेमहोत्सव, नाटकं असं खूप काही उपक्रम त्यांनी राबवले. स्वतःच्या जीवनाची ४०-५० वर्षे देणाऱ्या अशा माणसांचे उल्लेख यायला हवेत. त्यांना मानाचं पान द्यायला हवं. येथे अनेक जण असे आहेत, त्यांनी देशासाठी काहीना काही केलं आहे. अशोक गाडगीळ येथे आहेत. त्यांचं पाण्याविषयीचं काम महत्त्वाचं आहे.

आता स्टार्टअपचा जमाना आहे. स्टार्टअप सुरू करणाऱ्यांना पैसे देणं सोपं आहे. मी बीएमएम कन्व्हेंशनमध्ये सांगितलं की, मी कसं दिव्याखाली अभ्यास केला. अनवाणी पायाने बाराव्या वर्षापर्यंत होतो. टाटांची ६० रुपयांची शिष्यवृत्ती मिळाल्याने माझं शिक्षण पूर्ण झालं. हे पैसे मी त्यांना डॉलरमध्ये रूपांतरीत करून सांगितले. केवळ शंभरेक डॉलरमध्ये एखाद्या विद्यार्थ्यांचं शिक्षण आपण पूर्ण करू शकता, असे अनेक माशेलकर यातून तयार होऊ शकतात, हे त्यांना पटवून दिलं. कार्यक्रमानंतर मला अनेकजण भेटायला आले. याविषयी आपण काहीतरी करूयात म्हणाले. या सर्वांचं मन मोठं आहे. परंतु केवळ पैसे देऊन भागणार नाही. आपण वेळही द्यायला हवा. मुले उत्साहाने स्टार्टअप सुरू करतात, पण नंतर भरकटत जातात. त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. ही गरज आपणांसारख्यांनी पूर्ण करायला हवी. तसा वेळ आपण दिल्यास येत्या काळात आपले स्वतःचे मायक्रोसॉफ्ट, गुगल बनवण्याचं स्वप्न पूर्ण होईल, यात शंका नाही.

**(शब्दांकन - प्रसाद हावळे)**

prasadhavale@gmail.com


**मूल्य : रु. १२५०, सवलतीत : रु. ८००**

**(पाने ३३५, आकार रॉयल डेमी, संपूर्ण रंगीत, हार्ड बाऊंड)**


ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई-१६


दूरध्वनी : (०२२) २४२१६०५० / २४३०६६२४

granthaliruchee@gmail.com / www.granthali.com

# Garje Marathi

दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी
मुंबईत झालेल्या
प्रकाशन सोहळ्यातील
संस्मरणीय क्षणांची
रुपेरी झलक...





कर्तृत्वाला संधी
देणारा देश
अशी भारताची
नवी ओळख
जगाला व्हावी...



श्री. अमित वाईकर
चीन



श्री. मंदार बिच्चू
दुबई

डॉ. दिनेश केसकर
अमेरिका





श्री. रवींद्र नेने
अमेरिका



श्रीमती नंदिनी नेने
अमेरिका



श्री. हर्षवर्धन भावे
सिंगापूर



श्री. अरुण जोशी
अमेरिका



श्री. प्रशांत खरवडकर
चीन



श्री. नंदकुमार ढेकणे
चीन



डॉ. विजय जोशी
ऑस्ट्रेलिया



डॉ. अजय राणे
ऑस्ट्रेलिया



गर्जे मराठी
॥ बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा... ॥

# कृतज्ञता आणि कौतुक



NIGERIA
CHAD
SUDAN
CAMEROON
CENTRAL AFRICAN REP
AFRICA
ETHIOPIA
UGANDA
KENYA
SOMALIA
DEM. REP. OF CONGO
ANGOLA
ZAMBIA
MALAWI
NAMIBIA
SOUTH AFRICA
MADAGASCAR
SAUDI ARABIA
EGYPT
GREECE
BULGARIA
MEDITERRANEAN SEA









# Garje Marathi








## पुन्हा भेटू

मराठी आवृत्तीच्या निमित्ताने...

# याच महिन्यात प्रकाशित होत आहेत.




पडझड अटळ असली तरी (उद्ध्वस्त न होता)
पुनर्वसनाची प्रेरणाही निरंतर राहणारच.
हा विश्वास, वाचकालाही
सर्जनात्मक जाणिवांचे
'पुनर्वसन' करण्याची ऊर्जा देणारा आहे.
समर्थ कथाकार विजया राजाध्यक्ष
यांची नवी कोरी लघुकादंबरी.

## पुनर्वसन

**विजया राजाध्यक्ष**

**मूल्य : १८० रुपये**

'सरोगेट मदर' हा अपत्यहीन स्त्रीला
मातृत्वाकडे नेणारा दरवाजा आधुनिक
तंत्रज्ञानाने उघडला. मात्र या तंत्रज्ञानाच्या
वापरापोटी उद्भवणाऱ्या वैयक्तिक,
सामाजिक, आर्थिक, नैतिक आणि
कायद्याच्या समस्यांनीही डोकं वर काढलं.
या समस्यांनी स्त्रियांच्याच नव्हे तर त्यांच्या
पुरुष जोडीदाराच्या किंबहुना सर्व कुटुंबाच्याच
भावजीवनात अभूतपूर्व वादळं उठू लागली.
या वादळांच्याच विज्ञानकथांचा हा संग्रह

## तीन पायांची शर्यत

**डॉ. बाळ फोंडके**

**मूल्य : २०० रुपये**




मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८९ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८
Website : www.majesticprakashan.com I E-mail : majesticph@gmail.com


आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755

# विजय सातपुते यांच्या निवडक कविता


## लक्षात ठेवा

लक्षात ठेवा
हे जग
किंवा कुठलाही देश
हुकूमशहांच्या टाचेखाली
फार काळ
दाबला जाऊ शकत नाही.
कारण
त्यांनी घेतलाय आकार
संतमहात्म्यांच्या वचन-प्रवचनातून.
अनुभवलंय स्वातंत्र्य
निळ्याशार आकाशातून.
ओतल्यात
आपल्या इच्छाआकांक्षा
त्यांच्या पायाशी.
दिलंय दृढ आलिंगन
निमावी वेदना
चुटकीसारखी म्हणून.
मी जुमानत नाही
हुकूमशहांच्या टाचांना
की बधणार नाही त्याच्या
करड्या नजरांना.
वारंवार कुठल्यातरी
खुळाची भीती दाखवत
त्यांनी...
भिववले आम्हा सर्वांना.
ठेवलंय
एका आशेवर
जी कधीही
फलद्रूप होणार नाही.
आम्ही झालोय
गुलाम त्यांचे
आणि
त्यांच्याच विचारांचे.
करून टाकलीय नसबंदी
आम्ही आमच्यात हातानं
पण-
नवी वाट,
नवी आस असंभव,
असे कधी होणार नाही
लक्षात ठेवा!



हा असा तसा मरणार नाही
मरताना अनेकांना जागविल....
अशा दमदार ओळी लिहिणारे विजय सातपुते हे कामगार आणि दलित चळवळीतील एक संघर्षशील व्यक्तिमत्व होते. भारत पेट्रोलियममध्ये नोकरी करत असताना त्यांचे कामगार चळवळीशी दृढ नाते जुळले आणि कामगारांच्या समस्यावर आवाज उठवण्याच्या उद्देशाने त्यांनी १९८७ मध्ये सत्यशोधक कामगार संघटनेची स्थापना केली.नाका कामगारांसाठी त्यांनी केलेले काम महत्वाचे आहे.चळवळीचा भाग म्हणून त्यांनी सत्यशोधक महाराष्ट्र पत्रिकेची स्थापना केली. २००२ पासून सलग जवळपास बारा वर्षे त्यांनी संपादक या नात्याने या पत्रिकेचे काम पाहिले. १७ ऑगस्ट हा या लेखक, कवी आणि शोषितांच्या प्रश्नावर सतत कार्यरत कार्यकर्त्याचा जन्मदिवस.... त्यानिमित्त त्यांच्या आठवणी जागवतो आहोत. विजय सातपुते यांच्या या निवडक कविता...





## दु:ख

इथे मी
दु:खातील फरक
स्पष्ट करून सांगतो.
दु:खाचा परिणाम हा जसा
मानवी देहातून निघालेला
कलात्मक अविष्कार असतो
तसाच त्या दु:खाचा
पुरावाही असतो.
दु:ख जेवढे गहिरे
तेवढे ते सृजनशीलही असते
म्हणून दु:खाच्या सोसातून
झालेली निर्मिती
अनेक काळ माणसांना
भुरळ पाडते.
दु:ख झेलणाऱ्यांसाठी
ती एक पर्वणीच असते.
गरज नाही दु:ख
प्रत्येकाला अनुभवण्याची,
त्याची कल्पनासुद्धा
पुरी व खरी असते.
मात्र त्यासाठी
ते आपले आहे, हे जाणणारे
मनही लागते.
बुद्धाला दु:ख होते
असे कुणीही
म्हणणार नाही
पण त्याने
जाणून घेतले
मृत्यूनंतर शरीराचे काय होते?
कंपोझ शरीर, डिकंपोझ होताना
त्याला झालेले
त्याचे दर्शन
मोठे अपूर्व होते.
तृष्णा दु:खाला
कारण खरी
पण ती नसेल तर?
हा प्रश्न त्याच्याकडून
कायमचा अनुत्तरित राहिला
आणि त्याचाच फायदा
त्याच्या हितशत्रूंनी घेतला.

## कविता अशी

कविता अशी
वैराण व्हावी
उतरताना अचानक
बेजान व्हावी.
शब्दांच्या पलिकडील दुनिया
अकस्मात जागी व्हावी
तशी कविता
वादळात निखळलेल्या
झाडाची फांदी.
मृत्यूच्या अलिकडे, पलिकडे
उमटावी कविता
निष्ठुर भावनांची
व्हावी कोवळी सकाळ
तशी कविता सदासर्वकाळ
अगदी निर्गुण निराकार
तिला न कसला
आकार न उकार
नुसतीच सबगोलाकार.
तशी कविता,
भलत्यासलत्या अर्थाची
आखूड रेषा व्हावी,
किंवा
नेमक्याच आशयाची
वाहक व्हावी
नाही तर दाहक आग व्हावी.
अन्यथा,
संभाव्य मृत्यूची चाहूल व्हावी.
कविता...

## आणि कागदावर शब्द उमटताना...



# ‘आकाशवाणी’
# पुढच्या पिढ्यांचा विचार असणारं माध्यम

उमा दीक्षित

*आकाशवाणीशी महाराष्ट्रातील विविध पिढ्यांचे अतूट नाते आहे. शहर ते ग्रामीण भाग असा विस्तृत पट आकाशवाणीने निनादून टाकला. अलीकडच्या काही वर्षांमध्ये दूरदर्शन नि वृद्धिंगत होत जाणारे वाहिन्यांचे जाळे यातही आकाशवाणीने स्वत:चे अस्तित्व जपले.. आकाशवाणीच्या नव्वदीनिमित्ताने ‘शब्दरुची’च्या वाचकांसाठी हा विशेष लेख....*

‘बहुजन हिताय बहुजन सुखाय’ या आपल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी गेली नव्वद वर्ष आकाशवाणी कार्यरत आहे. स्वातंत्रपूर्व काळात १९२३ साली Indian Broadcasting Association या प्रसारण संस्थेची स्थापना झाली. पुढे १९२७ साली All India Radio असं या संस्थेचं नामकरण झालं. ज्याचं कालांतराने आकाशवाणी असं स्वदेशी नावाने बारसे झाले. सुरुवातीला मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास अशा ४ महानगरात सुरू झालेल्या प्रसारण संस्थेचा व्याप इतका प्रचंड वाढला की आजमितीला आकाशवाणीची संपूर्ण देशभरात एकूण ४२१ केंद्रे आहेत. मुळात सुरू झालेल्या प्रमुख वाहिन्यांव्यतिरिक्त एफ.एम, डी.टी.एच. माय. मराठी, विदेशी प्रसारण सेवा, रागम, अशा अनेक वाहिन्या सुरू झाल्या. १९९४ साली सुरू झालेल्या एफ.एम.गोल्ड आणि एफ.एम.रेनबो या वाहिन्यांनी जनमानसांत आनंदाची एक टवटवीत लहर निर्माण केली. दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांच्या प्रभावात आकाशवाणी काहीशी धूसर होत आहे की काय असं वाटत असतांना एफ एम वाहिन्यांनी हा चमत्कार घडवला. आकाशवाणी पुन्हा एकदा घराघरात ऐकली जाऊ लागली. २००४ साली सुरू झालेल्या डी.टी.एच.माय. मराठी या उपग्रह वाहिनीने तर आकाशवाणीला साता समुद्रापार नेलं. जगभरात विविध ठिकाणी राहणारे भारतीय या डी.टी.एच.मुळे आता आपल्या मातृभाषेतले कार्यक्रम ऐकू शकत होते. इंटरनेटच्या मदतीने या प्रसारण सेवेचा खऱ्या अर्थाने जगभरात संचार होऊ लागला. यात संगीतप्रेमींसाठी ‘रागम’ नावाच्या वाहिनीची सुरेख भर पडली आणि लाइव्ह स्ट्रिमिंगच्या माध्यमातून या सगळ्या वाहिन्या जगभरातील श्रोत्यांपर्यंत पोहोचू लागल्या. आकाशवाणी तंत्रदृष्ट्या अशी प्रगत होत राहिली या नव्वद वर्षात.

कार्यक्रमांच्या संदर्भातून मात्र आकाशवाणीचा गाभा बदलला नाही. स्वरूप कदाचित थोड्या फार प्रमाणात कालानुरूप बदलत राहिलं. मात्र सगळ्या वयोगटातल्या, समाजातल्या सगळ्या स्तरातल्या श्रोत्यांसाठी आकाशवाणीवर कार्यक्रम होत राहिले. लहान मुलांसाठी ‘गंमत जंमत’ तर ज्येष्ठांसाठी ‘अमृत कलश’ स्त्रियांसाठी ‘वनितामंडळ’ कामगारबंधूंसाठी ‘कामगार सभा’ तर शेतकरी बांधवांसाठी ‘माझे आवार माझे शिवार’, युवकांसाठी ‘युववाणी’ याबरोबर शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगम संगीताचे असंख्य वैविध्यपूर्ण कार्यक्रम तसंच शिक्षण, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, नाटक, चित्रपट या क्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी, दिग्गज मंडळी आकाशवाणीच्या या कार्यक्रमात आनंदाने सहभागी होत राहिली. श्रोत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध कलात्मक पर्यायांचा विचार आकाशवाणीने नेहमीच केला. कधी फोन इन तर कधी सभागृहात आयोजित केलेल्या संगीत आणि काव्य मैफिली, कधी श्रोत्यांच्या परिसरात जाऊन केलेले ध्वनिमुद्रण असे अनेक! आज आकाशवाणीच्या श्रोत्यांची संख्या लाखांच्या वर जाईल. अर्थात ही आकडेवारी इतकी महत्त्वाची नाही जितका मौल्यवान या श्रोत्यांचा आकाशवाणीवर असलेला लोभ, असलेला जिव्हाळा आहे. आणि हेच आकाशवाणीचे संचित आहे.

पण हे घडणं काही सोपं नव्हत. यात आकाशवाणीची मूळ नियमावली जी सर्व केंद्रांवरून अत्यंत काटेकोरपणे निर्मात्यांकडून पाळली जाते तिचं फार मोठ श्रेय आहे. या नियमावलीमध्ये कलाकारांना दिलं जाणार मानधन आहे, कोणत्या गोष्टींचा उच्चारही होता कामा नये या विषयीची शिस्त आहे, बाजारीकरण कार्यक्रमातील कलात्मकतेवर वरचढ होणार नाही याची निरंतर घेतली जाणारी काळजी आहे आणि या सगळ्याच्या पलीकडे तळागाळातल्या समाजाचे प्रश्न मांडण्याची तळमळ आहे. या एका अत्यंत आगळ्या वेगळ्या गोष्टीमुळे आकाशवाणी इतर माध्यमांच्या तुलनेत आगळी वेगळी ठरते. कलाकार, विविध क्षेत्रातले मान्यवर



यांना आकाशवाणीचं हे बलस्थान माहीत आहे. त्यामुळे इतर माध्यमांकडे भरघोस पैसे मिळतात म्हणून वळणारे या मंडळींचे पाय आकाशवाणीकडेही आनंदाने वळतात. या अनुषंगाने दोन कार्यक्रमांचा उल्लेख करायला मला नक्कीच आवडेल.

काही वर्षांपूर्वी 'गाथा स्त्रीशक्तीची' या शीर्षकांतर्गत आम्ही स्त्री कर्तृत्वाचा तळपता आलेख मांडणारी मालिका प्रसारित केली होती. ज्येष्ठ कलाकार विक्रम गोखले यांना या मालिकेच्या निवेदनासाठी पाचारण केलं होतं. डॉ. आयडा स्कडर, मदर तेरेसा, कल्पना चावला अशा काही स्त्रियांचं जीवन चरित्र या मालिकेतल्या प्रत्येक भागात मांडलं होतं. श्वासफेम सुप्रसिद्ध लेखिका माधवी घारपुरे यांनी या मालिकेचं लेखन केलं होतं. आकाशवाणीच्या मान्यताप्राप्त कलाकारांनी अगदी सुलभा देशपांडे ते संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांच्यापर्यंत अनेक जणांनी विविध भूमिका वठवल्या. या मालिकेच्या तेराही भागांचं निवेदन स्क्रिप्टचा अभ्यास करून अत्यंत गुणवत्तापूर्ण पद्धतीने केलं. निवेदन झाल्यानंतर विक्रम गोखले म्हणाले, ''उमा, असं काम असेल तर मला केव्हाही बोलाव मी फुकटही करेन'' असाच दुसरा एक अनुभव. 'स्वयंप्रकाशिता' नावाची एक मलिका आम्ही केली होती. इंधन, पाणी, आरोग्य अशा अनेक गोष्टींचा या देशातल्या स्त्रीशी कसा संबंध आहे याचं सामाजिक संदर्भातून विश्लेषण या मालिकेत केलं होतं. मालिकेच्या निवेदनासाठी आम्ही सोनाली कुलकर्णी या प्रतिभाशाली अभिनेत्रीला बोलावलं होते. सोनालीने सगळी स्क्रिप्टस आधी घरी मागवली. ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांनी या मालिकेचं लेखन केलं होतं. स्क्रिप्ट थोडीशी मोठी झाली होती त्यामुळे स्क्रिप्ट पाहिल्यावर सोनाली म्हणाली, 'इतकी मोठी स्क्रिप्ट मी कशी वाचणार?' तेव्हा मी तिला सांगितलं की, 'तू ध्वनिमुद्रणासाठी येशील तेव्हा १० ते १२ मिनिटांचा भाग वाचायला लागेल असं आपण बघू.' सोनाली ठरलेल्या दिवशी आकाशवाणीत ध्वनिमुद्रणासाठी आली. येताना अर्थातचं ती पूर्ण अभ्यास करून आली होती. ध्वनिमुद्रणाच्या वेळेला मात्र ती म्हणाली, ''यातलं माझं काही कमी करू नकोस. या स्क्रिप्ट्समधला शब्द न् शब्द मला वाचायचा आहे, तो एक स्त्री म्हणून आणि या देशाची सुजाण नागरिक म्हणून हे माझं कर्तव्यच आहे. नाट्य-चित्रपटाच्या झगमगत्या दुनियेत सतत वावरणाऱ्या या मंडळींच्या अंतःकरणातल्या एका कप्प्यात खोलवर दडलेली सामाजिक बांधिलकी आणि देशहिताची भावनाच या कार्यक्रमामुळे उजळली गेली असं म्हणायला हवं. आकाशवाणी अशा प्रकारे सामाजिक चळवळींना, प्रश्नांना एक सजग असं व्यासपीठ उपलब्ध करून देते. एल.जी.बी.टी.च्या संदर्भात अलीकडे आम्ही बरेच कार्यक्रम केले. तृतीयपंथीयांबद्दल सर्वसामान्यांच्या मनात असलेली भितीची आणि अनादराची भावना काही अंशी तरी कमी करण्यात या कार्यक्रमातून मदत झाली. या समूहाचे प्रतिनिधी तर 'आकाशवाणीने आमचा आवाज हजारो लोकांपर्यंत पोहोचवला' असं अगदी आनंदाने सांगतात.


सध्याच्या भयावह स्पर्धेच्या युगात सर्वसामान्यांपासून ते प्रतिभावंतापर्यंत सगळ्यांसाठी उपलब्ध असलेलं आकाशवाणी हे अत्यंत गुणवत्तापूर्ण दर्जेदार असं व्यासपीठ आहे. त्यामुळे हे माध्यम सगळ्यांना आपलंस वाटतं. इथे एकाच दिवशी एखाद्या स्टुडियोत गुलजार असतील, तर दुसऱ्या एखाद्या स्टुडियोत सिंधुताई सपकाळ असतील, तर आणखी एखाद्या स्टुडियोत डॉ. अनिल काकोडकर असतील. तर अशी ही आकाशवाणी सर्वसमावेशक.

इतर खाजगी वाहिन्यांशी तुलना करता एकमेव महत्त्वाचा फरक सांगता येईल आणि तो म्हणजे त्यांचा संभाव्य श्रोता किंवा ज्यांच्यापर्यंत पोहोचायचं आहे असा श्रोता म्हणजे या देशातला 'ग्राहक' आणि आकाशवाणीला ज्या श्रोत्यांपर्यंत पोहोचायचं आहे तो म्हणजे या देशाचा 'नागरिक' आणि भारताच्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणं हे अंतःकरणाच्या जिव्हाळ्यापासून असतं आणि म्हणूनच श्रोत्यांच्या कार्याक्रमाविषयीच्या अभिप्रायावर आधारित अशा एका 'डायल इन' कार्यक्रमात आमची एक श्रोता मैत्रीण म्हणाली होती, ''पोळ्या करायचा खूप कंटाळा येतो मला, पण तुमचे कार्यक्रम ऐकताना पोळ्या कधी होऊन जातात कळतही नाही.'' किती मनापासून दिलेला अभिप्राय! याच कार्यक्रमात शेवटचा फोन आम्ही घेतला. प्रत्यक्ष न दिसणाऱ्या त्या मैत्रिणीचे भरून आलेले डोळे मात्र आम्हाला दिसत होते ते भरून आलेल्या आवाजातून. वय, नाव, गाव माहीत नसलेली ती मैत्रीण फोनवर म्हणाली होती, ''तुमचा कार्यक्रम ऐकताना जगणं सुसह्य होतं....मला वाटतं हेच आकाशवाणीचं संचित आणि हीच आकाशवाणीची ताकदही. माझ्यासाठी नोकरी, पगार याच्या पलीकडे, तर कलाकारांसाठी त्यांच्या बलयापलीकडे आणि आमच्या श्रोत्याला त्याच्या रोजच्या दिनक्रमापलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने माणूस म्हणून घडवणारी ही संस्था आणि म्हणूनच कदाचित नव्वदीतही चैतन्यमय, टवटवीत, चिरतरुण अशी आमची आकाशवाणी!

**– उमा दीक्षित**
कार्यक्रम अधिकारी, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८६७६७००३३
uma.dixit11@gmail.com

# सामाजिक स्वातंत्र्याच्या संदर्भात 'गोलपिठा'चे आकलन

डॉ. राजेंद्र करनकाळ





**भा**रतीय संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व अधिकार या पंचशील मूल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सामाजिक जीवनात जोपर्यंत लोकशाही निर्माण होत नाही तोपर्यंत राजकीय लोकशाहीला अर्थ नाही, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजवादी लोकशाहीचा पुरस्कार केला. या लोकशाहीत स्वातंत्र्य हे माणसाच्या जगण्याचे मूलभूत मूल्य आहे. स्वातंत्र्य म्हणजे निर्भयपणे जगणे होय. स्वातंत्र्याच्या अटीतच समता, बंधुता, न्याय, अधिकार व मानवता या मूल्यांना अर्थ आहे. भारतीय समाजाला जातीय विषमतेचे प्रचंड अधिष्ठान असल्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठता, भूक, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार, शोषण व पुरुषप्रधानता इ. समस्या व विसंवाद दिसून येतात. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले, परंतु दलित, आदिवासी, भटके, देवदासी स्त्रिया इ. उपेक्षित घटकांना सामाजिक स्वातंत्र्य मिळाले असे ठामपणे म्हणता येत नाही. पिढ्यानपिढ्या वर्णव्यवस्थेत भरडले जाणारे उपेक्षित घटक अजूनही गुलामीचे जीवन जगत आहेत. दलित, आदिवासी स्त्रीची धिंड काढणे, दलितांवर सामूहिक बहिष्कार टाकणे अजूनही सर्रास सुरूच आहे. स्वातंत्र्योत्तर आधुनिक भारताचे हे भीषण वास्तव आहे. दलित शोषित समाजाच्या वास्तवाचे चित्रण मराठी साहित्यात कधी सहानुभूतीने, विसंगतीने तर कधी विकृत पद्धतीने तर कधी रंजकतेने आले आहे कारण दलित व उपेक्षित घटकांचे चित्रण त्यांच्या जाणिवेतून न येता उच्चवर्णियांच्या मानसिकतेतून रेखाटले गेले त्यामुळे ते वास्तवापासून दूर व अवास्तव असल्यामुळे उपेक्षितांना ते आपले वाटले नाही. मराठी साहित्याची ही कोंडी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या दलित साहित्याने फोडली आणि पांढरपेशा मध्यमवर्गीय जाणिवेच्या संकुचित आवर्तनात अडकलेल्या मराठी साहित्याच्या जाणिवा विस्तारित केल्या. दलित साहित्याने मराठी साहित्याला वास्तवाभिमुख व जीवनाभमुख केले. साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध जसा आहे तसा स्वातंत्र्य आणि साहित्य यांचा अनुबंधही आहे. कारण साहित्य ही एक भाषिक कलाकृती आहे. भाषा ही समाजाची अथवा समूहाची निर्मिती असते, त्यामुळे सामाजिक स्वातंत्र्य या मूलभूत घटकाचा साहित्याशी असणारा अनुबंध अटळ ठरतो. लेखकाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य मान्य करूनही, निर्मितीच्या क्षणी लेखकाला विचारवंत व कलावंत या नात्याने आपण समाजाचा एक जबाबदार घटक आहोत याचे सतत भान ठेवावे लागते. तसेच सामाजिक आशयद्रव्य निवडीमागे नैतिकताही राखावी लागते. या दृष्टीने 'गोलपिठा' हा काव्यसंग्रह सामाजिक स्वातंत्र्याचा उद्घोष करणारा काव्यसंग्रह आहे.

नामदेव ढसाळ यांचा 'गोलपिठा' हा दलित साहित्याचा प्रातिनिधिक परंतु एकूणच भारतीय साहित्याला प्रचंड हादरा देणारा काव्यसंग्रह आहे. मराठी साहित्याच्या प्रदीर्घ वाटचालीत सामाजिक स्वातंत्र्यापेक्षा अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते. गोलपिठा मात्र याला अपवाद आहे. वर्णवाद, वर्गवाद, वंशवाद, पुरुषप्रधानता, सरंजामशाही इ. विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेत भरडल्या जाणाऱ्या दलित, शोषित स्त्रिया, कष्टकरी, आदिवासी, देवदासी, वेश्या, भिकारी यांसारख्या अनेक उपेक्षित घटकांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा उद्घोष नामदेव ढसाळ यांनी 'गोलपिठा'तून केला आहे. ढसाळ यांनी माणसाच्या जगण्याचे मूलभूत प्रश्न उभे करून, उच्चवर्गीय पांढरपेशा संस्कृतीच्या अभिव्यक्ती व अभिरुचीला प्रचंड हादरा दिला. साहित्यनिर्मितीची भाषा व आशयाचे संकेत 'गोलपिठा'ने बाद ठरवले. एवढेच नव्हे तर आस्वाद व मूल्यमापनाच्या दृष्टीने समीक्षेपुढेही नवे आव्हान निर्माण केले.

मुंबईसारख्या वैभवशाली उच्चभ्रू संस्कृतीला लागूनच गोलपिठात किड्यामुंग्यांसारखे जीवन जगणारा असंस्कृत, आदिम पातळीवर जगणारा रोगग्रस्त समाज आहे. स्वातंत्र्याला तो पूर्णपणे पारखा झालेला आहे. दुःख, दैन्य, भूक, लाचारी, जातीयता, अन्याय, अत्याचार, शोषण या दलदलीत तो अडकलेला आहे. उच्चभ्रू पांढरपेशा संस्कृतीला चक्रावून टाकणारे गोलपिठातील हे जीवन आहे. बेकार, तरुण रोगी, खिसेकापू, मवाली, दादा, भिकारी, भुकेकंगाल, शरीरविक्रीसाठी वाट पाहणाऱ्या वेश्या, त्यांच्या कमाईवर बांडगुळासारखे जगणारे दलाल, हिजडे इत्यादी






माणसांचे हे जग आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी रोज मरणयातना भोगणाऱ्या माणसाचे दाहक वास्तव ढसाळ यांनी 'गोलपिठा'तून अधोरेखित केले आहे. त्यांच्याच रोजच्या दैनंदिन जीवनातील जगण्याच्या भाषेतच नामदेव ढसाळ यांनी हे आदिम व असंस्कृत पातळीवरील वास्तव जीवनाचे दर्शन घडविले आहे. उच्चभ्रू संस्कृतीच्या भाषेची जाणीवपूर्वक मोडतोड करून, नामदेव ढसाळ यांनी न कचरता, बेधडकपणे गोलपिठातील समाजाच्या भाषेत वापरले जाणारे लैंगिकतेचे संदर्भ त्यात घुसडून, उच्चसंस्कृतीला खिजवले आहे. उच्च संस्कृतीला अश्लील वाटणारे शब्द, प्रतिमा हे गोलपिठातील रोजच्याच दैनंदिन जगण्याचे वास्तव आहे. मात्र ढसाळ यांनी ते भडक व विकृत होऊ दिले नाही किंवा रंजक होऊ दिले नाही. 'गोलपिठा' हा काव्यसंग्रह केवळ दलित समाजाचेच दुःख मांडत नाही तर दलित साहित्याचे वर्तुळ भेदून समस्त शोषित व उपेक्षितांची कैफियत मांडतो. ढसाळ हे स्वतः गोलपिठाच्या जगण्यातले अविभाज्य घटक राहिलेले आहेत. त्यामुळे इथे मरणकळा भोगणाऱ्या माणसांचे तपशील त्यांच्याच भाषेत आले आहेत.

ढसाळ यांची कविता विषमतेवर आधारलेल्या समग्र व्यवस्थेला उद्ध्वस्त करू पाहते. त्याच बरोबर नवसमाज निर्मितीसाठी परिवर्तनसन्मुख आशयातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवता या उदात्त वैश्विक जीवनमूल्यांचाही ती स्वीकार करते. त्यामुळे गोलपिठात समूहनिष्ठतेकडून वैश्विक जाणिवेकडे वाटचाल करणारी कविता आहे. गोलपिठातले अनुभवविश्व, प्रतिमा आणि व्याप्ती सर्वच अनोखे आणि थक्क करणारे आहे. स्वातंत्र्य, उद्गम विकास व संस्कृतीतला पोकळपणा पाहून उच्च व्यवस्थेला कवी जाब विचारतो. मूठभर लोकांपर्यंत स्वातंत्र्य मर्यादित राहिले, त्यांच्या संस्कृतीचा विकास झाला परंतु बहुसंख्य समाज जातीय विषमतेमुळे अज्ञान अंधःकारात खितपत पडलेला आहे. जातीयता, भूक, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार यात तो अडकून पारतंत्र्याचे जीवन जगत आहे.

'निमित्त पंधरा ऑगस्ट ७१' या कवितेत ढसाळ म्हणतात-

**पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ**
**स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे.**
**रामराज्याच्या कितव्या घरात आपण न्हातोत**
**उद्गम, विकास, उंची, संस्कार, संस्कृती**
**कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा**

(गोलपिठा पृ. ६९)

पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले ही केवळ वल्गनाच ठरली. तळागाळातल्या माणसांच्या वाट्याला स्वातंत्र्य आलेच नाही. फक्त मत देण्याचे राजकीय स्वातंत्र्य मिळाले परंतु सामाजिक स्वातंत्र्य मिळालेच नाही. जातीय व्यवस्थेने कात टाकून नवे रूप धारण केले. पूर्वी गावकुसाबाहेर अस्पृश्यतेचे चटके सहन करणाऱ्या समाजाने मुंबईसारख्या शहरात येऊन झोपड्यांत बस्तान बसवले. भटके अजूनही कड्याकपारीत व जंगलात पोटासाठी वणवण भटकतात. झोपडपट्टीत राहणारे दलित, शोषित गटारीच्या सांडपाण्याच्या बाजूला किड्यामुंग्यांसारखे ओंगळ जीवन जगतात. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत सामाजिक स्वातंत्र्याची पूर्तताही एक शतक उलटून चालले तरी स्वातंत्र्योत्तर काळात झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ढसाळ, स्वातंत्र्य, उद्गम व विकास म्हणणाऱ्या उच्चभ्रू वर्गाची उपहासाने खिल्ली उडवतात. गोलपिठातल्या अनेक कवितांतून अत्याचारग्रस्त शोषित व उपेक्षित घटकांची पिडा जाणवते. त्याच बरोबर स्वातंत्र्यापासून वंचित राहिलेल्या समाजाच्या न्याय्य-हक्कांसाठी ही कविता लढाऊ प्रवृत्तीची होते. स्त्रियांचे शारीरिक शोषण हे एकूणच

समाजाच्या दृष्टीने पराकोटीचे दुःख आहे. दलित व पददलित स्त्रीला उच्चवर्णीयांकडून होणारा अन्याय व अत्याचार सहन करावा लागतो तर शहरात वेश्यांना आपले शरीर धनदांडग्यांच्या स्वाधीन करावे लागते. गिऱ्हाईकांची वाट पाहणाऱ्या या दलदलीत अनेक निष्पाप पोरी ढकलल्या जातात. त्यांच्या मुक्ततेसाठी दलाल आणि उच्चव्यवस्थेशी असलेले आपले जुने वैर विसरायला कवी तयार होतो.

**तुमच्या आणि माझ्या जून दुष्मनीवर**
**मी माती पसरू शकतो**
**पण या कोऱ्या करकरीत डोबड्यांना**
**भ्रष्ट गायरानात ढकलणं थांबवा**
**समजा त्या चकल्या आणि रुळल्या तर**
**तो तुमच्या माझ्या दुःखाचा सर्वात मोठा दिवस असेल.**

(गोलपिठा पृ. २)

निष्पाप स्त्रियांना या भ्रष्ट दलदलीत ढकलणे आणि त्यांनी या दलदलीत रुळणे याच्या एवढे दुःख कोणतेही असू शकत नाही हे सलणारं दुःख ढसाळ पोटतिडकीने मांडतात.

**इथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच असतो**
**इथे माणसालाच माणूस खात असतो**
**आणि वाल्याच्या पाठीवरील वळ लपवले जातात रे.**

(गोलपिठा पृ. १९)

माणसानेच माणसाला गुलाम बनवले, त्यांचे शोषण केले. दैववादाआड माणूसच माणसाला छळत राहिला. जातीयतेच्या अनेक तटबंदी त्याने उभ्या केल्या. 'रामायणा'सारखे महाकाव्य लिहिणाऱ्या वाल्मिकीचे उदात्तीकरण करून गौरव केला जातो परंतु जातीय विषमतेचे दुःख घेऊन, जगणाऱ्या वाल्याची वेदना सोयीस्करपणे दुर्लक्षित केली जाते. उच्चभ्रू संस्कृतीचा दांभिकपणाचा बुरखा ढसाळ यांनी टराटरा फाडला आहे.

'गोलपिठा'तल्या अनेक कवितांतून स्वातंत्र्य आणि माणुसकीपासून वंचित राहिलेल्या समाजाची वेदना ढसाळ यांनी तीव्रतेने मांडलेली आहे. त्यांतील काही कविता...

**वेश्या वाढतात... प्रश्नचिन्ह? झोपड्या वाढतात,**
**भूकबळी-बेकारी वाढतात प्रश्नचिन्ह?**

(गोलपिठा पृ. ८)

अनेक प्रश्नचिन्हे उपेक्षित-शोषित घटकांच्या संदर्भात उभी करून ढसाळ व्यवस्थेलाच जबाबदार धरतात.

किंवा

**उषाकिरणाच्या पायथ्याशी**
**महारोग्यासारख्या सांडलेल्या झोपड्या**

(गोलपिठा पृ. ९)

किंवा

**रांडकी पुनव साजरी करतात हिजड्यांचे**
**अप्रूप उत्साह**
**सकाळ संध्याकाळ उकिरड्यावरल्या**
**अन्नावर होणारी अर्धनग्न जोगवण**

(गोलपिठा पृ. १६)

'वेश्याच्या धंदेवाईक प्रेरणेतून' या कवितेत

**डावे उजवे करत बसलेल्या नेपाळी पोरी जश्या**
**तुफानात मोडतोड झालेल्या बनस्पती वाजताहेत गोलघुमट**

(गोलपिठा पृ. १८)

यांसारख्या कितीतरी कवितांतून नामदेव ढसाळ यांनी दलित, वेश्या, हिजडे, कष्टकरी, बेकार, भूकबळी ठरणारे, भुकेकंगाल, भिकारी या उपेक्षित समाजाचे स्वतंत्र भारतातील हे समाजवास्तव भळभळणाऱ्या जखमांसारखे उघड केले आहे. या समाजाची वेदना कातडी सोलून सर्वांगाला होणाऱ्या दाहासारखी आहे. सुखवस्तू पांढरपेशा समाजाच्या मेंदूला झिणझिण्या आणणारे हे दुःख आहे.

नामदेव ढसाळ यांची कविता उपेक्षित समूहाचे दुःख मांडत असतानाच विषमतेच्या गर्तेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी व्यवस्थेशी विद्रोह करते. हा विद्रोह करताना ती अत्यंत स्फोटक व ज्वालाग्रही बनते. शोषितांच्या न्याय्य हक्कांसाठी व स्वातंत्र्यासाठी आणि समग्र परिवर्तनासाठी विषमतावादी व्यवस्थेलाच ती उद्ध्वस्त करून नवसमाज निर्मितीचे स्वागत करते.

**माणसाने पहिल्या प्रथम स्वतःला**
**पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे**
**साहित्यसंघ, शाळा, कॉलेज, हॉस्पिटलं, विमान अड्डे**
**राजधान्या, इमले, झोपड्या, वखवखलेल्या भुकाळ वस्त्या**
**यावर हॅड्रोजन बॉम्ब टाकावेत**

(गोलपिठा पृ. ३०)

ढसाळ केवळ या विध्वंसावरच थांबत नाहीत. त्याही पुढे जाऊन माणुसकीच्या उदात्त जीवनमूल्यांचा ते स्वीकार करतात.

**नंतर उरल्या सुरल्यांनी गुलाम करू नये. लुटू नये**
**एक तीळ सर्वांनी करंडून खावा**
**माणसांवरच सुक्त रचावे**
**माणसाचेच गाणे गावे माणसाने**

(गोलपिठा पृ. ३०)

माणसाच्या माणूसपणावर अशी कवीची श्रद्धा आहे. म्हणून नकाराबरोबरच बंधुता व माणुसकीची ओढ ढसाळांना वाटते. म्हणूनच वेदना, नकार आणि विद्रोह या बरोबरच माणुसकीचे दर्शन 'गोलपिठा'तून घडते.

**- डॉ. राजेंद्र करनकाळ**
भ्रमणध्वनी : ९८६०८०४५८२

# ॥ग्रंथाली॥※॥

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी,
माहिम (प.), मुंबई ४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० ● [illegible]



## फुलाला सुगंध मातीचा - डॉ. अनुराधा हरकरे, डॉ. अंजली कुलकर्णी

ह्या पुस्तकात लेखिकांनी, समाजातील काही निवडक, सुजाण, सुशिक्षित, सुसंस्कृत, सज्ज आणि सर्वार्थाने प्रज्ञावंत, यशवंत, कीर्तिवंत व्यक्ती व त्यांच्या पालकांशी संवाद साधला आहे व त्यांची माहिती शब्दात गुंफून त्याचा भरजरी शेला विणला आहे. ह्या सर्व व्यक्तींच्या संगोपनात योगदान देणाऱ्या आप्तस्वकीयांशी प्रत्यक्ष चर्चा करून माहिती मिळवली असल्याने त्यात ओघवता रसरशीतपणा जाणवतो. – स्नेहलता देशमुख

मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.



## कुसवा - उषा परब

कुसवा कुस! बाईच्या बाईपणास आईपणाची कृतार्थता देणारी प्राकृतिक देणगी, पण ती अनुभव साक्षात होण्यापूर्वी आणि नंतरही तिच्या दैहिक भोगांची अनेक विरूपे ही कादंबरी धक्कादायकपणे मांडते. सामान्यपणे लेखनात, वर्ज्य त्याज्य समजले जाणारे विषय इथे सरळ स्वाभाविकपणे येतात. एका कुटुंबकथेपासून सुरू झालेली ही कादंबरी कोकणच्या बदलत्या उद्ध्वस्तीकरणाच्या वास्तवाचे चित्रण या कथेला व्यापक परिणाम देते आहे. भारतातील ग्रामजीवनाची आणि मानवी मनाची द्विखंडावस्था इथे प्रभावीपणे आली आहे असे वाटते. – डॉ. तारा भवाळकर

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



## महाभारतातील काही प्रसंग : विवेचन व रसग्रहण खंड २ - अरुण/वासंती जातेगांवकर

प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य उद्देश, द्यूत आणि दुर्योधनवध ह्या प्रसंगावरचे लेखकांचे लेख वाचकांसमोर ठेवणे हा आहे. लेखाचे मुख्य उद्दिष्ट आहे, द्यूतासंबंधी सामान्यतः न विचारल्या जाणाऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाला संलग्न असलेली संहितेतली सर्व माहिती वाचकांसमोर अशा प्रकारे ठेवायची की इच्छा असल्यास त्या प्रश्नाचे संहितेशी सुसंगत असे उत्तर त्याला स्वतःला तयार करता येईल. दुर्योधन वध व त्याला संलग्न असलेले प्रसंग महाभारतात ज्या स्वरूपात मांडले आहेत त्या स्वरूपात ते वाचकांसमोर मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



## विमुक्ता (तेलगू लेखिका वोल्गा) - अनुवाद : चंदना करंबेळकर

भारतीय संस्कृतीवर रामायण, महाभारताचा महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. यातील पात्रांना आपण देवत्व बहाल करून त्यांना पूजनीय ठरवलं आहे. पण त्यांना अनुकरणीय करता येईल का? तसं करायचं असेल तर त्यांचा माणूस म्हणून विचार करावा लागेल. त्यांच्या मर्यादा आणि क्षमता यांचा अतिशय समजूतदारपणे आणि शहाणपणाने जाणीवपूर्वक विचार करावा लागेल. हा विचार वोल्गाजींनी या सर्व पात्रांबाबत केलेला जाणवतो. हा वेगळेपणा, हा नवा उच्चार अधोरेखित करणारा आणि आश्वासक आहे.

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.




## ग्रेट दिव्यांग - उषा धर्माधिकारी

या पुस्तकात तीन विभागाचे असून पहिल्यात शारीरिक अपंगत्वाला हरवून यश मिळविणाऱ्या दिव्यांगांचे व्यक्तिचित्रण तर दुसऱ्यात अंधत्वावर मात करून स्वतःच्या मेहनतीने-कर्तृत्वाने अपंगांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने स्वयंप्रकाशित होऊन इतरांसाठी पथदर्शक ठरलेल्या व्यक्तींचे वर्णन आहे. तिसऱ्यात विशेष दिव्यांगांच्या मल्टिपल डिसेबिलिटीमुळे अपंगत्व आलेल्या व्यक्तींनी आपल्या जीवनात मिळालेल्या यशाचे वर्णन आहे.

मूल्य १२० रु. सवलतीत ८० रु.



## बदक-नामा - मिलिंद पदकी

'बदक-नामा'मधली कविता ही अशा अस्वस्थ वर्तमानाची कविता आहे. कवीच्या अमेरिकेतील वास्तव्यामुळे या वर्तमानाची मराठी कवितेला अपरिचित अशी समाजजीवनाची अनेक रूपं कवितेत साकारली आहेत. वाचनीय आणि मननीय असा हा संग्रह आहे.

– भारती बिर्जे-डिग्गीकर

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

# ब्रिटिश हिलरी हरली

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार



थरिसा मे

ब्रिटिश पंतप्रधान थरिसा मे (May) व अमेरिकन अध्यक्षपदाच्या दावेदारीण - हिलरी क्लिंटन, या दोघींत अपयशाशिवाय बरंच साम्य आहे. या सादृश्यामुळेच त्यांच्या वाट्याला यश आलं नाही असं म्हणावं लागेल. दोघीही काष्ठवत चेहरा करून कृत्रिम बोलण्यात व लिहून दिलेलं वाचण्यात पटाईत. त्यांच्या संपर्कात साहजिकता सापडत नाही. हृदयाच्या तळातून बोललं तर चूक होण्याची भीती. त्यावर प्रसारमाध्यमं तुटून पडण्याची शक्यता. ही कटू प्रतिक्रिया वाट्याला येऊ नये म्हणून दोघीही साचेबंद हसतात, कृत्रिम बोलतात, प्रसार-माध्यमांना बोलण्याचं टाळतात व चाकोरीबाहेर न पडण्याची दक्षता घेतात. त्यामुळे त्यांच्या कुठल्याच भाषणानं जनतेच्या मनाचा ठाव घेतला नाही. त्यातली पृष्ठस्तरियता त्या जनतेपासून लपवून ठेवू शकल्या नाहीत. निवडणुकीत याची भारी किंमत दोघींना भरावी लागली. 'पराभव' हा शब्द त्यांच्या कपाळावर कायमचा डागला गेला.

थरिसा मे एका वर्षापूर्वीच सत्तेवर आल्या. त्यापूर्वी त्यांनी सहा वर्षे गृहमंत्री म्हणून काम केलं होतं. पंतप्रधान डेव्हिड कॅमरॉननी युरोपी राष्ट्रसंघात राहावं की नाही हा ठराव २०१६ च्या जूनमध्ये जनतेसमोर मांडला. ते व थरिसा मे या दोघांनीही राष्ट्रसंघाचा घटक म्हणून राहावं असा प्रचार केला. पण जनतेचा कौल वेगळा होता. तिनं पंतप्रधान व गृहमंत्र्यांना डावलून घटस्फोट घेण्यासाठी मत प्रदर्शन केलं. नाक कापलं गेल्यामुळे पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला व त्यांच्या जागी थरिसा मे यांची नेमणूक झाली. त्यांच्या टोरी पक्षाला लोकसभा प्रतिनिधी गृहात ३३४ जागा होत्या. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये एकूण ६५० प्रतिनिधी. त्यामुळे टोरींचं मताधिक्य प्रबळ नसलं तरी अधियेकं पारित करण्यासाठी पुरेसं होतं. पण हे लोण कॅमरॉनचं. संसदेवर आपली मुद्रा उमटावी व जमलं तर भूतपूर्व प्रधानमंत्री मार्गारेट थॅचरच्या पंक्तीला जाऊन बसावं म्हणून थरिसा मे यांनी एप्रिल २०१७ मध्ये कारण नसताना मुदतपूर्व निवडणुका जाहीर केल्या. नाहीतर टोरींची सत्ता २०२० पर्यंत कायम राहिली असती. एप्रिलमध्ये टोरी पक्ष जोरकस होता. सर्व सर्वेक्षणात त्याची लोकप्रियता मुख्य प्रतिस्पर्धी- मजूर पक्ष व त्याचे मुख्य जेरमी कोरबिनच्या द्वअंकांनी पुढे होती.

हिलरीची लोकप्रियता अशीच शिखरस्थ असे. तिच्या डेमॉक्रॅट पक्षाला व उदारमतवादी प्रसारमाध्यमांना मतदान ही एक अनावश्यक प्रक्रिया वाटली. त्याऐवजी सरळ हिलरीचा अध्यक्षपदी राज्याभिषेक केलेला बरा, असे जनमानस अमेरिकेत माध्यमांनी निर्माण केले होते. थरिसा मेच्या बाबतीत तसंच झालं. दोघींनीही जनतेचा पाठिंबा गृहीत धरला होता. त्यामुळे विनम्रता लोप पावून तिची जागा घमेंडीनं घेतली होती. मतदान हा एक असोईस्कर अडसर अशी त्यांची धारणा झाली होती. राष्ट्रीय निवडणुकीत मुख्य पक्षांच्या दावेदारांमध्ये चर्चासत्र आखण्याची प्रथा आहे. त्यामुळे मतदारांना त्यांच्या धोरणाचा, वैचारिक बैठकीचा व कामाचा परिचय होण्यास मदत होते. हे सत्र दूरदर्शनवर प्रसारित करण्यात येत असल्यामुळे त्याला प्रचंड प्रसिद्धी मिळते. पण थरिसा मेनी त्यात भाग घेण्याचं टाळलं. कोरबिनबरोबर व्यासपीठावर बसल्यानं आपली तथाकथित प्रतिष्ठा कमी होईल एवढी त्यांना घमेंड होती. हे त्यांना ब्राह्मणानं क्षुद्रांच्या पंक्तीला बसण्यासारखं वाटलं. सर्व सर्वेक्षणात पुढे असताना आपली पत कमी कशाला करून घ्या? त्यावेळी चर्चेसाठी एक कनिष्ठ अधिकारी पाठवून त्यांनी कोरबिनला आपलं ठिकाण दाखवलं. असं करताना आपण जनतेचा रोष ओढवत आहोत याची त्यांना कल्पना नव्हती.

पण जसजशी निवडणुकीची तारीख जवळ आली तसतसे थरिसा मेच्या लोकप्रियतेच्या आलेखानं उसासे टाकण्यास सुरुवात केली. शेवटी शेवटी दोन पक्षातलं द्वैत कमी झालं आणि ८ जून २०१७ रोजी झालेल्या मतदानात सात महिन्यांपूर्वी हिलरीला बसला तसा तडाखा थरिसा मे यांना बसला. त्यांच्या पक्षाला फक्त ३१८ जागा मिळाल्या म्हणजे १६ जागा गेल्यामुळे पंतप्रधानांचा पक्ष अल्पसंख्यांक झाला. नवलाची गोष्ट म्हणजे कोरबिनच्या विक्षिप्त धोरणामुळे मृत्युशय्येवर पडलेल्या मजूर पक्षाला संजीवनी मिळाली. त्या पक्षाला ३२ अतिरिक्त जागा मिळून त्यांचं बळ २६२ जागांवर गेलं. संसदेत सर्वाधिक जागा पटकावूनही टोरी अल्पसंख्यांक झाल्यामुळे त्रिशंकू सरकार निर्माण झालं. उत्तर आर्यलंडच्या एका चिमुकल्या पक्षाशी हातमिळवणी करून थरिसा मेंवर युती सरकार स्थापन करण्याची लांच्छनास्पद व अवमानकारक पाळी आली. या खटाटोपात २०२० पर्यंत मुदत असलेल्या बहुसंख्याक टोरींचं अल्पसंख्यांक पक्षात रूपांतर करण्याची जादू थरिसा मे यांनी केली. या घोडचुकीची यथार्थ दखल इतिहास घेईलच. कुठलंही युती सरकार म्हणजे हडकुळी प्रगती हा धडा भारतानं केव्हाच जगाला शिकवला. संसदीय लोकशाहीचा हा धोका आता एकेकाळच्या साम्राज्यवादी ब्रिटनला पत्करावा लागत आहे. याची शिक्षा लवकरच थरिसा मे यांना भोगावी लागेल. लवकरच टोरी पक्षश्रेष्ठी बैठक घेऊन त्यांना पदच्युत करेल व नवीन नेता निवडेल असं ब्रिटिश राजपंडित म्हणतात.

निवडणुकीचा निकाल लागताच थरिसा मे यांच्याभोवती गिधाडं फिरू लागली. त्यांनी मे २०१६ मध्ये अर्थमंत्री जॉर्ज ऑसबॉर्न यांना डच्चू दिला. ते आता म्हणतात की थरिसा मे या उभ्या असलेल्या एक मृत महिला आहेत. लगेच केलेल्या सर्वेक्षणात ४९ टक्के लोकांनी त्यांनी राजीनामा द्यावा असं मत व्यक्त केलं तर फक्त ३८ टक्क्यांना त्या पदावर राहाव्यात असं वाटलं. कोरबिन तर म्हणतात की एका वर्षाच्या आत दुसऱ्या निवडणुका होऊन त्यासाठी आपण सज्ज आहोत. टोरी पक्ष सध्या वितळल्यामुळे तो नवीन नेत्यांच्या शोधात आहे. त्याचे अग्रणी दावेदार लंडनचे माजी महापौर व विद्यमान परराष्ट्र मंत्री बोरिस जॉनसन. या निवडणुकीत एकूण आठ मंत्री पडले. त्यांना थरिसा मे यांच्याविषयी मुळीच आदर वाटत नाही. नवीन पंतप्रधान नेमा म्हणून त्यांनी हट्ट धरला. बहुसंख्यांकाचं सरकार अल्पसंख्यांक केल्याबद्दल त्यांना क्षमा करण्यास कमी लोक उरले आहेत. त्यामुळे त्यांची पत एवढी घसरली की त्यांचे दिवस मोजके आहेत असं सर्वांना वाटतं. आता त्यांना स्वतःहून निकाल न घेता पक्षश्रेष्ठींच्या इशाऱ्यावर नाचावं लागणार आहे. इतिहासात सिंहाची गर्जना करणारा ब्रिटन आता मांजराचे म्याव करीत आहे.

या अधोगतीचं कारण थरिसा मे मध्येच सापडतं. हिलरीनं आपल्या पराभवाचं खापर स्वतःला वगळून इतरांवर फोडलं. पण जबाबदारी न स्वीकारण्याची त्यांची ही वृत्ती कुणालाच आवडली नाही. थरिसा मे यांची वागणूक यापेक्षा फारशी वेगळी नाही. पराभवाची चिन्हं दिसताच मरणोत्तर विच्छेदन सुरू झालं.


जेरमी कोरबिन

थरिसाचे दोन विश्वासू साहाय्यक निघून गेले. पंतप्रधानांनीही तसंच करावं अशी स्पष्टोक्ती मजूर पक्षाचे नेते जेरमी कोरबिननं केली. त्याला काही टोरी सभासदांनी पाठिंबा दिला. पण सत्तेचा हव्यास प्रत्येकालाच असतो. पंतप्रधानांनी या मागणीकडे तूर्त तरी दुर्लक्ष केलं व सरकार बांधणीसाठी उत्तर आर्यलंडमधील उजव्या पक्षाकडे मदतीसाठी हात पुढे केला. त्या पक्षानं १० जागा पटकावल्या होत्या. याप्रमाणे थरिसा मे यांना ३१८ व आयरिश पक्षाच्या १० मिळून ३२८ चं मतबळ मिळालं. ६५० च्या प्रतिनिधी गृहात बहुमतासाठी ३२६ मतं लागतात. त्यामुळे या युतीचं बहुमत सुईच्या टोकावर मोजण्याएवढं आहे असंच म्हणावं लागेल. या अत्यल्प बहुमताचा एक धोका म्हणजे काही टोरी सभासद फितुर झाले तर थरिसांचं सरकार भुईसपाट होण्यास वेळ लागणार नाही. एप्रिलमध्ये एकट्या टोरींचं संख्याबळ ३३४ होतं. सत्ता गाजवण्यासाठी ते प्रचुर नसलं तरी पुरेसं असे. याप्रमाणे थरिसा मे यांनी उभ्या पक्षाला गोत्यात आणलं आहे. निवडणुकीत अनेक टोरी सभासद पडले. त्या हानीविषयी थरिसा मे यांनी दिलगिरी व्यक्त केली. पण स्वतः जबाबदारी पत्करली नाही.

हे युती सरकार स्थापन करण्यासाठी आयरिश पक्षाचं सहकार्य विकत घेणं सोपं किंवा स्वस्त नसणार. त्यासाठी आपल्या अटल बिहारी वाजपेयी यांचं उदाहरण लक्षात घेणं आवश्यक आहे. त्यांना युती सरकार टिकवण्यासाठी तीन नवरा नसलेल्या राजकारण्याचं सहकार्य हवं होतं. ते तात्त्विक दृष्ट्या एवढं महाग पडलं की सरकार कोलमडून पडलं व देशाला ८००-९०० कोटी रुपयांचा

नवीन निवडणुकीचा भुर्दंड बसला. त्यातल्या आज दोनच हयात आहेत. पण मोदींचं संख्याबळ एवढं दांडगं की त्यांना त्या कोऱ्या कपाळाच्या राजकारण्यांची मुळीच जरुरी राहिली नाही. पूर्वी थरिसा मे यांची स्थिती मोदींसारखी स्थिर होती. आता ती वाजपेयींसारखी अस्थिर झाली आहे. तो आयरिश पक्ष सहकार्याबद्दल थरिसांचा लचका तोडणार यात शंका नाही. उत्तर आर्यलंड व आर्यलंडमध्ये बराच व्यापार चालतो. आतापर्यंत ते दोन्ही देश युरोपी राष्ट्रसंघाचे घटक होते. पण उत्तर आर्यलंड लंडनशासित. ब्रेक्सीटमुळे या व्यापारावर गदा पडणार. ते उत्तर आर्यलंडला हितावह नसणार. म्हणून हा व्यापार युरोपी राष्ट्रसंघातून बाहेर पडल्यावरही अबाधित राहावा अशी अट तो आयरिश पक्ष नक्कीच लादणार व थरिसांच्या वाटाघाटी अजूनच कठीण होणार यात शंका नाही. आपल्या हातात पंतप्रधानांच्या अस्तित्वाची दोरी असताना आयरिश पक्षाला नमतं घेण्याचं कारण नाही.

कुठलाही देश वर येतो तो व्यापारामुळे. आपल्यासारख्या फायली पुढे ढकलल्यामुळे नव्हे. या बाबतीत चीन अमेरिकेच्या पुढे आहे. ग्रेट ब्रिटनचं उभं साम्राज्य वसाहतीमधील व्यापारावरच जगलं. ते गेल्यावर ब्रिटननं युरोपी राष्ट्रसंघाशी सख्य जोडलं. त्याला युरोपची भव्य बाजारपेठ मोकळी झाली. ती अमेरिकेपेक्षा अंमल मोठी आहे. आज ब्रिटनची ५० टक्के निर्यात युरोपी राष्ट्रसंघातील २७ देशांना होते. त्यामुळे तिचे कारखाने उघडे राहून दशलक्षावधी मजूरांना नोकऱ्या मिळतात. पण ब्रेक्सीटच्या बाजूनं एका वर्षापूर्वी मतं पडल्यामुळे आता ब्रिटनला या राष्ट्रसंघातून बाहेर पडणं आवश्यक आहे. ते देशाला अव्यवहार्य किंवा कमीत कमी अव्यवहारी ठरावं म्हणून जून २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात म्हणजे निवडणुकीनंतर अवघ्या १० दिवसांत ब्रिटन राष्ट्रसंघाशी वाटाघाटी करण्यास सज्ज झाला होता. ही तारीख ठरली तेव्हा थरिसा मे यांना संसदेत बऱ्यापैकी पाठबळ होतं. पण त्यांचा पक्ष आता अल्पसंख्यांक झाल्यामुळे व जिवंत राहण्यासाठी त्यांना दुसऱ्या पक्षाची कुबडी लागत असल्यामुळे ब्रिटनचं बळ कमी झालं. तो देश या वाटाघाटीत अनुकूल अटी मागू शकत नाही. या प्रमाणे थरिसांच्या घोडचुकीमुळे ब्रिटनला अतोनात दुःख व यातना होणार. युरोपी बाजारपेठ उघडी ठेवण्यासाठी ब्रिटनला अनावश्यक सवलती द्याव्या लागतील. स्वत्व विकावं लागेल.

युरोपी देशात रहिवाशांना विहार स्वातंत्र्य आहे. म्हणजे एका देशातला अवैध हल्लेखोर कुठच्याही राष्ट्रात जाऊन नोकरी करतो. युरोपी गरीब देशांना व मुख्यत्वेकरून मुस्लिमांना ब्रिटन प्रामुख्याने आवडतो. कारण तिथलं स्वातंत्र्य, फुकट आरोग्यसेवा व इतर कल्याणकारी योजना त्यांना खुणावतात. तसंच तिथली आंतरराष्ट्रीय भाषा त्यांना परिचित वाटते. वसाहतकाळात ती त्यांच्या गळी उतरवण्यात आली होती. स्थलांतरीतांचे अनिर्बंध लोंढे येऊ लागल्यामुळे ब्रिटनचा सामाजिक व सांस्कृतिक पोत बदलून जागतिक ओळख धूसर झाली. हे नको म्हणून ब्रिटिशांनी राष्ट्रसंघातून बाहेर पडण्यास मतं दिलीत. पण थरिसा मे यांच्या दुर्बल भूमिकेमुळे आता या कळीच्या मुद्द्यावरच गदा पडणार असे



हिलरी क्लिंटन

वाटते. विहार स्वातंत्र्य नाही म्हणजे बाजारपेठ मोकळी नाही असं युरोपी संघ म्हणतो. त्यामुळे स्थलांतरितांविषयीचं जे धोरण आहे ते थरिसाला ढिलं करून जास्तीचे परदेशी लोक देशात येऊ द्यावे लागतील. प्रचार करताना त्यांनी या लोंढ्याला ६८ टक्के कात्री लावू असं आश्वासन दिलं होतं. पण या पराभवामुळे त्यांना या धोरणात बदल करणं भाग पडेल. त्यामुळे जनता उद्विग्न होऊन सरकार पडण्याची शक्यता.

हिलरीचे प्रतिस्पर्धी डोनाल्ड ट्रंप. कधीही, कुठल्याही निवडणुकीत भाग न घेतलेले. या अननुभवापुढे आपलं २५ वर्षांचं कर्तृत्ववान राजकीय जीवन मतदारांना जास्त आवडेल असं हिलरीलाच नव्हे तर सर्व जगाला वाटलं. अशा विषम समीकरणात हार खाण्यास विशेष गुण लागतो. तो प्रचूर प्रमाणात थरिसांमध्येही सापडतो यात वाद नाही. जेरमी कोरबिन हे तर ट्रंपपेक्षा अधिक विकोपाला गेलेल्या धोरणाचे धनी. ते स्वतःला समाजवादी समजतात पण त्यांची मतं मार्क्सवादी. आपण निवडून आलो तर ब्रिटिश रेल्वेचं पुनर्राष्ट्रीयीकरण करू, पेट्रोलच्या व विजेच्या कंपन्या ताब्यात घेऊ व मुख्य म्हणजे दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिकेशी असलेले खास व वेगळे संबंध तोडू असं ते प्रचारसभेत सारखे म्हणत. अमेरिकेच्या सिनेटर बर्नी सँडर्ससारखे त्यांचाही जास्त कमाई करणाऱ्यांवर कमालीचा रोष आहे. त्यांच्यावर अधिक कर लादून उभे केलेल पैसे गरिबांना वाटू असं उदात्त धोरण त्यांनी मतदारांसमोर मांडलं. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत कमाई करदर ९० टक्क्यांच्या घरात होता. नंतर फ्रान्सचे डावे अध्यक्ष फ्रँकॉह हॉलंडे यांनीही तो कर वाढवला व ते तोंडघशी पडले. त्यामुळे देशाचं उत्पन्न मुळीच वाढलं नाही. ते एवढे अप्रिय झाले की पुनर्निवडणुकीसाठी उभे देखील राहिले नाही. पण या इतिहासावरून कोरबिननं मुळीच धडे शिकले नाहीत. कोरबिनचं धोरण किती चुकीचं आहे हे थरिसा मतदारांना पटवून देऊ शकल्या नाही.

विद्यापीठीय पिढीची दुखरी नस मात्र कोरबिनला सापडली. ती तरुण पिढी शैक्षणिक खर्चाच्या ओझ्याखाली पिचत आहे हे

ओळखून त्यांनी शिक्षण नि:शुल्क करण्याचं आश्वासन दिलं आणि जादू घडली. त्यांच्या भाषणाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हजेरी लावू लागले. उलट हिलरीप्रमाणे थरिसांची तीच ती साचेबंद भाषणं ऐकून त्यांना कंटाळा आला. याचा परिणाम निवडणुकीवर झाला. एकूण ७२ टक्के तरुण-तरुणींनी कोरबिनला मतं दिलीत. थरिसाला हटवण्यास ते कारणीभूत होते.

हिलरीप्रमाणे थरिसाही उत्कृष्ट दावेदारीण होती असं कुणीच म्हणणार नाही. त्या हिलरीपेक्षा वयानं जवळजवळ एका दशकानं धाकट्या. तरी अमेरिकन भगिनीपेक्षा त्या वृद्ध दिसतात. हा सौंदर्यप्रसाधनाचा गैरवापर असावा. तोंडावरच्या सुरकुत्या बुजवण्यासाठी ब्रिटिश हिलरीला फेस पावडर पसरवण्यासाठी बुलडोझर लागतो. तरीही त्यांच्या डोळ्यांखालच्या घड्या अस्पष्ट होत नाहीत. त्यांच्या ओठांवर लाल लिपस्टिक कायमची गोंदलेली. त्यामुळे त्यांचा हास्यहिन चेहरा त्या 'बॅटमॅन' नावाच्या चित्रपटातल्या एका विदूषकासारखा दिसतो. हिलरीप्रमाणे त्याही तासन्तास आरशासमोर बसल्याशिवाय जनतेसमोर उभ्या राहू शकत नाही. त्यामुळे त्यांचं खरं प्रारूप व धोरण अंधारातच राहतं. स्वभावानं त्या फटकळ, स्वत:ला सर्वसामान्यांपेक्षा उच्च समजणाऱ्या व अस्वागतशील. मतदार हा रस्त्याला एक दगड अशी त्यांची भावना. त्यामुळे त्या सामान्य माणसाशी भावनिक नाळ कधीच जोडू शकल्या नाहीत. हिलरीच्या बाबतीतही हे खरं होतं. मतदारांशी संवाद साधणं, त्यांच्याशी निखळपणे बोलणं, हास्यविनोद करून त्यांची मर्जी संपादणं त्यांना उपरं वाटतं. त्यामुळे त्यांची एक व्यक्ती म्हणून नव्हे तर ठोकळा म्हणून ओळख झाली. प्रचारसभेत त्या यंत्रमानवाप्रमाणे तेच ते भाषण वाचतात. त्यामुळे वार्ताहरांनी त्यांना 'Maybot' असं नाव दिलं. म्हणजे मेंचा रोबॉट (Robot) झाला. हिलरी देखील त्याच साच्याची. दोन्ही बाबतींत सल्लागार, विपणनतज्ज्ञ व प्रसारमाध्यमं एक कृत्रिम व्यक्तिमत्त्व जनतेला विकण्याचा प्रयत्न करत होते. पण जनतेला फारकाळ फसवता आलं नाही.

त्यांच्या चेहऱ्यावरील बहुस्तरीय लेपात त्यांचं धोरणही अदृश्य झालं असं अनेकांचं म्हणणं होतं. त्या नेमकं कशासाठी उभ्या आहेत हे कुणालाच ठाऊक नव्हतं. हिलरी देखील अशीच उद्दिष्टहिन होती. जे धोरण आहे त्यात बदल करण्यात मे यांना मुळीच संकोच वाटला नाही. निवडणूक प्रचारात त्यांनी मोठ्या धुमधडाक्यात विधान केलं की पैसे वाचवण्यासाठी वृद्धांना काही आरोग्य खर्च भरणं अपरिहार्य करणार. सध्या ब्रिटिश हेल्थ सर्व्हिस या योजनेखाली सर्व सेवा जवळजवळ फुकट मिळते. हे बोलणं कानावर पडताच सगळीकडे विरोधाचे वणवे पेटले. हा 'थरकाप कर' कुणालाच आवडला नाही. त्यानंतर अवघ्या चार दिवसांत थरिसा यांनी 'यू टर्न' घेऊन तो कर रद्द केला. हे मतपरिवर्तन त्यांना अधिकच बाधलं. हवेची दिशा बघून शीड बदलणारा राजकारणी कुठल्याच प्रजेला आवडत नाही. हे मतपरिवर्तन तत्त्वापोटी नसून केवळ राजकीय सोयीसाठी आहे हे ओळखायला कुठला मानसोपचार तज्ज्ञ लागत नाही. ही बाई तत्त्वाशी तडजोड करण्यास मागेपुढे पाहत नाही अशी तिची प्रतिमा झाली.

शहाणा राजकारणी वृद्धांच्या लाभात कपात करा असं चुकूनही म्हणणार नाही कारण ही जात एकजुटीनं एक गठ्ठा मतदान करते व दुष्ट राजकारण्याला दुसरा पेशा पत्करण्यास सांगते. अमेरिकेतही तसंच आहे. या देशात वृद्धांसाठी असलेल्या योजनेला मेडिकेअर म्हणतात. त्याचा खर्च एवढा वाढला आहे की तो पेलेनासा झाला. तरी एकही राजकारणी त्यावर बंधन घाला म्हणून सुचवत नाही. हे शहाणपण सांगणारे एकतर निवृत्त राजकारणी किंवा वित्त तज्ज्ञ असतात. त्यांना मतदारांसमोर उभं राहण्याची आवश्यकता नसल्यामुळे हे चऱ्हाट लावण्यास मुळीच अडचण पडत नाही. पण थरिस यांनी ही चूक करून आपण पंतप्रधान होण्याच्या लायकीचे नाही हे सिद्ध केलं.

त्यांच्या कर्तृत्वक्षेत्राला पडलेलं दुसरं भोक म्हणजे ब्रिटनमध्ये बोकाळलेला दहशतवाद. मँचेस्टर व लंडनमध्ये नुकतेच मुस्लिम दहशतवाद्यांनी हल्ले चढवून २० लोकांचा बळी घेतला होता. अनेक जखमी दवाखान्यात भरती झाले होते. हे मतदार विसरले नव्हते. जनता हैराण झाली होती. प्रधानमंत्री होण्यापूर्वी थरिसा मे सहा वर्षं गृहमंत्री होत्या. त्यावेळी अनेक हल्ले होऊन जीवितहानी झाली. जनतेनं त्यांना उत्तरदायी ठरवून जबाब विचारला. त्या काळात गृहमंत्र्यांनी खर्च कमी करण्यासाठी पोलिसांची संख्या घटवली ही माहिती उघडकीस आली आणि स्फोटक ठरली. जेरमी कोरबिननी ती कौशल्यानं वापरून थरिसांवर वार केला. तो त्यांच्या वर्मी झोंबला. जनतेनं मतदान पेटीवर लक्ष ठेवून आपला रोष दर्शवला.

लंडनच्या डाव्या मताच्या 'इकॉनॉमिस्ट' या वित्त साप्ताहिकानंही थरिसा मे यांच्या नेतृत्वावर शिंतोडे उडवले. त्यांना अर्थकारण कसं चालतं याचा गंध नाही असा आरोप केला. अमेरिकेप्रमाणे ब्रिटिशांचाही जागतिकीकरणावरचा विश्वास पार उडाला. अशा मुक्त व्यापारात स्वस्त मजुरीच्या देशांचा फायदा होतो असं त्यांना वाटतं. पण तो सार्वत्रिक नसून निवडक व स्वार्थापोटी आहे हे ब्रिटिशांच्या वागणुकीवरून सिद्ध होते. न्यूयॉर्कनंतर लंडन ही जगाची वित्तराजधानी समजण्यात येते. तिथे बहुदेशीय बँकांची मोठमोठी कार्यालयं असून ते युरोपी राष्ट्रसंघाच्या देशांचा आर्थिक कारभार सांभाळतात. पण ब्रेक्सिटमुळे लंडनला आता असं करता येणार नाही. त्यामुळे लंडनचं महत्त्व कमी होऊन हजारो कर्मचारी युरोपमध्ये स्थलांतरित होत आहेत. पण जागतिकीकरणाचा हा पैलू अबाधित राहावा असं ब्रिटनला वाटतं. त्यासाठी होणाऱ्या वाटाघाटीत थरिसा मे यांची भूमिका दुर्बल असल्यामुळे ब्रिटिशांच्या हिताकडे कुणी बघणार नाही.

**- डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)


# अमेरिकेत मराठी साहित्य-संस्कृतीचा जागर

## अभिजित हेगशेट्ये

**७ जुलै** २०१७ सकाळचे ९ वाजलेले, ग्रॅन्ड रॅपिडच्या मुख्य रस्त्यावर असणारे भव्य असे 'व्हॅन अॅन्डेल अरेना' हे सभागृह, रस्त्यावर फक्त वाहनांची वर्दळ आणि सभागृहात प्रवेशासाठी लांबलचक रांग, मराठमोळ्या पेहरावातील अत्यंत शिस्तबद्ध धिम्या गतीने चाललेली. जवळपास ४००० बैठक क्षमता असणारे चार मजली गॅलरी असणारे हे सभागृह अमेरिकेतील तमाम मराठी कुटुंबांच्या उपस्थितीने खचाखच भरले होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १८ व्या अधिवेशनासाठी साऱ्या अमेरिका कॅनडातून मराठी मंडळी जमली होती. चौथ्या माळ्यावरील गॅलरीत बसणाऱ्या व्यक्तीला व्यासपीठावरील व्यक्ती अगदी छोटी दिसत होती. दोन बाजूला भव्य मोठे स्क्रिन त्याची उणीव भरून काढत होते.

अठराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष नितीन जोशी यांनी अमेरिकेतील विविध राज्यातून आलेल्या मराठी बांधवांचे स्वागत करताना सांगितले, ''मायदेशापासून हजारो मैल दूर राहून सुद्धा आपण मराठी भाषा, संस्कृती, कला आणि बंधुभाव जोपासतो आहोत हे आजच्या या अभूतपूर्व उपस्थितीचे प्रतीक आहे. गेली ३६ वर्षे उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवांसाठी कार्यरत असलेली भारताबाहेरची महाराष्ट्रीय लोकांची सर्वात मोठी संस्था आहे.'श्रम मंत्राचा, ध्यास गतीचा, गर्व मराठी संस्कृतीचा' ह्या घोषवाक्याच्या आशयानुसार ती कार्यरत आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन माजी संरक्षणमंत्री आणि गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांच्या हस्ते झाले. पर्रिकर हे मुंबई आयआयटीचे विद्यार्थी, आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी आयआयटीला असतानाच्या हॉस्टेलवरील काही आठवणी सांगितल्या. ''दररोज नाष्ट्याला साबुदाणा तोही स्पंजसारखा फुगलेला! अखेर या साबुदाणा खिचडीविरोधात आम्ही साऱ्या हॉस्टेलच्या विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आणि त्या आंदोलनाची जबाबदारी माझी इच्छा नसतानाही माझ्याकडे आली आणि तेथून माझी वाटचाल राजकीय नेतृत्वाकडे झाली.'' हा किस्सा ऐकताना सभागृहातील आयआटीअन्सचा जो काही प्रचंड प्रतिसाद वाक्या-वाक्यागणिक पर्रिकरांच्या भाषणाला मिळत होता. यामुळे साऱ्या सभागृहाने त्यांचे भाषण अगदी आपल्या मनीचे बोल असल्यागत उचलून धरले. त्या साऱ्या सभागृहातील चित्कार आरोळ्या प्रसंगी शिट्या ऐकल्या आणि वरच्या गॅलरीतून मनात एक विचार आला. पवई आयआयटीतील सारे आयआयटीअन्स इकडेच आले आहेत की काय? महाराष्ट्रातील गेल्या तीन दशकातील सारी बुद्धिमत्ता या सभागृहात एकत्रित झाली होती. सारे आपले करिअर घडविण्यासाठी अमेरिकेत आले. येथेच स्थायिक झाले, मात्र तरीही मराठीपणाच्या त्यांच्या आठवणी आणि जोडलेली नाळ तितकीच घट्ट आहे. परदेशात असूनही आपला सांस्कृतिक वारसा, परंपरा



जपण्यासाठीची त्यांची धडपड विलक्षण आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उत्तम नेटवर्क अमेरिकेतील अनेक शहरात आहे. डलासपासून फिलाडेल्फिया, शिकागो, न्यूयार्क, ते कॅनडातील टोरँटो आदी उत्तर अमेरिका आणि कॅनडापर्यंत पसरलेले आहे. त्या-त्या शहरातील मंडळाचे विविध कार्यक्रम होत असतात. त्यात अनेक वाङ्मयीन कार्यक्रम होतात, नाटक, नाटिका, कथाकथन, अभिवाचन तसेच भारतातून येणारे नाट्य प्रयोग, प्रकट मुलाखत, कवितावाचन आदी विविध कार्यक्रम ही मंडळे आयोजित करत असतात. तसेच महिला, तरुण यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करतात. या अनेक मंडळांचे दर दोन वर्षांनी अमेरिकेत व्यापक असे अधिवेशन आयोजित केले जाते. या अधिवेशनात बिझनेस कॉन्फरन्स 'इन्व्हेस्टमेन्ट इन इंडिया एक्सलन्स शेल्टर' हा एक महत्त्वाचा भाग असतो. अमेरिकेतील उत्पादन, सेवा आणि तंत्रज्ञान आदी अनेक क्षेत्रात अत्यंत उच्च दर्जाची गुणवत्ता प्राप्त करत यशस्वीतेच्या अत्युच्च पदावर असणारी अनेक मराठी मंडळी प्रामुख्याने या बिझनेस कॉन्फरन्सचे प्रमुख आकर्षण असतात. एकमेकांना मदत करणे तसेच भारतातील उद्योग सहभाग आणि सहकार्य या बाबतची चर्चा आणि धोरणे हाही त्याचा एक महत्त्वाचा भाग ठरतो. या अधिवेशनासाठी भारतातून दरवर्षी सहभाग घेणारे उद्योजक व अभ्यासक आहेत. यावेळी 'झेप कर्तृत्वाची' ह्या कार्यक्रमाअंतर्गत एच.आर. गायकवाड यांची खास मुलाखत ठेवण्यात आली होती.

महाराष्ट्रीय सांस्कृतिकता आणि सामाजिकता हा या अधिवेशनाचा एक मुख्य भाग आहे. या अधिवेशनातील सर्वाधिक आकर्षण होते ते नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांच्या 'तारे जमीं पर' या कार्यक्रमाचे! विजय केंकरे यांनी त्याचे सूत्रसंचालन केले. 'परफॉर्मिंग थिएटर' या भव्य अशा नाट्यगृहात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी दीड तास लोकांनी रांगेत उभे राहात सभागृहात प्रवेश केला. जवळपास दोन-अडीच हजार क्षमतेचे, हे चार मजली गॅलरी असणारे सभागृह, कार्यक्रम





सुरू होण्यापूर्वी पाच मिनिटे या सभागृहात बसण्यास जागा नाही अशी परिस्थिती... नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांच्या 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' या सिनेमाचा करिश्मा या कार्यक्रमावर दिसत होता. त्यातही नाना पाटेकर यांचे 'नाम'च्या माध्यमातून महाराष्ट्रात सुरू असणारे सामाजिक काम! या कामाशी बृहन्महाराष्ट्र फाउंडेशन जोडले गेले आहे. 'महाराष्ट्र फाउंडेशन' आणि 'रंगमंच' या संस्थांनी 'नाम'साठी ८५ हजार डॉलर इतका निधी जमा केला. नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांच्या सोबत विजय केंकरे यांचा संवाद हा कार्यक्रम सुरू झाला आणि नाना पाटेकर यांनी त्यांच्या स्वभावानुसार साराच कार्यक्रम हायजॅक केला. सोनाली कुळकर्णी यांना मध्ये-मध्ये प्रकटनाची संधी मिळत होती, परंतु सारे नाना आणि नाना यांचे स्वगत असेच चित्र, मात्र तरीही तब्बल दोन तासांच्या कार्यक्रमाने फारच छान रंगत आणली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नानाने 'नाम' फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची आणि अमेरिकेतील मराठी माणसाच्या त्यातील सहभागाची तळमळ अचूक जागा शोधत मांडली. नानाचे हे सामाजिक योगदान येथेही त्याला मोठेपणा देऊन गेले.

संगीत संशयकल्लोळ, (मुंबई), पुष्कर श्रोत्री, ऋजुता दिवेकर, प्रशांत दामले, राजीव सत्याल (स्टॅन्डअप कॉमेडी), स्वप्नील बांदोडकर आणि बेला शेंडे यांचा गाण्याचा 'लाइव्ह कॉन्सर्ट', मधुरा धांडे जोशी यांचे 'रहेना रहेना हम', 'सूर सरगम सारेगम स्टार झी मराठी प्रेझेंटस' असे विविध कार्यक्रम शानदार झाले. 'हास्यधारा'च्या काव्यमैफिलीत रामदास फुटाणे आणि अशोक नायगावकर यांनी खूप धमाल केली. भारतातील आणि महाराष्ट्रातील स्थानिक राजकारणाचे विविध किस्से अमेरिकन मराठी मनांना मंत्रमुग्ध करून गेले. 'सूर निरागस हो' या महेश काळे याच्या कार्यक्रमाला रसिकांची अलोट गर्दीचा उच्चांक गाठला. स्थानिक कलाकारांचे रंग मराठी मनाचे (डेटॉइट), नमन नटवरा ( सिॲटल), भक्तिरंग ( टोरॅन्टो), अग्निदिव्य (नाटिका, न्यू जर्सी), माऊली (नाटक) शिकागो, रामायण म्युझिकल (बे एरिया), तमाशातील तमाशा (फिलाडेल्फिया), मोरुची मावशी नाटिका (डेट्राइट), आम्हाला पण जमतं (लोव्हा), स्थानिक कलाकारांचे हे कार्यक्रम सर्वाधिक दाद मिळवून गेलेले 'घाशीराम कोतवाल' (नॉर्थ कॅरोलीना) होते.


'ग्रंथाली' आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे नाते १९९३ च्या बाल्टिमोर अधिवेशनापासूनचे आहे. १९८४ साली शिकागो येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पहिले अधिवेशन भरले, त्यावेळी फक्त २५० लोक जमले होते. अमेरिकन मराठी माणसांची सांस्कृतिक गरज भागविण्यासाठी केलेला तो पहिला प्रयत्न आज तीन-चार हजार लोक अधिवेशनासाठी चार दिवस येतात आणि मराठी संस्कृतीचा, परंपरांचा जागर जागवितात. या जागरणात 'ग्रंथाली'च्या ग्रंथजागराचा सहभाग अनमोल असा आहे. मराठी संस्कृतीची, परंपरांची जपणूक करत असतांना ग्रंथाली वाचक चळवळीने त्यात सहभाग घेत मराठी साहित्याचा जागर सुरू ठेवण्याचा व तो अमेरिकेतील मराठी मनात तो संवर्धित करण्याचा संकल्प हाती घेत गेली ३५ वर्षे झोकून देऊन काम केले आहे. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर त्यांचे यातील योगदान अभूतपूर्व आहे. या अधिवेशनातील 'ग्रंथाली'चा सहभाग लक्षवेधी होता. आजकाल मराठी पुस्तकांची विक्री होत नाही. अशी ओरड प्रथितयश प्रकाशक नेहमी करत असताना, नफ्या तोट्याची तमा न बाळगता सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथ वाचक चळवळीचा घेतला वसा सोडणार नाही' ही भूमिका घेत गेली ३५ वर्षे बृहन्महाराष्ट्र अधिवेशनातून 'ग्रथांली'चे पुस्तक प्रदर्शन आणि पुस्तक विक्री यांचे भव्य दालन उभारले आहे. बृहन्महाराष्ट्राच्या दर दोन वर्षांनी अमेरिकेतील विविध शहरात होणाऱ्या अधिवेशनाचा 'ग्रंथाली' हा एक अविभाज्य घटक झाला आहे आणि या माध्यमातून या अधिवेशनानिमित्ताने येणारे हजारो मराठी जन वाचते करण्याचे कार्य ग्रंथाली करत आहेच, परंतु अनेकांना लिहिते करण्याचे कार्यही या निमित्ताने होत आहे. अमेरिकेत गेलेल्या मराठी तरुणांना आपल्या भाषेचा विसर पडत जातो, मात्र त्यांच्यात एक आंतरिक जाणीव सतत रहात असते ती आपल्या मराठी संस्कृतीची. बीएमएम माध्यमातून या संस्कृतीसंवर्धनाला एक मोठा आधार मिळाला आहे आणि त्याचवेळी महाराष्ट्रातील एकमेव प्रकाशक वाचक चळवळ 'ग्रंथाली'ने हजारो लाखो मराठी जनांशी आपले नाते जोडून घेतले आहे. यामुळे महाराष्ट्रीयन सांस्कृतीची जपणूक आणि संवर्धन करतांना मराठी भाषा आणि मराठी साहित्य सातासमुद्रापार मराठी मनामनात पोहोचविण्याचे कार्य ग्रंथाली गेली ३५ वर्षे करत आहे. यामुळेच 'ग्रंथाली'चा या अधिवेशनातील पुस्तकांचा स्टॉल हे साऱ्या अधिवेशनाचे आकर्षण होते. अधिवेशनाचे उद्घाटक गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांनी आवर्जून या स्टॉलला भेट दिली. काही पुस्तकांचे प्रकाशन केले, त्याचबरोबर बीएमएमचे अध्यक्ष नितीन जोशी, चेअरमन

आशीष चौघुले, उद्योजक श्री. ठाणेदार, शंकर अभ्यंकर आणि अनेक मान्यवरांनी या स्टॉलला भेट दिली. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि त्यांच्या सहकारी धनश्री धारप यांनी तर गेल्या अनेक अधिवेशनातील सहभागाने अगणित सहकारी जोडले आहेत. अनेक वेळा अमेरिकेतील मराठी माणसांची एकमेकांना ओळख करून देण्याची जबाबदारीही त्यांनाच पत्करावी लागते. या निमित्ताने अनेक अमेरिकेतील मराठी लोकांना लिहिते करण्याचे फार मोठे काम सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले आहे. आजपर्यंत 'ग्रंथाली'ने डॉ. अनंत लाभसेटवार, विनता कुलकर्णी, विद्या हर्डीकर सप्रे, डॉ. प्रकाश लोथे, प्रगती कोळगे, आदी अनेकांची पुस्तके प्रकाशित केली आहेत. बीएमएम अधिवेशनाच्या निमित्ताने अमेरिकेतील मराठीजनांचे मराठीतील पुस्तक हे 'ग्रंथाली'च्या वाचक चळवळीचेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभूतपूर्व असे योगदान आहे.

'ग्रंथाली'चा लेखक म्हणून या अधिवेशनाला जाण्याची संधी मिळाली. या निमित्ताने अनेकांच्या भेटी झाल्या. श्री. ठाणेदार बेळगाव जवळील चिकोडी येथील खेड्यातील अमेरिकेतील एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविलेले. त्यांचे २००४ साली प्रकाशित झालेले 'श्रींची इच्छा' हे पुस्तक अमेरिकेत जाणाऱ्या तरुणांसाठी आयडॉल ठरलेले. आज ठाणेदार मिशिगन येथील गव्हर्नर पदासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. २०१८ मधील निवडणुकीत ते निवडून आले तर ते अमेरिकेतील पहिला मराठी गव्हर्नर ठरतील.

'ग्रंथाली'च्या शेजारीच अमेरिकेतील मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळांच्या कार्याची माहिती देणारा स्टॉल होता. अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी कुटुंबांची पुढची पिढी मराठी भाषा आणि त्याच्या संस्काराचे जतन किती करेल हा येथील मराठी कुटुंबांना अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. अमेरिकेत जन्मलेली या कुटुंबातील मुलांची संस्कृती आणि भाषा अमेरिकन होत आहे. ते नैसर्गिकही आहे. येथे आलेली बहुतांश मुले ही आपसात इंग्रजीमध्ये संभाषण करतानाच दिसत होती. या कुटुंबात घरी आईवडिल मराठीत संभाषण करतात आणि आपल्या मुलांना जाणीवपूर्वक मराठी शिकवितात. अशाच कुटुंबातील मुले मराठी बोलू व समजू शकतात. याची जाणीव प्रकर्षाने होत होती. बृहन्महाराष्ट्र मंडळाने यासाठी मराठी शाळांचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे. आज मंडळाच्या संपूर्ण अमेरिकेत विविध शहरातून ६६ मराठी शाळा सुरू असून येथे १७२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इयत्ता ५वीच्या विद्यार्थ्याला मराठी भाषा शास्त्रशुद्ध शिकविण्यासाठी अगदी प्राथमिक स्वरूपात भारती विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून तो अभ्यासक्रम येथे राबविला जातो. हे सारे पहाताना मनात महाराष्ट्रातील मराठी शाळा विद्यार्थ्यांअभावी कशा बंद पडत आहेत आणि इंग्रजी माध्यमाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल हे चित्र समोर दिसत होते.

करिअरच्या वाटा शोधत अमेरिकेत स्थिरावलेली ही हजारो मराठी कुटुंबे मनाने मात्र सदैव महाराष्ट्राच्या मातीशी, संस्काराशी




डॉ. प्रकाश लोथे यांना ग्रॅन्ड रपिड येथील बीएमएम अधिवेशनात बेस्ट रायटर ॲवॉर्डने पुरस्कृत करण्यात आले.

जोडलेली असतात याची जाणीव येथील प्रत्येक कार्यक्रमातून होत रहाते. ग्रंथदिंडी हा अधिवेशनातील अत्यंत आकर्षक आणि उत्फुल्लतेचा उत्कट आविष्कार सोहळा असतो. सकाळी ७.४५ला निघणाऱ्या ग्रंथदिंडीसाठी व्हॅन अँन्डेल आणि देवोस कन्व्हेन्शन येथील वाहतुकीचे मार्गही बंद करण्यात आले होते. या ग्रंथदिंडीत सारी मंडळी आपला नेहमीचा सूट, टाय, बूट, टीशर्ट, जिन्स पोषाख बाजूला ठेवून सदरा-कुर्ता, पुणेरी भरजरी पगड्या शेरवानी, नववारी, पाचवारी, नाकात नथ अशा अस्सल मराठमोळ्या पोशाखात! ग्रॅन्ड रॅपिडच्या रस्त्यावर सारा महाराष्ट्रच उतरलेला. जोडीला सनई, ढोल-ताशे, झांज आणि उंच पताका याची साथ. त्यात लहा-मोठे साऱ्यांचा अगदी उत्साही सहभाग होता. या अधिवेशनाच्या निमित्ताने असणारे जेवण विभागही पूर्णत: मराठी खाद्यान्नाचे विशेष दालन झालेले.

या अधिवेशनात कॅनडापासून ते उत्तर अमेरिकेतील हजारो कुटुंबे तीन दिवसासाठी येतात. एकमेकांना भेटतात विचारांची देवाण घेवाण होतानाच अनेक नव्या ओळखी होतात. पुढील अधिवेशनाला भेटण्याची येण्याची आमंत्रणे देतात. तसेच आपली मुले-मुली यांची लग्न येथील मराठी कुटुंबातील मुला-मुलींशीच व्हावी ही प्रत्येकाची इच्छा असते. या माध्यमातून वधू-वर सूचक मंडळ म्हणून हे अधिवेशनाचे माध्यम मोठे काम करत असते. अमेरिकेसारख्या प्रगत देशात स्वत:च्या करिअर आणि प्रगतीचा आलेख उंचावत असतानाच साहित्यिक, सामाजिक सांस्कृतिकतेतील मराठीपणा टिकवून ठेवण्याचे कार्य, मराठी मनाची नाळ जोडून ठेवत, व्यापक स्वरुपात बीएमएम अधिवेशन माध्यमातून अत्यंत उत्तमपणे सुरू आहे. काहीवेळा जाणवते, या महाराष्ट्रात जपली जात नाही इतक्या अनेक सांस्कृतिक बाबींची जपणूक अमेरिकेतील मराठी जन अधिक आत्मीयतेने करीत आहेत.

– अभिजित हेगशेट्ये
भ्रमणध्वनी : ९४२२०५२३१४
abhijit.shriram@gmail.com

# 'प्रीत ती विसरू कशी'




दिवंगत प्रा.(डॉ.) अंकुश सावंत यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आणि त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'प्रीत ती कशी विसरू कशी'चे प्रकाशन गंगाराम गवाणकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी याप्रसंगी प्रसिद्ध अभिनेते प्रमोद पवार, अभिनेत्री दिप्ती भागवत, गोविंद येतयकेर, हेमांगी सावंत, डॉ. कविता सावंत, लतिका सावंत, ऋषी सावंत, साहित्यिक अ.वि. साळवी, मिश्रा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. सावंत यांचे अप्रकाशित लिखाण आज वाचकांसमोर प्रसिद्ध झाल्यामुळे वाचकांसाठी एक उत्तम साहित्याचा ठेवा उपलब्ध झाला. कोकणाच्या मातीत जन्मलेले सावंत यांचे लिखाण म्हणजे खरंच एक अमूल्य कोकणी मेवा आहे. हे दर्जेदार साहित्य नजिकच्या काळात नक्कीच रंगभूमीवर येऊ शकेल असा विश्वास नाट्यसंमेलनाचे माजी अध्यक्ष गंगाराम गवाणकर यांनी व्यक्त केला.

नाट्यरूपात लिहिलेले हे साहित्य या नाटकातील पात्रे जिवंत करतात. प्रा. सावंत यांनी लिहिलेले पुस्तक सावंत कुटुंबीयांमुळे आणि 'ग्रंथाली'च्या प्रयत्नामुळे वाचकांसमोर आले. आज या प्रकाशनामुळे प्रा. सावंत यांना एक आगळीवेगळी श्रध्दांजली अर्पण करीत असल्याचेही गवाणकर यांनी सांगितले.

यावेळी प्रसिद्ध अभिनेते प्रमोद पवार आणि अभिनेत्री दिप्ती भागवत यांनी या पुस्तकातील नाट्य लिखाणाचे अभिवाचन केले. याप्रसंगी डॉ. सावंत याच्या जीवनावरील माहितीपट लतिका सावंत यांनी सादर केला. हेमांगी सावंत यांनी त्यांचे वडील डॉ. सावंत यांच्या स्मृतींना उजाळा दिला. तर डॉ. कविता अंकुश सावंत यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक आणि सूत्रसंचालन करीत पुस्तकांच्या निर्मितीचा प्रवास वाचकांसमोर उलगडून दाखविला.

## 'ग्रंथाली' प्रायोजित सह्याद्री वाहिनीवरील ऑगस्ट महिन्यामध्ये प्रक्षेपित होणारे 'अमृतवेल'चे कार्यक्रम



दिनांक १० ऑगस्ट २०१७, गुरुवार रोजी, रात्री ८.३० वा. 'अमृतवेल' या कार्यक्रमात 'गर्जे मराठी' या पुस्तकावर आधारित विशेष कार्यक्रम प्रसारित होणार आहे. सहभाग - लेखक द्वय आनंद गानू आणि सुनिता गानू. दि. २४ ऑगस्ट, गुरुवार रोजी, रात्री ८.३० वा. सुप्रसिद्ध कादंबरीकार. वसंत वसंत लिमये यांच्या 'विश्वस्त' या कादंबरीवर आधरित कार्यक्रम प्रसारित होईल. सहभाग - वसंत वसंत लिमये आणि लेखिका नीलांबरी जोशी. कार्यक्रमाचे संपादन आणि सूत्रसंचालन करतील रविराज गंधे. दोन्ही कार्यक्रम अनुक्रमे शनिवार, दिनांक १२ आणि २६ ऑगस्ट रोजी, दुपारी १.३० वा. सह्याद्री वाहिनीवर पुन्हा प्रक्षेपित होतील.

# 'कवडसे स्त्रीजीवनाचे'



'ग्रंथाली' आयोजित आणि नीलिमा कुलकर्णी लिखित 'कवडसे स्त्रीजीवनाचे' या कादंबरीचे प्रकाशन नुकतेच रविवार, ३० जुलै २०१७रोजी पुण्यात पत्रकार भवन येथे डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते झाले.

गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ न्यू जर्सी येथे वास्तव्यास असलेल्या लेखिका नीलिमा कुलकर्णी यांची ही तिसरी कादंबरी. या पूर्वीच्या 'अमेरिकेच्या अंगणी', 'कथा देशांतरीच्या' या त्यांच्या दोन्ही पुस्तकांना मराठी वाचकांकडून मोठी मागणी आहे. डॉ. सरोजिनी बाबर यांच्याबरोबर लोकसाहित्य संकलनाचे मोठे काम केलेल्या लेखिका नीलिमा कुलकर्णी यांच्या या तिसऱ्या कादंबरीचे प्रकाशन करण्याची जबाबदारी महाराष्ट्रभर वाचक चळवळ उभी करणारी आणि दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन करणारी महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्था म्हणजे 'ग्रंथाली'ने घेतली होती. चित्रकार सतीश भावसार यांच्या कुंचल्यातून साकारलेले आकर्षक मुखपृष्ठ या कादंबरीला लाभले असून सुप्रसिद्ध लेखिका-कार्यकर्त्या 'विद्या बाळ' यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

अशा नितांत सुंदर कादंबरीचे आणि इ-बुकचे प्रकाशन प्रत्येक चोखंदळ वाचकाच्या लाडक्या असणाऱ्या, विविध नात्यांमधील, मैत्रींमधील उकल आपल्या साहित्यातून करणाऱ्या सुप्रसिद्ध कवयित्री-लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते झाले. या कादंबरीचे विशेष सांगताना त्या म्हणाल्या, ''या कादंबरीला एकच नायिका नाही. काळ हाच नायक आणि परिवर्तन हे सूत्र घेऊन या कादंबरीची मांडणी केली आहे. १९७५ सालापासून स्त्रीवादाचा उदय झाला आणि तेव्हापासून सामाजिक क्षेत्र असो, सांस्कृतिक क्षेत्र असो प्रत्येकात तो पसरला. स्त्री जागी झाली, बोलू लागली आणि तिला अस्तित्वाचे भान आले, हे बायकांचे शहाणपणाचे अनुभव कुठलाही अभिनिवेश न ठेवता या कादंबरीत रेखाटले आहेत. कादंबरीच्या विविध प्रसंगांमधून स्त्रीव्यक्तिरेखांशी विविध नात्यांनी जोडल्या गेलेल्या अनेक पुरुष व्यक्तिरेखादेखील येतात. जवळपास ८० ते १०० वर्षांच्या काळाच पट या लेखनात आला असला तरी 'स्त्रीजीवन' हा खूप मोठा प्रवाह आहे आणि त्यामुळे ह्या कादंबरीचा शेवट झाला असे नाही तर अजून स्त्रीजीवनाचे विविध विषय हाताळून भाग २, ३ आपण लिहावेत अशा शुभेच्छा त्यांनी नीलिमाताईंना दिल्या.

याच भाषणात अरुणाताई पुढे म्हणाल्या की, कुठल्याही लेखकाचे यश हे त्याची लोकप्रियता किंवा पुस्तकाच्या खपाचे आकडे यावर अवलंबून नाही तर जीवनातील अनुभव समर्पकपणे आपल्या लेखनातून मांडणे हे लेखकाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असते. त्याच लेखकाला जीवनाचा खरा अर्थ कळतो.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी याप्रसंगी म्हणाले की या कादंबरी लेखनात केवळ स्त्रीचे नाही तर समाजजीवनाचे कवडसे दिसतात. रुढी-परंपरांमुळे स्त्रियांच्या प्रगतीमध्ये अडसर निर्माण झाले. जीवनातील दु:खाचे अनेक पदर या लेखनात आहेत. स्त्रीच्या जीवनातील विविध पैलू या पुस्तकातून उमटतात. आज परिस्थिती बदलली, समाज शिकला तरी सुसंस्कृत झाला का? हा प्रश्न आहे. पण तरीही वेगळ्या वाटा शोधणाऱ्या स्त्रिया निर्भीडपणे उभ्या आहेत ही एक सकारात्मक बाब आहे. लेखन ही त्या लेखकाच्या आत्मशोधाची यात्रा असते असेही मत प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

फिलाडेल्फिया येथे वास्तव्य असणारे 'बुकगंगा'चे फाऊंडर मेंबर 'मंदार जोगळेकर' यांनी बुकगंगाची माहिती दिली. मराठी भाषा आणि दर्जेदार पुस्तके जगभरातील वाचकांपर्यंत पोहचविण्याचा ध्यास मंदार जोगळेकरांनी घेतला आहे. भारताबाहेरील सगळ्या लेखकांची आणि सगळ्या प्रकाशकांची पुस्तके 'बुकगंगा'च्या माध्यमातून, घराघरातून रसिकांना वाचायला-ऐकायला मिळत आहेत. 'कवडसे स्त्रीजीवनाचे' या पुस्तकाचे इ-बुक प्रकाशन होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

'ग्रंथाली'च्या कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप यांनी या कादंबरीत स्त्रीजीवनाची जशी दु:ख सांगितली आहेत तसाच खूप मोठा आशावाद देखील आहे असे मत व्यक्त केले. 'ग्रंथाली'तर्फे 'मराठी विश्वकोश' आता पेनड्राइव्हमध्ये उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली. या प्रसंगी सुप्रसिद्ध लेखक व गझलकार हिमांशु कुलकर्णी यांनी लेखिका नीलिमा कुलकर्णी यांना व त्यांच्या कादंबरीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंद्रायणी दीक्षित यांनी केले तर नीलिमा कुलकर्णी यांचे पती रवी कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

ही कादंबरी म्हणजे 'कॅलिडोस्कोप' आहे. कॅलिडोस्कोप जसजसा फिरवावा तसतसे दरवेळी एका अप्रतिम कलाकृतीचे दर्शन होते, तसे कादंबरीच्या प्रत्येक प्रकरणातून स्त्रीजीवनाची एक वेगळी छटा दिसते. वाचताना वाचक त्यात अगदी हरवून जातो. कदाचित आपल्याच जवळची, घरातली ती कहाणी वाटते आणि नकळत कादंबरीच्या प्रेमात पडतो.

**- इंद्रायणी दीक्षित**

## पुस्तकप्रकाशन वृत्तांत

# 'सूर्य होता रात्रीला'

मेधा आलकारी लिखित 'सूर्य होता रात्रीला' या एका जिवंत प्रवासवर्णनात्मक पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशनसोहळा ४ ऑगस्ट २०१७ रोजी रवींद्र नाट्यमंदिर सभागृहात सायंकाळी ७ वाजता संपन्न झाला.

आपल्या सिद्धहस्त लेखणीतून २० देशांची जादुई सफर या पुस्तकाद्वारे मेधा आलकरी यांनी घडवून आणली आहे. वैविध्यपूर्ण देशांच्या या लेखनगुच्छाला वाचकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. 'ग्रंथाली'च्या उत्कृष्ट वितरणव्यवस्थेमुळे हे पुस्तक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या १००० प्रती संपवून वाचकांनी त्यावर पसंतीची मोहोर उमटवली. त्यामुळेच ४ ऑगस्ट २०१७ रोजी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती 'ग्रंथाली'ने बाजारात आणली.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी पुस्तकभेट देऊन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या पर्यटन क्षेत्रातील नामवंत उद्योजिका वीणा पाटील, अभिनेत्री इला भाटे, मुलाखतकार मकरंद जोशी आणि मेधा आलकरी यांचं स्वागत केलं.

ग्रंथालीच्या धनश्री धारप यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवातच सुंदर झाली. त्यांनी मेधाताईंची तोंडभरून प्रशंसा केली. त्याचबरोबर त्यांनी सर्वांना, ग्रंथाली दिवाळीपर्यंत उत्तमोत्तम पुस्तकांच्या ऑडिओ बुक्स द्वारे वाचकांच्या भेटीला येत असल्याची खुशखबर दिली.

मराठी माणसाचं परदेशगमनाचं स्वप्न साकार करण्यात सिंहाचा वाटा असलेल्या पर्यटनक्षेत्रावर आपला स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या यशस्वी उद्योजिका, वीणा वर्ल्डच्या संस्थापिका वीणा पाटील यांनी या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन केले. वीणाताईंनी आपल्या भाषणात, मेधाताईंनी अनवट वाटा चोखाळण्याच्या अनुभवांचं आणि विविध देशात राहण्याच्या संधीचं सोनं केलं असं म्हटलं. अशा सुंदर पुस्तकांची इलाताईंच्या आवाजात आणि त्या शैलीत ऑडिओ बुक्स झाली, तर पुढच्या पिढीला त्याचा खूप उपयोग होईल असे मत व्यक्त केले. स्त्रीचं व्यक्तिमत्त्व फुलायला घरच्यांची साथ मिळणे खूप महत्त्वाचे असते. आणि ती मेधाताईंना मिळाली असेही त्या म्हणाल्या. मेधाताईंकडून नवीन पुस्तकांची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सहजसुंदर, नैसर्गिक अभिनय आणि 'प्रत्येक भूमिका समरसपणे जगणाऱ्या' अशी ख्याती असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री इला भाटे यांनी पुस्तकातील 'नायजेरिया' आणि 'पेंग्विन परेड' अशा दोन भागांचं केलेलं अतिशय भावपूर्ण अभिवाचन सर्वच रसिकांच्या प्रशंसेला पात्र ठरलं. मेधाताईंचं अप्रतिम लिखाण आणि इलाताईंनी ते चित्र आपल्या डोळ्यांसमोर हुबेहूब उभे करण्याची



हातोटी सर्वांना खूपच भावली. इलाताईंच्या अभिवाचनातून सर्वांनाच त्यांचं बोट धरून नायजेरियाची सहल करत असल्याचा आणि फिलिप आयलंडवरच्या पेंग्विनची परेड स्वत: अनुभवत असल्याचा भास झाला.

मेधा आलकरी यांनी पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या निमित्ताने गोष्टीवेल्हाळ शैलीत आपलं मनोगत व्यक्त केलं. त्यांनी प्रवासाला व्यायामाची उपमा दिली. पोहताना जरी कष्ट करावे लागले, तरी बाहेर आल्यावर जसे ताजेतवाने वाटते, तसेच प्रवासात कष्ट असले तरी त्याचा अनुभव अपार आनंद देतो असे सांगितले.

त्यांनी सजग वाचकांपर्यंत पुस्तक पोहोचवण्याचं पूर्ण श्रेय 'ग्रंथाली'ला देऊन 'ग्रंथाली'च्या आजी-माजी सदस्यांचे आभार मानले. 'ग्रंथाली' हा सदूर असलेला वाचक आणि लेखक यांच्यातला दुवा आहे आणि ग्रंथालीमुळे या पुस्तकाच्या निमित्ताने अनेक वाचकांचे प्रेम त्यांना संपादन करता आले असे मत प्रतिपादन केले.

त्यांनी वीणा पाटील, इला भाटे, मकरंद जोशी, त्यांच्या आर.एम. भट्ट हायस्कूलचे डिमेलो सर, बयम् संस्थेच्या शुभदा चौकर, 'ग्रंथाली'चे अरुण जोशी यांचा गौरव केला.

विहंग ट्रॅव्हल्सच्या मकरंद जोशी यांनी वीणा पाटील व मेधा आलकरी यांच्याशी मनमोकळ्या गप्पा रंगवल्या आणि प्रवासाची ओढ व त्यातून लुटावयाचा आनंद खजिना हे रहस्य उलगडत नेले.

मेधाजींचे पती विनोद आलकरी यांनी प्रवासात काढलेल्या छायाचित्रांचा देखणा स्लाइड शो सादर करून आपल्या प्रिय पत्नीच्या कौतुकसोहळ्यात भर टाकली.

वर्षा राजे यांनी या कार्यक्रमाचे निवेदन केले.

या आखीवरेखीव सुंदर कार्यक्रमाचे आयोजन 'ग्रंथाली'चे नवनव्या कल्पनांचे जनक विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांचे होते.


**– वर्षा राजे**

**नव्या जाणिवांची ओळख घडविणारा**
**'सार्था'चा विलक्षण प्रवास...**

डॉ. एस.एल. भैरप्पा म्हणजे कर्नाटकी साहित्यातलं व्यासंगी नाव! आपल्या समग्र साहित्यात समाजजीवन आणि धार्मिकतेचे निरनिराळे कंगोरे डॉ.भैरप्पा स्पष्ट करतात. त्यांच्या लेखन अनुभूतीतून वाचकांना जीवन-आकलनाचं नवं भान मिळतं. त्यांची सार्थ ही कादंबरीही असचं नवं भान देणारी आहे.




प्रस्तुत कादंबरीसाठी डॉ. एस.एल. भैरप्पा यांनी आठव्या शतकाची पार्श्वभूमी निवडली आहे. वैयक्तिक कारणासाठी नागभट्ट आपल्या गावाबाहेर पडतो आणि एका 'सार्था'मध्ये सहभागी होऊन प्रवास करू लागतो. त्या निमित्ताने त्या काळचे भारतवर्ष अनेक धार्मिक आणि सामाजिक प्रश्न घेऊन त्याला सामोरा येतो. अनेक धर्म-पंथांमधले तात्त्विक मतभेदही त्याला सामोरे येतात. काही त्याच्या प्रश्नांमध्ये भर टाकतात, तर काही प्रश्नांची उकलही होते. हिंदू धर्मग्रंथातील अनेक संदर्भ नव्याने या पुस्तकात भेटीस येतात. स्त्री-पुरुष संबंधालाही वेगळंच परिमाण लाभल्याचा तो अनुभव घेतो.




'सार्थ' म्हणजे व्यापाऱ्यांचा तांडा. ज्या काळात या अर्थाने 'सार्थ' हा शब्द भारतात प्रचलित होता, त्या सातव्या-आठव्या शतकात ही कादंबरी आपल्याला नेते. तारावती या नगरातला नागभट्ट हा मंडनमिश्रांच्या गुरुकुलात वेदाध्ययन केलेला, समवयस्क अमरूक नावाच्या राजाच्या विश्वासातला, नुकतीच पंचविशी ओलांडलेला. राजा अमरूक नागभट्टावर काही कामगिरी सोपवून त्याला एका सार्थाबरोबर देशांतराला पाठवतो अन् तिथूनच विविधरंगी अनुभवचक्रात नागभट्ट गोवला जातो.

मध्ययुगातील अनेक सत्य अन् कल्पित घटनांद्वारे या कादंबरीचा पट घट्ट होत जातो. कुमारिलभट्ट, मंडनमिश्र, त्यांची पत्नी भारतीदेवी, शंकराचार्य आदी व्यक्तींच्या किंवा नालंदा विद्यापीठ, पूर्वेचे सूर्यमंदिर इत्यादी स्थळांच्या कथा येथे गुंफुन घेतलेल्या आहेत. या निरनिराळ्या ऐतिहासिक कथा या कादंबरीचा प्रवाह सखोल करीत राहतात व कथानकाचा भावकल्लोळही तीव्र करतात. यातूनच कादंबरीचा वाचक मध्ययुगीन जीवनशैलीच्या अद्भुत, विस्तीर्ण अनुभवसागरात थेट खेचला जातो. भारतीय कीर्तीचे सिद्धहस्त कन्नड लेखक डॉ. भैरप्पा यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणे 'सार्थ' ही कादंबरीही वाचकांना एका अजस्त्र, महाकाय अनुभवाला सामोरे जाण्यास भाग पाडते. ती धार्मिकतेवर भाष्य करताना मानवी प्रवृत्तींवर प्रकाश टाकते . नागभट्टचे गुरु सांगतात ,

''भरतखंडामध्ये सगळे देवालयं बांधतील. वैदिक-बौद्ध-जैन सगळ्या जाती-उपजातीतले लोक देवळं बांधत राहतील. पण तिकडून येणारे एक-एक करून त्या देवळांचा नाश करत राहतील. तू पाहिलेलं कुठलंही देवालय राहणार नाही. मंदिरं-चैत्य-स्तूप काहीही राहणार नाही. पण बांधायची प्रवृत्ती नाश पावणार नाही.''

नागभट्टच्या या प्रवासात डॉ.भैरप्पा आयुष्यातल्या अनेक समस्यांची अध्यात्मिक मांडणी करतात. एका सार्थाचा प्रवास भारतातल्या अनेक धर्मांच्या विचारधारांवरही प्रकाश टाकतो. त्या विचारधारांकडे चिकित्सक पद्धतीने पाहणारी आणि त्यातून आयुष्याचे मोजमाप करणारी माणसं या कादंबरीत भेटतात. त्यांच्या अनेक विधानातून, संवादातून धर्मविषयक नवे पैलू उलगडले जातात. जसे, देवाला धर्माची गरज नाही. देव ही माणसाची गरज आहे. शिवाय आमच्याकडचे सगळे पंथ देवाला मानत नाहीत. जैन, बौद्ध आणि सांख्य हे तर देवाचा तिरस्कार करतात. पूर्व-मीमांसक देवाचा पुरस्कार करत असले, तरी त्यांनी देवाला मर्यादित अधिकार दिले आहेत. माणसाच्या धर्माचरणासाठी देवाची गरजही नाही, त्याच्यावर विश्वास ठेवायचीही गरज नाही, असं बरेच धर्म-पंथ सांगतात.'' अशी वाक्यं सर्व धार्मिक संकल्पनांचं नेमकं विश्लेषण मांडतात.

डॉ. भैरप्पा यांचं जगण्याचं तत्त्वज्ञान उमा कुलकर्णी सहजसोप्या शब्दात मराठी वाचकांपर्यंत पोचवतात. सर्जनशीलतेची कास न सोडता आठव्या शतकातले ऐतिहासिक संदर्भ घेत भैरप्पांनी ही कादंबरी लिहिली आहे. त्यामुळे येथे तत्कालीन घटना आणि पात्र यांबरोबरच भैरप्पांनी निर्माण केलेली पात्रंही भेटत राहतात. ही पात्रे अनुवादातही तितकीच सक्षमपणे उतरतात. यात अनुवादकाच्या भाषाशैलीचा महत्त्वाचा वाटा आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने या कादंबरीच्या निमित्ताने डॉ. भैरप्पा यांच्या महत्त्वपूर्ण कादंबरीला मराठी वाचकांसमोर आणले आहे. डॉ. भैरप्पा यांच्या साहित्य प्रवासातील महत्त्वाचा दुवा म्हणजे ही कादंबरी आहे.

**सार्थ**
**लेखक - एस.एल.भैरप्पा**
**अनुवाद - उमा कुलकर्णी**
**पृष्ठसंख्या - २७२**
**किंमत - रुपये २९५/-**
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत रु. २३५**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**प्रकाशाचे बेट**

**अनुराधा गोरे**




वर आकाश आणि सभोवती अथांग सागर यातून दिशा दाखवण्याचे काम करतो तो किनाऱ्याशी उभा असलेला दीपस्तंभ. त्याप्रमाणे दिशाहीन झालेल्या, भरकटलेल्यांना जीवनाची योग्य दिशा दाखवण्याचे काम करीत आहे युवा परिवर्तन, खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशन. ही संस्था मुंबईतील वांद्रे भागात पूर्वेला स्थित असून स्वतःच्या भव्य आणि प्रशस्त जागेत परिवर्तनाचा मोठा व्याप सांभाळीत सेवाभावीवृत्तीने तरीही सक्षमपणे उभी आहे, 'परिश्रमालय' या नावाला परिश्रमपूर्वक सार्थ करीत. निष्ठा आणि ध्येय याच आचरणातून संस्था उभी राहते तेव्हा तिच्या वयाचा विचार आपोआपच मागे पडतो. परंतु इतिहासाला आपले भान सोडता येत नाही. सदरची संस्था स्थापन झाली तो काळ होता स्वातंत्र्यपूर्व काळ, १९२२, म्हणजे आज २०१७ सालात तिला ९५ वर्षांची परपंरा सागता येईल. परंतु कार्यमग्न कार्यकर्ते आणि संस्थापकांच्या मनात विचार आहे तो केवळ परिवर्तनाचा, अव्याहत कार्य करण्याचा. या संस्थेला आकाराला आणण्याचे श्रेय जाते ते संस्थापक मा. बाळासाहेब खेर यांच्याकडे. मा. बाळासाहेब हे त्यावेळचे मुंबई प्रोव्हिन्सचे प्रिमियर आणि मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री, स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी कार्यकर्ते, म. गांधीचे अनुयायी, समाजसुधारक. त्यांच्यानंतर किशोर खेर आणि मृणालिनी खेर यांनी या कार्याची धुरा हाती घेतली आणि आजच्या आधुनिकतेची जोड देत या संथेचा प्रसार भारतभर करण्यास सुरुवात केली. भारतातील १७ राज्यांतील १३६ जिल्ह्यांत या संस्थेचे कार्य जोमाने सुरू आहे. मोठी शहरे आणि दुर्गमभाग अशा दोन्ही स्तरांवर कार्य सुरू आहे. सुरुवातीच्या काळात काड्यापेट्या व साबणाचे उत्पादन खादी व ग्रामीण उद्योगाच्या साहाय्याने सुरू झाले होते. आज ही प्रगती व्यावसायिक, आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, मॅनेजमेंटपर्यंत पोहोचली आहे. विविध कला-कौशल्यांच्या कोर्सेससाठी 'इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग अँड आंत्रप्रनरशिप' सुरू केली आहे. सर्व केंद्रातून वायरमन, एअरकंडिशनिंग आणि रेफ्रिजरेशन, मोटर मॅकेनिक, मोटर ड्रायव्हिंग, नर्सिंग-नर्स असिस्टंट, टेलरिंग, एम्ब्रॉयडरी, ब्युटीफिकेशन, एंटरप्रनरशिप, कॉम्प्युटर कोर्सेस, कॉनव्हरसेशनल इंग्लिश, हॉस्पिटॅलिटी, कंस्ट्रक्शन, हेल्थकेअर हे कोर्सेस चालविले जातात. त्याच्यासोबत समुपदेशनाचीही जोड दिलेली आहे. हे समुपदेशन शैक्षणिक, कौटुंबिक, व्यवसाय, विवाहपूर्व आणि विवाहोत्तर, व्यसन-मुक्ती, कुमार -पालक आणि ज्येष्ठ नागरिक, मानसिक आणि शारीरिक आजार अशा विविध पातळ्यांवर केले जाते. त्यामुळे एक परिपूर्ण असे सर्वव्यापी स्वरूप या संस्थेला लाभलेले आहे. सामाजिक भान जपताना आजची युवापिढी अधिक सक्षम कशी होईल, ती आपल्या पायांवर कशी ठामपणे उभी राहील याकडे ही संस्था अधिक आस्थेने पाहाते. वर्षाकाठी एक लाख युवकांपर्यंत ही संस्था पोहोचते, यावरून तिच्या कार्याची व क्षमतेची कल्पना यावी.

'सोच का परिवर्तन - विचार बदला, आचार बदलेल' हा गाभा असलेल्या संस्थेचा परिचय करून दिला सुप्रसिद्ध लेखिका अनुराधा गोरे यांनी. त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेली अनेक पुस्तके आपण वाचलेली आहेत. 'ओळख सियाचेनची' या पुस्तकातून त्यांच्या संशोधनाचा आणि लेखनाच्या कसदारपणाचा प्रत्यय आपणास आलेला आहे. तितक्याच उत्तमपणे त्यांनी 'प्रकाशाचे बेट' या पुस्तकाचे लेखन केलेले आहे. हे लेखन केवळ वर्णनात्मक नाही, संस्थेच्या भरीव कार्याइतकेच मनाच्या गाभ्याला सहजपणे हात घालणारे सुंदर विचारांचे लेखन आहे. एक उदाहरण पहा, ''कोणीतरी, कधीतरी स्वप्न बघितल्याशिवाय ते प्रत्यक्षात येऊ शकत नाही, हे खरं. काहीजण स्वप्न बघायचेच विसरतात. काहीजण बघतात पण त्या स्वप्नांपर्यंत कसं पोहोचायचं हे त्यांना माहीत नसतं. मग होते चिडचिड, रागावणं, द्वेष करणं, भांडण, आततायीपणा करणं. अशा माणसांना हवा असतो थोडा आधार, चार सहानुभूतीचे शब्द आणि सर्वात महत्त्वाचं आपल्या मनावर, डोक्यावर ताबा ठेवत प्रयत्न करत राहण्याची कला. हे ज्याला जमतं तो स्वप्नांपर्यंत पाहोचतो.''

पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, राजीव गांधी, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. अब्दुल कलाम यांनी संस्थेचा गौरव केलेला आहे, ही माहिती यात आलेली आहे. परंतु याचवेळी ही संस्था जे कार्य करीत आहे, अनेकांना तिचा पुनर्जन्म लाभावा इतका लाभ झाला, यांची काही उदाहरणे दिलेली आहेत. हॉटेल सुरू करण्याचे स्वप्न पाहणारा सलीम, स्वतःच्या पायावर उभा राहू पाहणारा परंतु पोलिसांच्या ताब्यात सापडलेला मोनू, वय २० वर्षे परंतु बुद्ध्यांक १० वर्षाच्या मुलीएवढा असलेली रूपा, स्वतःच्या मालकीचे घर असावे ही आस असलेली श्वेता, घरातल्या वातावरणाने उद्विग्न झालेला हसन, स्वतःच्या भविष्याच्या चिंतेने ग्रासलेला चिमण्या, कुवतीचा विचार न करता भलत्या ध्यासाने गोंधळलेली प्रगती, घरातल्यांनी पुरेसा वेळ न दिल्याने स्वतःवरचा आत्मविश्वास उडालेला अजय, एकाग्रतेचा अभाव असलेला सुयश, लग्नाआधी ठरलेल्या नवऱ्याशी शरीरसंबंध ठेवण्यास नकार दिला म्हणून संपूर्ण कुटुंबाच्या परवडीस कारण ठरलेली रंजना, श्रीमंती आणि सगळ्या चैनी उपलब्ध झाल्याने स्वैर झालेला करण, जन्मदात्याच्या अत्याचाराला बळी पडलेली नयना, भाबड्या वयात भाबड्या समजुतीने ग्रासलेल्या युवती, घरातल्या गरिबीवर मात करू पाहणाऱ्या प्रिया व फैय्याज, लर्निंग डिसॅबिलिटी असलेला दिनू, याप्रमाणे गोलू, लीला, जॉन, सलमा, सुनिता, शांतीप्रिया, आयेशा बेगम अशा अनेकांच्या आयुष्याला प्रकाश दाखविण्याचे कार्य संस्था करीत आहे. ही मोजकीच उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष संस्थेचा आवाका प्रचंड आहे. यात दिलेले काही रंगीत फोटो संस्थेविषयी बरेच काही सांगून जातात. ही संस्था नसून पथदर्शक कुटुंब आहे असेच म्हणता येईल.

संस्थापक बाळासाहेब खेर यांची प्रतिमा प्रकाशाच्या कोनात दिलेली आहे. तर युवा परिवर्तनाचे प्रतीक असलेली युवापिढी जल्लोशाने नव्या आयुष्याचे स्वागत करीत आहे. सतीश भावसार यांनी ही सुंदर कल्पना मुखपृष्ठावर सजीव केली आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

'तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्य नि माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली, तेव्हा मी नशिबाने लादलेला मित्ररहित काळ चिंतेसह कंठित होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या 'रामू'च्या आठवणीत कोरलेले हे प्रतीक.' ही आहे अर्पणपत्रिका, डॉ. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या निधनानंतर 'थॉट्स ऑन पाकिस्तान ऑर पार्टीशन ऑफ इंडिया' या पुस्तकावर लिहिलेली. डॉ. बाबासाहेबाच्या हृदयात रमाबाईचे स्थान अढळ होते, त्यांच्या त्यागाची त्यांना पूर्ण जाणीव होती, हे यावरून लक्षात होते. आहे त्या परिस्थितीला निष्ठेने सामोरे जात पतिधर्माला जागणे, पतीच्या पाठी खंबीरपणे उभे राहणे ही एक अग्निपरीक्षा असते, त्यातून ज्या तावून सुलाखून सुखरूप बाहेर पडतात, त्याच लौकिकाला पात्र होतात, इतरांकरता प्रेरणास्थान होतात, त्यापैकी माता रमाबाई एक होत.

'प्रिय रामू...' हे योगीराज बागूल यांनी लिहिलेले आणि ग्रंथालीने प्रकाशित केलेले रमाबाईंचे समग्र असे चरित्र. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी अशी आतापर्यंत रमाबाईंची ओळख ज्ञात होती. परंतु 'प्रिय रामू...' या पुस्तकामुळे त्यांच्या संपूर्ण व्यक्तित्वाचा, चरित्राचा आलेख वाचकांसमोर आला आहे. योगीराज बागूल हे सिद्धहस्त लेखक आहेत तसे संशोधनात्मक व चरित्रात्मक लेखन करणारे लेखक म्हणून परिचित आहेत. 'पाचट' हे त्यांचे पहिले पुस्तक आजही आपल्या स्मरणात आहे. 'आठवणीतले बाबासाहेब', आणि 'डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी संबंधित पुस्तके या आधी प्रकाशित झालेली आहेत. त्यातून बाबासाहेबांच्या कार्याचा, त्या काळाचा, त्या काळातील परिस्थितीचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा पट वाचकासमोर उलगडलेला आहे. रमाबाईचे चरित्र लिहून बागूल यांनी केवळ रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतलेला नाही, तर बाबासाहेबांचे कौटुंबिक आयुष्य, त्यांच्या काळातील कौटुंबिक परिस्थिती, समाजकारण, राजकारण, मुंबई, दारिद्र्य, कष्ट, नातेसंबंध, शिक्षण, माणूसपण असा मोठा पट उलगडून दाखविलेला आहे.





आपणास ज्ञात असलेले डॉ. बाबासाहेब, त्यांचे शिक्षण, समाज-शैक्षणिक कार्य, त्यांचे सत्याग्रह, यामागे त्यांची असलेली तळमळ, त्यासाठीचा खंबीरपणा, झोकून देण्याची तयारी यांचा परिचय आपल्याला या पुस्तकातून होतो. परंतु त्याचवेळी आपलं माणूस म्हणून त्यांची वाटणारी काळजी, त्यांनी सुखरूप असावे म्हणून केलेली काळजी आणि त्यासाठी केलेली धडपड, हे आपल्या गावीही नसते. रमाबाई नावाचे एक बेट या अथांग सागरात आहे, आणि जग कवेत घ्यायला निघालेल्या जहाजाकडे ते आस लावून बसले आहे, त्याची वाट पाहात आहे, हे रमाबाईच्या चरित्रामुळे लक्षात येते. अस्पृश्यांसाठी राखीव जागा या प्रकरणात गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब यांच्यात अटीतटीचा प्रसंग येतो तेव्हा कस्तुरबा इतकीच काळजी रमाबाईंना वाटते, याला सामान्यपण कसे म्हणणार? शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या बाबासाहेबांना स्वतः ला खाण्यापिण्याची भ्रांत असायची, तरी ते कुटुंबाला मदत करीत. परंतु हीच गोष्ट रमाबाईंना समजली तेव्हा आपल्या खर्चातून बाबासाहेबांना मदत कशी करता येईल, असा विचार त्या करतात तेव्हा त्यांच्या त्यागाची कल्पना येते. घरात कधीही पूर्ण पोटभर जेवण वाट्याला येत नसे. अर्धा चतकोर खाऊन पाणी पिऊन दिवसभर कष्टाचा गाडा ओढायचा, मुलाबाळांना, कुटुंबाला आधार द्यायचा, अशा परिस्थितीत बाबासाहेबांची काळजी वाहायची, त्यांच्या शिक्षणाच्या आड कुटुंब येऊ द्यायचे नाही, यासाठी लागणारे असामान्य धैर्य केवळ ही माऊलीच दाखवू शकली, हे या चरित्रामुळे समजून येते. किरकोळ देहयष्टी, तीन अपत्यांचा मांडीवर झालेला मृत्यू आणि अपार काबाडकष्ट तरी आपल्या मनाचा समतोलपणा सांभाळला आहे. बाबासाहेबांच्या प्रतिष्ठेला कुठे बाधा येणार नाही म्हणून सतत डोळ्यांत तेल घालून वागणे झाले आहे. जिथे गेल्या तिथे आपलेपणाने वागल्या, स्वतःचे वेगळेपण कुठे दाखवले नाही, हे मोठेपण केवळ रमाबाईनाच शोभून दिसते.

या निमित्ताने कौटुंबिक बाबासाहेबांचाही परिचय होतो. पत्नीला शिकवण्याची धडपड, त्यासाठी शिक्षक नेमणे, मुलांचा अभ्यास घेणे, स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवता न येणे, मुलाचा मृत्यू झाला तेव्हा त्याला स्मशानात घेऊन जायचे तर अंगावर घालायला कपडे नाहीत, म्हणून स्मशानात जाणे टाळणे, पत्नीच्या तब्येतीची काळजी, तिला दीर्घायुष्य लाभावे म्हणून स्वतःवर बंधने घालून घेणे, तिला कधीतरी विरंगुळा हवा म्हणून सिनेमा दाखवायला घेऊन जाणे, या सगळ्यांतून वेगळेच डॉ. बाबासाहेब आपल्यासमोर उभे राहतात.

डॉ. बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदार यांनी रमाबाईची केलेली निवड अचूकच म्हणायला हवी. अगोदरच्या दोन मुली पाहून झाल्यानंतरही त्यांनी रमाबाईची निवड केली. एक अनाथ पोर हे एक कारण, परंतु प्रथम दर्शनीच तिचे संस्कारित वागणे, दिसणे, भीमरावसाठी अनुरूप असणे, त्यांनी ओळखले होते. ती निवड किती सार्थ ठरली याचा प्रत्यय त्यांनी बाबासाहेबांना दिलेल्या साथसोबतीतून येतो. अल्पायुषी ठरलेल्या रमाबाई बाबासाहेबांच्या आयुष्याला पोरके करून जातात, तरीही त्या त्यांचे हृदय व्यापून जातात, हे या पुस्तकामुळे कळते. त्या केवळ बाबसाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर कुटुंबाच्या, कुटुंबात आलेल्या प्रत्येकाच्या माता होत्या. एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व बागूल यांनी प्रकाशात आणले असे हमखास म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशात बराच काळ राहिले, तरी त्यांनी आपल्या कुटुंबाची काळजी सतत घेतली आहे. पत्राद्वारे ते रमाबाईशी सतत संवाद करीत. रमाबाईंना ते रामू म्हणत. पत्रावर तसाच उल्लेख असे. तोच मायना मुखपृष्ठावर सतीश भावसार यांनी घेतला आहे. शिवाय बाबासाहेबांचा चष्मा व पेन समोर ठेवले आहेत. त्यामुळे मुखपृष्ठाला एक वेगळाच आशय प्राप्त झाला आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान




बऱ्याच कालावधीनंतर दीर्घकथासंग्रह वाचायला मिळाला, तोही ग्रामीण कथांचा. कथा म्हटल्या की त्यांचा आवाका एका व्यक्तिरेखेभोवती वा घटनेभोवती केलेली प्रसंगांची गुंफण, अशी साधी सरळ समजूत. ग्रामीण कथा असतील तर व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांना प्राधान्य असणे, इरसाल, बेरकीपणा, स्वार्थ, घरदारातील कलह, भाऊबंदकी, ग्रामीण राजकारण, चावडीवरच्या गप्पा, कुणाच्या चुलीवर काय शिजत आहे याचा वास घेण्यापर्यंतची मजल, यांचा साधारण यात समावेश असतो. निसर्गवर्णन अभावाने वा मोजक्या शब्दात येणे, हे आतापर्यंतच्या वाचनाच्या सवयीतून अंगवळणी पडलेले समजुतीचे प्रकार. परंतु या समजाला छेद मिळावा असा संग्रह वाचनात आला आणि एक वेगळेच भारावलेलेपण जाणवले. हा भारावून टाकणारा कथा संग्रह आहे किसन डगळे यांनी लिहिलेला 'मळई'.

या संग्रहात सात कथा आहेत. 'राधाई', 'सारजाई', 'मळई', 'कृष्णामामा', 'बाळाराम', 'विशाखा', अशी या कथांची शीर्षके आहेत. त्यावरून लक्षात यावे, या कथा व्यक्तिरेखांभोवती गुंफलेल्या आहेत. 'मळई' ही शेतजमिनी विषयीची कथा आहे. शेताची वाटणी, खरेदी-विक्री, तिची सातबारावर नोंदणी, बैल आणि ट्रॅक्टर यातील फरक, गावातले राजकारण, स्वार्थीपणा, कोर्टकचेरी आणि या सगळ्यात होत जाणारी फरफट, अशी दोन कुटुंबांची कथा आहे. 'राधाई' या कथेत विधवापण आलेल्या राधाईच्या कष्टांचा, गरिबीचा, मुलांचा सांभाळ, पुढे त्यांच्यातील धुसफूस, स्वार्थ यातच स्वतःला मुरवून घेणे आणि शेवटी तिच्या अखेरच्या कार्यासाठी शेत गहाण ठेवावे लागणे, असे विदारक वर्णन आले आहे. 'सारजाई' ही कथा मुलीच्या लग्नाभोवती गुंफलेली आहे. मुलीचे भले व्हावे, तिच्या नशिबी गरिबी येऊ नये, यासाठी तिचा बाप कशी नाती तोडत जातो, प्रत्यक्ष गरीब बहिणीलाही मुलगी देण्याचे नाकारतो, यात मुलीच्या भावनेचा, तिला काय पसंत आहे याचा विचार करीत नाही, अशी ही कथा. 'बाळाराम' या कथेतला बाळाराम अडाणी असूनही स्वतःच्या हिंमतीवर आणि अंगमेहनतीवर गाव सोडून शहरात येतो. एक कांदे व्यापारी शेठच्या मदतीने मोठा व्यापारी होतो. प्रचंड संपत्ती हाती येते. परंतु मूलबाळ नसल्याने दुःखी होतो, शेवटी दुःखातच जातो. 'विशाखा' या कथेतील विशाखा अशीच परिस्थितीची बळी ठरलेली. यात स्वतःचा स्वभाव आणि इतरांवर असलेला भरोसा, यामुळे फरफटत जाते. अशा विशाल पट असलेल्या, ग्रामीण जीवनात रूजलेल्या या कथा आहेत.

'मळई' संग्रह वाचताना प्रामुख्याने जाणवले ते लेखकाने टिपलेल्या सणवार, लग्नविधी, मुलगी पाहण्याचे कार्यक्रम यासारख्या ग्रामीण सांस्कृतिक चालीरितींच्या खुणा व त्यांचे बारकावे. ही आपल्या संस्कृतीची घट्ट वीण आहे, ती पूर्वापार चालत आली आहे, तिला ओलांडून पुढे जाणे शक्य नाही, हेच जणू लेखक अधोरेखित करीत आहे. शेती, बैल, अवजारे ही तर माणसांच्या नात्यांइतकी जीवनाशी नाते सांगणारी जिवलग नातेवाईक मंडळी. त्यांच्याविषयीचा जिव्हाळा, आत्मीयता, ओढ माणसाच्या जीवनातून कधीही दूर होऊ शकणार नाही, याचा प्रत्यय प्रत्येक कथेतून येतो. ही जी जुळलेली नाळ आहे, ती किती अतूट आहे, याचे वर्णन आपल्यालाही खिळवून ठेवणारे आहे. माणसांच्या नात्यात असलेले अनेक भावबंध लेखकाच्या जणू रोमारोमात भिनलेले आहेत. प्रत्येक कथेत त्यांचे वेगवेगळेपण आलेले आहे. या सगळ्यांचा समतोल लेखकाने कुठेही ढळू दिलेला नाही. त्यातून उभ्या राहिलेल्या व्यक्तिरेखा ठसठशीतपणे उभ्या राहिलेल्या आहेत त्या त्यामुळेच. निसर्गाचे वर्णन हे केवळ पार्श्वभूमी रंगविण्यासाठी आलेले नाही, तर ते त्या जीवनाचा एक भाग म्हणून आलेले आहे, हे लेखकाचे खरे कसब. कथा दीर्घ आहेत, त्यांचा आवाका प्रचंड मोठा आहे. प्रत्येक कथेवर स्वतंत्रपणे कादंबरी होऊ शकेल इतक्या त्या दमदार आहेत. परंतु लेखकाने त्यांना कथेच्या रूपातच मांडलेले आहे. यावरुन लेखकाच्या लेखनाचा आवाकाही लक्षात येतो. निवेदन पद्धतीने या कथांची मांडणी केलेली आहे. यात आलेल्या पात्रांची संख्या मोठी दिसते ती कुटुंबव्यवस्था व नातेसंबधाने. प्रमुख व्यक्तिरेखा ही कथानक पुढे नेण्याचे कार्य करीत असलीतरी इतर प्रत्येक व्यक्तिरेखा सशक्तपणे मांडलेली आहे. तिच्या अस्तित्वाने कथानकाला वेग तर येतोच परंतु नात्याचे, भावविश्वाचे अधिक पैलू वाचकांच्या समोर येतात. त्यामुळे ही कथा एकाची न राहता अनेकांची होते, तरीही तिचा प्रभाव एकसंध असाच राहतो.

लेखनाला एक प्रवाह आहे. नित्याच्या बोलण्याच्या सवयी, त्यांची ढब, वाक्प्रचार यांचाही बारकाईने उपयोग केलेला आहे. काही ठिकाणी लेखकाने चिंतनही मांडलेले आहे. 'विशाखा' या कथेच्या शेवटी निवेदन येते, 'खऱ्या प्रेमाची पारख करण्यात विशाखा असमर्थ ठरली. याला कारण जी माणसं वरकरणी प्रेम दाखवतात, आपला स्वार्थ जपण्यासाठी गोड गोड बोलतात अशा माणसांच्या भूलथापांना बळी पडून विशाखाने आपले आयुष्य परावलंबी बनविले.' 'सारजाई 'या कथेत सुंदराच्या तोंडी वास्तवाचे भान देणारे सुंदर वाक्य आले आहे, 'मावशी, तुम्ही मला काय गाय, म्हैस समजता की गळ्यात दावं बांधावं आणि लग्नाच्या बाजारात उभं करावं. ज्याला पसंत पडेल त्याला योग्य भावात विकून मोकळं व्हावं.'

एक चांगला दीर्घ कथासंग्रह वाचल्याचा आनंद देणारे हे पुस्तक आहेच, तसे लेखकाकडून अधिक अपेक्षा व्यक्त करणारे हे पुस्तक आहे, असे म्हणता येईल. माधवी कुंटे यांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. लेखकानेही मनोगतात या कथांच्या कथाबीजांविषयी मोकळेपणाने लिहिले आहे.

कथासंग्रहाचे मुखपृष्ठ सजवले आहे, 'ग्रंथाली'च्या संगणक विभागाने. पाहताच क्षणी ग्रामीण भाग नजरेसमोर उभा राहावा असे मुखपृष्ठ. निळा डोंगर, हिरवीगार झाडी, आच्छादलेल्या गवताने सजलेली जमीन, शांत जलाशय आणि त्याच्या काठी विसावलेले टुमदार गाव, अशी ही संकल्पना आहे.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रुपये**

॥ग्रंथयात्री॥

# ग्रंथपान

मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा...
माधव शिरवळकर



मुंबई ही मायानगरी आहे, मुंबई हे कॉस्मापोलिटन शहर आहे, मुंबई म्हणजे अद्‌भुत नगर आहे, मुंबई महाराष्ट्राची असली तरी ती देशाची आर्थिक राजधानी आहे, वेगवेगळी तरीही सार्थ ठरावी अशी बिरुदावली मुंबई नावाच्या पुढे आपण ऐकत आलो आहोत. तिच्याविषयीचे वर्णन, इतिहास, कुतूहल हे कधीही न शमणारे विषय होत, अनेक पुस्तकांतून तिची ओळख आपल्याला यापूर्वी झालेली असली तरीही. माधव शिरवळकरांचे ग्रंथालीने प्रकाशित केलेले 'मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा...' हे पुतक मुंबईविषयी माहिती सांगणारे असले तरी त्याचे वैशिष्ट्ये वेगळे ठरावे, असे हमखास म्हणता येईल.

मुंबईवर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. परंतु ती ब्रिटिशांच्या ताब्यात आली ती हुंडा म्हणून. इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याचे लग्न पोर्तुगीज राजा जॉन (चौथा) याची मुलगी कथेरीन ब्रिगांझा हिच्याशी ठरले तेव्हा हुंड्याची रीतसर लिखापढी झाली आणि पोर्तुगीज राजाने आख्खी मुंबई हुंडा म्हणून इंग्लडच्या राजाला देऊन टाकली. त्या कराराची तारीख आहे ११ मे १६६१. प्रत्यक्षात तिचा ताबा मिळाला ते १६६२-६३ मध्ये, तोही लढाई करून, हा भाग अलाहिदा. म्हणजे तेव्हापासून मुंबई ब्रिटिशांच्या ताब्यात गेली असे म्हणता येईल. लेखकाने तेव्हापासून मुंबईवर अधिराज्य गाजवणाऱ्या ब्रिटिशांची, त्यांच्या चरित्रांची, वैशिष्ट्यांची, त्यावेळी असलेल्या मुंबईची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे. ही ओळख मोठी मनोरंजक आहे. ती केवळ माहिती वा वर्णनापुरती मर्यादित नाही, तर सोबत संदर्भांची पेरणी करीत, स्वभावांची झलक दाखवीत, अंगच्या गुणवैशिष्ट्यांना स्पर्श करीत आपल्यासमोर सादर केलेली आहे. त्यामुळे मूळ संदर्भ चाळण्याचा मोह झाला नाही तर नवलच. किंबहुना अभ्यासकांसाठी उत्तम साधन म्हणून या संदर्भांचा उपयोग होऊ शकेल.

मुंबईतील सँडहर्स्ट रोड, ग्रँटरोड, एल्फिन्स्टन, हर्निमन सर्कल, विलिंग्डन क्लब, विल्सन-एल्फिन्स्टन कॉलेज, क्रॉफर्ड मार्केट, हाफकिन इस्टिट्युट अशी अनेक स्थळे, रेल्वेस्टेशने, कॉलेज, बागा, पूल, चौक, रोड, चर्च आजही ब्रिटिश नावांचा मळवट माथ्यावर मिरवीत आहेत. यामागे त्या त्या नावाचा गौरव दिसत असला तरी त्या व्यक्ती तितक्याच कर्तबगार, विद्वान, व्यासंगी, प्रशासक आणि स्वतःचे वेगळेपण दाखविणाऱ्या होत्या, याचा अनुभव हे लेख वाचल्यानंतर येतोच येतो. एशियाटिक सोसायटीत असलेले पुतळे पाहताना प्रश्न पडतो, ही मंडळी इथे काय करीत आहेत अजून, लेखकालाही हा प्रश्न पडला होता, त्याचे उत्तर या पुस्तकातील लेख देतात. सर जॉन माल्कमचा एक पुतळा तेथे आहे. माल्कम स्वतः उत्तम लढवय्या होता. म्हैसूरचा टिपू सुलतान आणि महाराजा होळकर यांच्याशी लढाई करून त्यांना पराभूत करणारा हा सेनानी. परंतु त्याचवेळी तो उत्तम लेखक होता. नऊ पुस्तके त्याच्या नावावर आहेत. फोर्बस या अधिकाऱ्याने गुजरातमध्ये पहिले ग्रंथालय सुरू केले. जोनाथन डंकन या विद्वान अधिकाऱ्याने बनारसला संस्कृत विद्यापीठ सुरू केले. स्त्रीभ्रूणहत्या रोखणारा हाच पहिला अधिकारी. १६ वर्षे हा मुंबईचा गव्हर्नर होता. मुंबईत प्लेगने थैमान घातले तेव्हा हाफकिन या शास्त्रज्ञाने प्रतिबंधक लस तयार केली. तिचा पहिला प्रयोग स्वतःवर करून घेणारा असा हा शास्त्रज्ञ. त्याच्या नावाने ही इन्स्टिट्यूट आजही परळ भागात आहे. मुळात हे त्यावेळी गव्हर्नरचे निवासस्थान होते, ही माहिती यातून पुढे आली. मुंबईतील परळ ते कुलाबा दरम्यान १८७४ साली धावलेल्या ट्रामगाड्यांना ओढण्यासाठी घोडे जोडलेले असत. १९०७ ला विजेवर चालणारी ट्राम आली. त्यावेळी बेस्टचा जन्म कसा झाला याची माहिती यात मिळते. सोने, चांदी वाळत घालणारा झुरन पाटील, अब्दुल रहमान नावाचा व्यापारी, अख्खी पवई ज्याच्या मालकीची होती व जो इंग्लडच्या राणीला मुंबईतून आंबे पाठवत असे, ज्याने मुगभाटात पहिली पाण्याची पाईपलाईन टाकली, असा फ्रामजी कासवजी, मुंबई महानगरपालिकेच्या समोर ज्यांचा पुतळा आहे, ते फिरोजशहा मेहता, शेट जगन्नाथ शंकरशेट यांचीही माहिती या पुस्तकात दिलेली आहे. क्रॉफर्ड मार्केट ज्याच्या नावाने ओळखले जाते तो मुंबई पालिकेचा पहिला आयुक्त, हा खरा पोलीस अधिकारी तरी त्याने त्यावेळी मुंबई स्वच्छ करण्याचे मोठे काम केले. एलफिन्स्टन कॉलेज हे माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन तर एलफिन्स्टन रेल्वेस्टेशन हे जॉन एलफिन्स्टनच्या नावे आहे, हा फरक या पुस्तकामुळे लक्षात येतो. मुंबई पालिकेने १८९९ साली ठाण्याला पाणी पुरवठा करण्याचा करार केला होता तो १००० गॅलनला १२ आणे दराने, हा संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे. मुंबईतील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न, अग्निशमन दल, पोलीस दल आणि त्यांचा भ्रष्टाचार, फोर्टची तटबंदी, विलिंग्डन क्लब, खडा पारशी, ब्रिटिशांच्या बायका, गव्हर्नरची मुलगी, अशी बरीच माहिती लेखकाने वाचकांसमोर ठेवलेली आहे.

सदर पुस्तकातील लेखांना स्वतःची मर्यादा आहे. तरी देखील त्यांच्या संदर्भांसाठी लेखकाने घेतलेले संशोधनाचे परिश्रम मोठे आहेत, हे त्यांनी दिलेल्या संदर्भांवरून लक्षात येते. लेखांच्यासोबत फोटो, चित्रे दिलेली आहेत. लेखकाची स्वतःची निवेदन शैलीही तितकीच कसदार आहे. त्यांनी व्यक्त केलेले मनोगत आणि डॉ. शरद काळे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाच्या वैभवात भर घालतात. मुंबईची एक मोठी खूण म्हणजे खडा पारशी, जरी आज तो भायखळ्याच्या दोन पुलांच्या पुळणीत उभा आहे, त्याचे अस्तित्व मात्र आजही अधिराज्य गाजवत आहे गतवैभवाइतकेच. त्याचे नाव उच्चारले तरी अख्खी मुंबई नजरेसमोर उभी राहते. मुखपृष्ठकार विश्वनाथ खांदारे यांनी मुखपृष्ठावर नेमकी त्याच पुतळ्याची निवड केली आहे अगदी चपखलपणे. शिवाय गतकालाचा सूचक ठरावा असा रंग पार्श्वभागी निवडला आहे, मुंबईवर स्वतःची मोहर उमटवलेल्या ब्रिटिशांच्या मुद्रा दिलेल्या आहेत. त्यामुळे मुखपृष्ठ आकर्षक आणि शीर्षकाशी साधर्म्य साधणारे झाले आहे.

- मूल्य २५० रु. सवलतीत १५० रुपये

## ॥ग्रंथाली॥ ॥ पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे











मेधा आलकरी लिखित 'सूर्य होता रात्रीला' या पुस्तक प्रकाशनसमयी 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप, 'वीणा वर्ल्ड'च्या संचालिका वीणा पाटील, लेखिका मेधा आलकरी, अभिनेत्री इला भाटे आणि मकरंद जोशी. सूत्रसंचालन – वर्षा राजे.

डावीकडून छायाचित्रांत पुस्तकनिर्मिती सहभागाबद्दल अरुण जोशी, शुभदा चौकर, डिमेलो सर यांचा सत्कार करताना 'वीणा वर्ल्ड'च्या संचालिका वीणा पाटील.



ग्रंथाली प्रकाशित प्रा. डॉ. अंकुश सावंत लिखित 'प्रीत ती विसरू कशी' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक आणि नाट्य संमेलनाचे माजी अध्यक्ष गंगाराम गवाणकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रसिद्ध अभिनेते प्रमोद पवार, अभिनेत्री दिप्ती भागवत, गोविंद येतयेकर, हेमांगी सावंत, डॉ. कविता सावंत, लतिका सावंत, ऋषी सावंत, साहित्यिक साळवी, मिश्रा आदी मान्यवर दिसत आहेत.

नीलिमा कुलकर्णी लिखित 'कवडसे स्त्रीजीवनाचे' पुस्तक प्रकाशनसमयी
धनश्री धारप
'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर
लेखिका नीलिमा कुलकर्णी
डॉ. अरुणा ढेरे, प्रा. मिलिंद जोशी
हिमांशु कुलकर्णी आणि
रविप्रकाश कुलकर्णी



RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.


# प्रॉपर्टीही राहील, प्रॉस्पेरिटीही वाढेल!

सारस्वत बँक
मिले यहाँ, दोनो जहाँ



KWIK LAP लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी

व्याज दर १०.५०%* प्रतिवर्ष

• कर्ज रक्कम: ₹ ५ कोटींपर्यंत • जलद प्रोसेसिंग
• कमीत-कमी डॉक्युमेंटेशन • कोणतेही छुपे खर्च नाहीत

अधिक माहितीसाठी ९०२९० ५००३९ वर मिस्ड कॉल द्या.

*नियम व अटी लागू.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
देशातील सर्वात मोठी सहकारी बँक

www.saraswatbank.com | f |


मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.